मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/अपील क्रमांक ८६५/०२

श्री. दिलीप दत्तात्रय मेहेंदळे -----अपीलार्थी
कैवल्य, १९ अ रस्ता, खार (पश्चिम)
मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय उपायुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
धर्मादाय आयुक्त कार्यालय,
ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
श्री रामकृष्ण शिक्षण मंडळ ,पीटीआर नं एफ- १७१,
(MBI) महात्मा गांधी मार्ग, कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. दिलीप दत्तात्रय मेहेंदळे, खार यांनी दि. १०/६/२००६ रोजी आयोगाकडे सादर केलेल्या अपीलामध्ये श्री.रामकृष्ण शिक्षण मंडळ या ट्रस्टकडून त्यांनी संस्थेच्या जमिनी, त्याची विल्हेवाट याबाबतीत कांही माहिती संस्थेकडून मागितली होती व धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून सुध्दा माहिती मागितली होती.

या दोन्ही संस्थांकडून मिळालेल्या माहितीने अपीलार्थींचे समाधान झाले नाही. अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार ते या संस्थेवर विश्वस्त म्हणून आहे. मध्यंतरीच्या कालावधीत ट्रस्ट या जन प्राधिकरणे आहेत किंवा नाही याविषयी दुमत होते. नुकताच मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने ट्रस्ट ही जन प्राधिकरणे नाही असा निर्णय दिलेला आहे.

असे जरी असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (च) मध्ये जी माहितीची व्याख्या दिलेली आहे त्यात "त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही

कायद्याअन्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती. " अशी व्याख्या दिली आहे.

मुंबई पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० नुसार कुठल्याहि पब्लिक ट्रस्टने अधिनियमाच्या कलम ३६ ब नुसार त्यांच्याकडे असलेली सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे रजिस्टर ठेवायला पाहिजे, व हे रजिस्टर दरवर्षी अद्ययावत करायचे असते. त्याचप्रमाणे संस्थेच्या मालकीच्या जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांची गरज असते. संस्थेच्या मालमत्तेसंबंधीचे ऑडिट होऊन त्याचा अहवाल सुध्दा धर्मादाय आयुक्त कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे असते. तेव्हा अपीलार्थीस हवी असलेली माहिती ही बृहन्मुंबई धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात निश्चितपणे असावयास पाहिजे. कायद्यातील तरतुदीप्रमाणे ते अद्ययावत केले नसेल तर ते २ महिन्याच्या आत अद्ययावत करुन अपीलार्थीस यासंदर्भात जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धर्मादाय आयुक्त कार्यालय यांनी उपलब्ध करुन द्यावी.

अपीलार्थीस धर्मादाय आयुक्त कार्यालयातील या संबंधातील नस्तीचे सुध्दा अवलोकन करु द्यावे व त्यातील जी कागदपत्रे पाहिजे असतील ती कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यांत यावीत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी उपरनिर्दिष्ट आदेशाचे पालन करावे.

अपिलीय अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट आदेशाची अंमलबजावणी करुन तसा अहवाल आयोगास सादर करावा.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२०१०/१३७/तक्रार क्रमांक ७१८/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)
१३३/ सेक्टर ९, चारकोप, कादिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव ----उत्तरवादी
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव
आस्थापना शाखा, परीक्षा नियंत्रक,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

*---विवेचन---*

श्री. एस.के.नानगिया, मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत आयोगाकडे दि. ६/२/२०१० रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जावर आयोगासमोर दि. २५/२/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी तक्रारदार तसेच श्री. दिपक गे. वसावे, जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, आस्थापना विभाग हे उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव हे पूर्वनियोजित कार्यक्रमानिमित्त मुंबई बाहेर असल्यामुळे त्यांनी दि. २४/२/२०१० च्या पत्रान्वये सुनावणीस उपस्थित राहता येऊ शकणार नसल्याचे आयोगास कळविले होते.

श्री. नानगिया यांनी दि. २८ जुलै, २००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत श्री. विलास शिंदे यांच्या विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रक पदावर झालेल्या निवडीसंबंधात माहिती मिळणेबाबत अर्ज केला होता. सदर अर्जास अनुसरुन मुंबई विद्यापीठाच्या जन माहिती अधिकारी यांनी अनुक्रमे दि. २६ ऑगस्ट, २००९ आणि दिनांक ५ सप्टेंबर २००९ अन्वये उपलब्ध

माहिती पुरविलेली होती. परंतु मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. नानगिया यांनी कलम १९(१)अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांजकडे दि. ४/११/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. श्री. नानगिया यांनी माहिती अर्जाद्वारे त्यातील मुद्दा क्र. Viii अन्वये एम.ए.पार्ट I च्या इतिहास विषयाच्या पेपर सेटींग संदर्भात झालेल्या चौकशी बाबतीत चौकशी समितीने विद्यापीठास जो चौकशी अहवाल सादर केला होता त्याची प्रत मागितली होती. तथापि पूर्ण चौकशी अहवालाची प्रत देण्याऐवजी श्री. नानगिया यांच्या म्हणण्यानुसार चौकशी अहवालातील केवळ excerpts च्या भागाची (ज्यामध्ये अहवालाच्या अनुमानाचा तपशिल अंत:र्भूत आहे.) झेरॉस प्रत जन माहिती अधिकारी यांनी दिली. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर अपूरी माहिती देऊन मागितलेली माहिती न दिल्याबद्दल प्रथम अपील केले होते. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल विहित मुदतीमध्ये अपीलावर निर्णय पारित न केल्यामुळे श्री.नानगिया यांना आयोगाकडे दि. ६/२/२०१० रोजी तक्रार अर्ज दाखल करणे भाग पडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला.

"डिसेंबर, २००९ मध्ये अपीलाच्या सुनावणी दरम्यान मा. कुलसचिवांनी सदर अहवाल त्यांच्या किंवा मा. कुलगुरुंच्या कार्यालयात उपलब्ध असल्यास सदर अहवालाची प्रत श्री. नानगिया यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रतिपादन केले होते. परंतू आजतागायत सदर अहवाल अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांना प्राप्त झालेला नाही. किंवा अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून चौकशी अहवालासह कोणताही आदेश जन माहिती अधिकाऱ्यास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आस्थापना विभागात उपलब्ध असलेल्या चौकशी अहवालाची प्रत अर्जदारास पुरविलेली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून सदर पूर्ण अहवालाची प्रत आजतागायत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे श्री. नानगिया यांना आवश्यक असलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन देता आलेल्या नाहीत. "

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की, विचाराधीन चौकशी अहवालाची पूर्ण प्रत जन माहिती अधिकारी यांजकडे उपलब्ध न झाल्यामुळे त्याची प्रत ते श्री.नानगिया यांना देऊ शकलेले नाहीत. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल श्री. नानगिया यांनी दि. ४/११/२००९ रोजी केलेल्या प्रथम अपीलावर माहे डिसेंबर २००९ मध्ये सुनावणी घेऊन अहवालाची प्रत देण्याचे केवळ

तोंडी आश्वासन दिले असले तरी त्याप्रमाणे लेखी आदेश पारित करण्याचे टाळलेले आहे. यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे. -

---आदेश---

विद्यमान कुलसचिव यांनी तक्रारदारांनी मागितलेल्या चौकशी अहवालाची प्रत उक्त अधिनियमाच्या कलम ७ (६) मधील तरतुदीस अनुसरुन मोफत पुरविण्याची ७ दिवसांत व्यवस्था करावी.

तत्कालीन कुलसचिव तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द विद्यापीठ जी विभागीय चौकशी करीत आहे त्या चौकशीत या अपीलाच्या संदर्भात विद्यापीठाने आदेशित केलेल्या इतिहास विषयाच्या पेपर सेटिंगच्या चौकशी अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांना कुलसचिव यांनी उपलब्ध न करुन दिल्याचा (ज्यामुळे जन माहिती अधिकारी अर्जदारास माहिती देऊ शकले नाहीत ) मुद्दा अंतःर्भूत करण्यात यावा.

सदर आदेशाची प्रत मा. कुलगुरु , मुंबई विद्यापीठ यांना तसेच विद्यमान कुलसचिवांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः ३.५.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/३८३७८/तक्रार क्रमांक२७०/०१
क्रमांक-मु.मा.आ/२००९/४२८५४/तक्रार क्रमांक४७६/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)
१३३/ सेक्टर ९, चारकोप, कादिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसचिव ----उत्तरवादी
(नवी - २१) नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
(नवी - २१) नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

श्री. एस.के.नानगिया, मुंबई यांनी यापूर्वी आयोगाकडे दि. १४/१/२००९ रोजी उक्त जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. ३/१०/२००८ रोजी माहिती अर्ज सादर केला असता अपूरी माहिती दिल्याबद्दल तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर तक्रार क्रमांक २७०/०१ अन्वये आयोगासमोर दि. ३/३/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सदर तक्रार प्रकरणी आयोगाकडून आदेश प्रलंबित असून माहिती अर्ज करुन नऊ महिने लोटल्यानंतरही अजून मागणी केलेली माहिती मिळाली नसल्याने श्री. नानगिया यांनी दि. २७ जुलै २००९ रोजी मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचेसमोर पुन्हा तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर दि. २७/८/२००९ रोजी पुन्हा सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

माहे जुलै २००७ मध्ये बोरीवली येथे जी लक्ष्मीछाया इमारत कोसळून अपघात झाला होता त्याची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नेमलेली होती. सदर समितीने माहे नोव्हेबर २००७ मध्ये शासनाला अहवाल सादर केला होता त्याअनुषंगाने श्री. एस.के.नानगिया यांनी दि. ३/१०/२००८ रोजी उक्त जन माहिती अधिका-यांकडे माहिती अर्ज केला होता. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदारांचे असे म्हणणे होते की, त्यांनी आयोगाच्या मध्यस्थीने सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन त्यांना माहे ऑक्टोबर २००८ मध्ये समितीचा अहवाल प्राप्त करुन घेण्यास जरी यश आले असले तरी त्यांना अजून मागितलेल्या माहितीपैकी (A) कृती अहवालाची प्रत (a copy of Action taken report) व (B) नगर विकास विभागामध्ये विविध स्तरावर समिती अहवाल ज्यांच्या ज्यांच्याकडे पाठविण्यात आला/ हाताळण्यात आला त्याबाबतच्या नोंदीची माहिती, अशा एकूण दोन मुद्दयांची माहिती अद्याप मिळालेली नाही.

तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता उपरोक्त दोन मुद्दयांची माहिती अद्यान न दिल्याचे निष्पन्न झाले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त दोन मुद्दयांची माहिती तक्रारदारास तात्काळ पाठविण्याबाबत सुनावणीच्या वेळी निर्देश देण्यात आले होते. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच दि. २८/८/२००९ रोजी नोंदणीकृत डाकेने पत्र स्वरुपात तक्रारदारास माहिती पाठवून त्याची प्रत आयोगास सादर केली आहे.

माहिती देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे झालेल्या विलंबाबाबत त्यांना एकदा शास्ती करण्यात आलीच आहे. विद्यमान जन माहिती अधिक्‍ारी यांना देखिल माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती/उत्तर देण्याबाबत दक्षता बाळगण्याबाबत समज देण्यात येत आहे.

***----आदेश----***

तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक-मु.मा.आ/२०१०/९८/तक्रार क्रमांक ७१७/०१**

**श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार**
**७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)**
**१३३/ सेक्टर ९, चारकोप, कादिवली (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव (पोल २) ----उत्तरवादी**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (पोल-२)**
**गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून सापळा रचून लाच घेताना रेड हँडेड पकडलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द खटला दाखल करण्यास राज्य शासनाच्या गृह विभागाकडे परवानगी मागितली जाते. अशा एकूण ७७ दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत श्री. एस.के.नानगिया यांनी त्यांच्या दि. १९/१०/२००९ च्या माहिती अर्जान्वये गृह विभागाकडे माहिती मागितली होती. विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे श्री.एस.के. नानगिया यांनी गृह विभागाच्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांना उद्देशून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अन्वये दि. १२/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती अर्ज व प्रथम अपीलास अनुसरुन कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे नाईलाजाने श्री. एस.के.नानगिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे उक्त अधिनियमानुसार कलम १८ अन्वये दि. २१/१/२०१० रोजी तक्रार अर्ज दाखल केला.

सदर तक्रार अर्जावर दि. २५/२/२०१० रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी तक्रारदार उपस्थित होते. उत्तरवादी पक्षातर्फे श्री. कैलास बिलोणीकर , अवर सचिव तथा

प्रथम अपिलीय अधिकारी आणि श्री. वि.क. वसावे, कक्ष अधिकारी (पोल-२) तथा जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

माहिती अर्ज करुन चार महिने उलटून गेले तरी अद्याप माहिती मिळाली नसल्याने ती विनाविलंब देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे व त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी तक्रारदार श्रीयुत एस.के.नानगिया यांनी केली.

तक्रारदारांच्या दि. १९/१०/२००९ रोजीच्या अर्जावर कार्यवाही करण्यास १०० दिवसांपेक्षा जास्त विलंब लागला असल्यामुळे ती त्वरित तक्रारादारास देण्यात यावी असे निर्देश सुनावणीच्या वेळी देण्यात आले. तसेच माहिती देण्यास विलंब का लागला याची गृह विभागामार्फत विभागीय चौकशी करण्यात यावी व दोषींविरुध्द कारवाई करुन तीन महिन्याचे आत केलेल्या कारवाईचा अहवाल अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी आयोगास पाठवावा.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत प्रथम अपीलाची सुनावणी न घेतल्याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

तक्रार मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांना हवी असणारी माहिती त्वरित देण्याचे निर्देश सुनावणीच्या वेळीच देण्यात आले होते त्याचा अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनाहि निर्देशित कारवाई करण्यासाठी देण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३.५.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/३३९२६/तक्रार क्रमांक ७५९/०१

श्रीमती शोभना गो. शिवणेकर -----तक्रारदार
प्लॉट नं. ६, ९ बी ०२,
नागरी निवारा वसाहत, दिंडोशी,
गोरेगांव (पूर्व) मुंबई ६५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक ----उत्तरवादी
बृहन्मुंबई दुध योजना, वरळी, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
तथा प्रभारी व्यवस्थापक, गोरेगांव (पूर्व)
मुंबई ४०० ०६५.

३. जन माहिती अधिकारी
बृहन्मुंबई दुध योजना, वरळी, मुंबई.

***---विवेचन---***

श्रीमती. शोभना शिवणेकर यांनी दि. २१/७/२००८ रोजी आयोगाकडे अशी तक्रार केली की, त्यांच्या खालील अर्जांच्या बाबतीत जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक आरे दुग्धशाळा, गोरेगांव किंवा अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना यांचेकडून योग्य ती माहिती मिळाली नाही.

१. दि. १६/८/२००७ चा माहिती अर्ज

२. दि. २७/१०/२००७ चा माहिती अर्ज

३. दि. २३/१/२००८ चा प्रथम अपील अर्ज

४. दि. १५/३/२००८ चा प्रथम अपील अर्ज .

याबाबतीत अधिनियमाच्या कलम २० अन्वये कारवाई का करु नये याचा समक्ष खुलासा दि.

६/५/२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांनी समक्ष आयोगापुढे येऊन केला. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"श्रीमती. शोभना शिवणेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक आरे दुग्धशाळा यांचेकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केले होते. त्यानुसार त्यांना कार्यालयात उपलब्ध माहिती देण्यात आली. सदर माहिती सन १९९९ व २००० या वर्षाची म्हणजे दहा वर्षापूर्वीची असल्याने उपलब्ध करणे शक्य होत नाही. ही अडचणी श्रीमती. शिवणेकर यांना समजून सांगण्यात आली होती. वास्तविता दैनंदिन दुध वितरण पत्रिका या प्रत्येक वाहनासाठी एक याप्रमाणे असतात व त्यात एका वितरण मार्गावरील दुध केंद्रांचा समावेश असतो. सदर दुध वितरण पत्रिका तीन वर्षापर्यंत जतन करुन ठेवण्यात येतात व नंतर नियमानुसार आवश्यक त्या नोंदी घेवून नष्ट करण्यात येतात. त्यामुळे सन १९९९-२००० च्या दुध वितरण पत्रिका कार्यालयात उपलब्ध नाहीत.

यासंदर्भात श्रीमती शिवणेकर यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक बृहन्मुंबई दुध योजना वरळी यांचेकडे अपील केले होते. सदर अपीलाबाबत प्राप्त झालेल्या निर्णयात वितरणपत्रिका उपलब्ध असल्यास देण्यात याव्यात असे नमूद केले आहे. निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यालयातून पुरेपूर प्रयत्न करण्यात आला परंतु सदर कागदपत्र उपलब्ध नसल्याने तक्रारदारास देणे शक्य झाले नाही. प्रत्येक केंद्रांच्या वैयक्तिक आर्थिक नोंदी लेखाधिकारी ३ आरे दुग्धशाळा यांचेकडे ठेवण्यात येतात. श्रीमती. शिवणेकर यांना वाटप झालेले केंद्र क्र. झेड २२०५ यावर रु ४२२१.८० इतकी रक्कम थकीत असल्याचे लेखाधिकारी ३ यांनी त्यांच्या दि. ३०/११/२००५ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्र श्रीमती. शिवणेकर यांना देखिल देण्यात आले आहे. परंतु त्यांना थकबाकीचा सविस्तर तपशिल हवा आहे तो उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. लेखाधिकारी ३ यांचेकडे केंद्राचे लेजर रजिस्टर ठेवण्यात आले आहे त्यावरील नोंदीची प्रत तक्रारदार यांना देण्यासाठी सोबत आणली आहे. शासकीय देणे बाकी असल्याने त्यांचे बचत प्रमाणपत्र परत करणे योग्य नाही करिता सदर बचत पत्र अजून दिलेली नाहीत. "

त्याचप्रमाणे अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक , बृहन्मुंबई दुध योजना यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

"      श्रीमती शोभना गो. शिवणेकर यांच्या दि. २१/७/०८ रोजीच्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना, वरळी कार्यालयातर्फे सदर प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१.   श्रीमती. शोभना गो. शिवणेकर यांनी प्रथम दि. १६/८/२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक, आरे दुग्धशाळा यांचेकडे माहिती अधिकारा अंतर्गत अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन जन माहिती अधिका-यांनी त्यांचे पत्र दि. २३/१०/२००७ अन्वये अर्जदारांना माहिती कळविलेली आहे.

२.   श्रीमती. शोभना गो. शिवणेकर यांना बृहन्मुंबई दुध योजनेअंतर्गत केंद्र क्रमांक २२०५ दुध वाटपा करिता नोव्हेंबर १९९३ पासून देण्यात आले होते.  सदर केंद्र त्यांनी फेब्रूवारी २००५ पर्यंत चालविले होते.  त्यांनी सदर केंद्र दिनांक १७/२/२००५ रोजी शासनाकडे परत केलेले आहे.

३.   श्रीमती. शिवणेकर यांनी केंद्र वाटप होताना कार्यालयाकडे रु. ५०००/- किंमतीची राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे आणि रुपये ३०००/- एवढया रकमेची बँक गॅरन्टी दिली होती.

४.   वाटप केलेले दुध केंद्र परत शासनाकडे जमा केल्यानंतर अनामत म्हणून ठेवलेली राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे व बँक गॅरन्टी केंद्र धारकाला परत केली जाते.  मात्र श्रीमती. शिवणेकर यांच्या प्रकरणी त्यांचेकडे दुध वाटपा पोटी रु. ४२२२/- एवढी थकबाकी असल्याचे दिसून आले.  ही बाब श्रीमती. शिवणेकर यांना लेखा अधिकारी-२ आरे यांचे कार्यालयीन पत्र दि. १४/६/२००७ अन्वये कळविण्यात आली होती.  शासनाची थकबाकी अदा केल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल असे त्यांना कळविण्यांत आले होते.

५.   श्रीमती. शिवणेकर यांनी शासनाची थकबाकी न भरता त्या संदर्भातील कागदपत्रांची मागणी केली आहे.  जन माहिती अधिका-यांकडून त्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने श्रीमती. शिवणेकर यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि. १५/३/२००८ रोजी अपील सादर केले होते.

६.   श्रीमती. शिवणेकर यांच्या अपीलावर दि. २९/९/०८ रोजी सुनावणी झाली.  त्यापूर्वी तीन वेळा सुनावणी ठेवण्यात आली होती.  मात्र अपीलार्थी श्रीमती शिवणेकर हजर राहिल्या नाहीत. दि. २९/९/०८ रोजी झालेल्या सुनावणीत अर्जदार/अपीलकर्ता यांनी मागणी केलेली कागदपत्रे ही

कायमस्वरुपी जतन करावयाची कागदपत्रे/अभिलेखे नसल्याने उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिका-यांनी स्पष्ट केले होते. त्यावर अपिलीय प्राधिका-यांनी पुन्हा एकदा काही ठरावित कागदपत्रांचा शोध घेणेबाबत व कागदपत्रे उपलब्ध झाल्यास अर्जदारांना देणेबाबत निर्देश दिले होते.

अपील निकाली काढल्याचे आदेश दि. १०/१०/२००८ रोजी निर्गमित करण्यात येऊन अपीलकर्ता व जन माहिती अधिक्ारी यांना आदेशाच्या प्रती पाठविण्यांत आल्या आहेत. "

वरील दोन्ही निवेदने पाहता जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती देण्याच्या कारवाईत कुचराई झालेली दिसून येत नाही. मात्र अर्जदारांचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे, त्यादृष्टीने कंट्रोलर ऑफ अकाऊंटंट बरोबर चर्चा करुन या विषयाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

***----आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ६.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४९३७/अपील क्रमांक ५२०६/०२

श्री. रविकिरण रावसाहेब देशमुख ----अपीलार्थी
२/ ई १०४, पवई विहार कॉम्प्लक्स,
आदि शंकराचार्य मार्ग, पवई , मुंबई ४०० ०७६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव ----उत्तरवादी
उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग ८)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
उद्योग, उर्जा व कामगार विभाग (उद्योग ८)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३०/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १५/०१/२०१० व १९/४/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थी यांनी दि. २८/१/२००८ रोजी माहिती अधिकाराखाली प्रोत्साहन अनुदान अंतर्गत मे. टेल्को यांच्या इंडिका कार प्रोजेक्टला रु. १००.६२ कोटी देण्याबाबतच्या प्रस्तावाची तसेच संबंधित धारिकेच्या टिप्पणीची वित्त विभागाच्या शेऱ्यासह प्रत मिळावी म्हणून अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१/२/२००८ च्या पत्राद्वारे अपीलार्थीनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी निगडीत असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम १ व २ अन्वये त्यांना देण्याचे नाकारले.

माहिती नाकारण्याचे सयुक्तिक कारण वाटत नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यास अनुसरुन प्रथम आलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.१/४/२००८ च्या आदेशानुसार शासनाने मे.टेल्को यांच्या इंडिका कार प्रकल्पास प्रोत्साहनपर अनुदान देण्याकरिता तरतूद
करण्याकरीता पुरवणी मागणी विधीमंडळास सादर केली असल्याचे अपीलार्थीस कळविण्यांत आले. इतर माहिती देण्याचे स्पष्ट नाकारल्यामुळे अपीलार्थीनी दि. ६/५/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या दि. १५/१/२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या बाबी -

१.	जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. ५/४/२००८ च्या पत्राद्वारे इंडिका कार प्रकल्पास प्रोत्साहनपर अनुदान देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधीमंडळास सादर करण्यांत आलेल्या तरतूद मागणीची प्रत पाठविली होती ती सुनावणीच्या वेळी दाखविण्यांत आली.

२.	इंडिका कार प्रकल्प यासाठी विना औद्योगिक जिल्हयात स्थापन होणा-या उद्योग घटकाना जशी प्रोत्साहनपर अनुदान दिली जाते तसेच अनुदान या प्रकल्पाचे विशेषत्व लक्षात घेता शासनाने ठरविले होते.

तृतिय पक्षाशी संबंधित माहिती असल्याने आयोगाने तृतिय पक्ष "टाटा मोटर्स" यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची दि. १९/४/२०१० रोजी संधी दिली.  त्यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

1. Under Section 8 (1) (d) of the RTI Act, information including commercial confidence trade secrets or intellectual property, the disclosure of which would harm the competitive position of a third party, unless the competitive authority is satisfied that larger public interest warrants the disclosure of such information is exempt from disclosure.
2. The Central information Commission (Commission) has in certain decisions, held that except in case of an overriding public interest information which relates to the commercial confidence of a third party should not be disclosed id the disclosure of such information would harm that third party's competitive position.
3. Since financial and business information of third parties such as income tax returns and audit related information are exempt from disclosure under the RTI Act, it may be said that disclosure of the details relating to the fiscal benefits granted by the Government of Maharashtra to the company would fail under this exemption clause.
4. The disclosure of the information sought under the RTI Act, in relation to the fiscal benefits granted by Govt. of Maharashtra and any other information in relation there to, is of commercial confidence between the parties i.e. Government of Maharashtra and the company. As disclosure of this information would affect our competitive position, the fiscal benefits and the information in relation thereto, are therefore exempt from disclosure in accordance with Section B(1)(d) of the RTI Act. We would, therefore, request you not to disclose the fiscal benefits or any other information in relation to the same to any third party under the RTI Act.
5. In the event such disclosure is required is to be made in the larger public interest over-riding the exemption provided under section B(1)(d) of the RTI Act, the commission has in Ms. Alka Mehta v. Shri S.S.Rathore, Commissioner of Income Tax and CPIO and Shri Suresh Trikha, Chief Commissioner of Income Tax and Appellate Authority, held that an individual seeking information under the RTI Act in public interest is obliged to produce tangible evidence to persuade the Commission that in fact, there is public inters which would warrant overriding exemptions available to a third party in a given cases.
6. In the present application, we do not believe that the applicant has provided any evidence which necessitates a disclosure on the ground that a class of the community has a pecuniary interest in such disclosure or that an interest by which their legal rights or liabilities would be affected on account of non-disclosure of the requested information.
7. Like all other projects of a similar size, nature and national significance, some economic, commercial and technical confidence is required to be maintained as a commercially protective measure and particularly having regard to the highly competitive nature of the automobile industry in the country.
8. We request you to take cognizance of our above submissions while responding to the query raise, under the RTI Act, by shri Ravikiran Raosaheb Deshmukh who has not

produced any tangible evidence to persuade the commission that there is public interest which would warrant overriding the exemptions available to a third party under the RTI Act, Therefore in this case the Company being a commercial organization engaged in the production of automotive vehicles in a highly competitive global environment and the fiscal benefits and information in relation thereto being of a commercially confidential nature the information requested for qualifies under the exemption provided under Section B(1)(d) of the RTI Act and therefore should not be disclosed to the applicant.

इंडिका प्रोजेक्ट महाराष्ट्रातच राहण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने टाटा मोटर्सना प्रोत्साहनपर अनुदानाच्या बाबतीत काही आश्वासने दिली होती व त्या आश्वासन पूर्तीसंबंधी कशा प्रकारे वित्तीय तरतूद करावी याबाबत वेगवेगळे पर्याय व त्याची कायदेशीरता तपासून बघून अंतिमतः या संदर्भात विशेषत्वाने विधीमंडळाची बजेट तरतूदीस मान्यता घेऊन टाटा मोटर्सना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला व त्याप्रमाणे कार्यवाही केली.

अपीलार्थींनी मागणी केलेल्या कागदपत्राचे वाचन केले असता आयोगास असे दिसून आले की, त्यात तृतिय पक्ष ज्याप्रमाणे म्हणतात त्याप्रमाणे त्या माहिती व वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यावर विपरीत परिणाम होईल असे कांहीही नाही. याउलट अंतिमतः यासंबंधीचा प्रस्ताव बजेट तरतूदीस मान्यतेसाठी विधीमंडळासमोर ठेवण्यात आला होता. त्यामुळे विधीमंडळापुढे जो विषय आलेला आहे त्या विषयाशी संदर्भित माहिती ही जनतेला व अपीलार्थीस नाकारणे योग्य होणार नाही.

म्हणून अपीलार्थीस हवी असलेली माहिती हे आदेश मिळाल्यापासून १० दिवसाचे आत देण्यात यावी असे निर्देश आयोग जन माहिती अधिकारी यांना देत आहे.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक ७ मे, २०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४४५८१/अपील क्रमांक ५४००/०२**

**श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी**
**२ अ, सन & सी अपार्टमेंटस,**
**रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०४९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी**
**सहकारी संस्था (३) मुंबई**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक**
**सहकारी संस्था के/पश्चिम**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २७ नोव्हेंबर, २००९**
**सुनावणीची तारीख १७/२/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्रीयुत विजय चौव्हाण यांनी त्यांच्या दि. ६ जुलै, २००९ रोजीच्या अर्जाने श्रीयुत शिवाजी शिंदे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम ८८ नुसार दि. २६/५/२००९ रोजी तयार केलेल्या चौकशी अहवालाच्या संदर्भात एकूण ११ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीस क्र.१,२,३,४,५,६, व ९ ची माहिती त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी करुन त्याच्या छायांकित प्रती प्राप्त करु शकतात असे कळविण्यांत आले. मुद्दा क्र. १० व ११ संबंधात उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे असे कळविण्यांत आले. तसेच मुद्दा क्र. ७ व ८ च्या बाबतीत माहिती ही सहकारी गृहनिर्माण संस्था पातळीवरची आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था या "जन प्राधिकरणे" नाहीत असा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर**

खंडपीठाने व कर्नाटक हायकोर्टाने याअगोदरच दिलेला आहे त्याचा आधा घेऊन माहिती देण्यांत आलेली नाही.

सदरील माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या दि. ७ ऑगस्ट २००९ रोजीच्या अपीलावर निर्णय देतांना अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्र. १,२,३,४,५,६, ९,१० व ११ बद्दलची माहिती अपीलार्थी यांना देण्यांत यावी व मुद्दा क्र. ७ व ८ च्या बाबतीत माहिती ही संस्था स्तरावरची असल्यामुळे अमान्य करण्यांत आली आहे असा निर्णय दिलेला आहे त्याविरुध्दचे हे अपील आहे.

मुद्दा क्र. ७ व ८ वगळता माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी कधीच नकार दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार अपीलार्थीस वरील विषयासंदर्भात दि. २२/११/२००७ रोजी २७१ कागदपत्रांच्या प्रती याअगोदरच दिलेल्या आहेत. याव्यतिरिक्त अपीलार्थीच्या दि. ६ जुलै, २००९ रोजीच्या अर्जासंदर्भात त्यांनी पाहणी करुन ज्या कागदपत्रांची निवड करतील तेहि कागदपत्रे त्यांना देण्यात येतील असे अगोदरच कळविलेले आहे. प्रत्यक्ष पाहणी झाल्यामुळे मग कुठच्याहि वादाला कारण उरणार नाही. त्यामुळे अपीलार्थीनी यासंदर्भात कागदपत्रांची पाहणी करुन त्यांना आवश्यकती सर्व कागदपत्रे निश्चितपणे प्राप्त करुन घेता येतील.

मुद्दा क्र. ७ व ८ च्या बाबतीत अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही संस्था पातळीवरची आहे. त्यामुळे सहकारी संस्था स्तरावरची माहिती ही अपीलार्थीस सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ३२ नुसार तसेच सहकारी संस्था अधिनियमाच्या नियम २७ च्या चौकटीतच मिळवावी लागेल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***-----आदेश-----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १० मे, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०७२५/अपील क्रमांक ४५५४/०२**

**श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी**
**२ अ, सन & सी अपार्टमेंटस,**
**रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०४९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस आयुक्त ----उत्तरवादी**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**बृहन्मुंबई विभाग, मधू इंडस्ट्रियल इस्टेटल,**
**१ ला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई १३.**

**२.जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**बृहन्मुंबई विभाग, मधू इंडस्ट्रियल इस्टेटल,**
**१ ला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई १३.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ११ मे, २००९**
**सुनावणीची तारीख १३/८/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

अपीलार्थीस त्यांच्या दि. २५ फेब्रूवारी, २००९ रोजीच्या अर्जानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे त्यांनी दि. १३/८/२००८ व १५/९/२००८ रोजी ज्या तक्रार दिल्या त्या तक्रारीचा क्रमांक - डिस्क्रीट इन्क्वायरी नं. १४/२००८ देण्यात आलेला आहे त्या तक्रारीच्या संदर्भात श्री. वझारे यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत मागितली आहे.

सदर अहवाल दिल्यास सदर चौकशी दरम्यान ज्या इसमाकडे चौकशी करण्यात आली त्या इसमाची सुरक्षा किंवा जिवीतास धोका उत्पन्न होईल तसेच चौकशीमध्ये प्राप्त केलेल्या माहितीचे

स्त्रोत ओळखता येईल म्हणून माहिती नाकारण्यात आली.

दि. ७/५/२००९ रोजीच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशात सुध्दा वरील मुद्दा ग्राहय धरुन तसेच सोसायटीच्या सदस्यांचे आपसातील वितुष्ठ वाढून त्यांच्यातील कटूता वाढू नये या कारणामुळे चौकशी अहवालाची प्रत अपीलार्थी यांना न देण्याचा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय मान्य केला व अपील निकाली काढले. त्यामुळै सदरचे हे द्वितीय अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व कागदपत्रांचे वाचन केल्यानंतर असे दिसून आले की, ज्या उपनिबंधकाविरुध्द अपसंपदा संपादित केल्याची तक्रार श्रीयुत चौव्हाण यांनी केली होती त्यात चौकशीअंती अपसंपदा संपादित केली असल्याचे दिसून येत नाही म्हणून त्यांच्याविरुध्दची गुप्त चौकशी क्र.१४/०८ ही बंद करण्यात आलेली आहे.

अपीलार्थीस हा अहवाल न देण्याचे मुख्य कारण हे अधिनियमाच्या कलम ८ (१) (छ) चे देण्यात आलेले आहे ते पुढीलप्रमाणे ---

" जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती. "

चौकशी अहवाल हा योग्यवेळी जनतेसमोर यायला पाहिजे असाच पवित्रा आयोगाने वेळोवेळी घेतलेला आहे. अर्थात असे करीत असतांना अधिनियमाच्या आवश्यक त्या कलमाची बूज राखणे हेहि तेवढेच आवश्यक आहे. त्यामुळे या अहवालामधील ज्या माहितीमुळे चौकशी करतांना वापरलेले स्त्रोत हे उघड होत असतील ती माहिती न दिली तरी चालेल. अपसंपदा संपादित केली गेल्याचे सिध्द होत नाही हे दर्शविणारी जी सांख्यिकी असेल त्या सांख्यिकी बद्दलची सर्व माहिती अपीलार्थीस दिल्याने माहितीच्या अधिकाराच्या वापरातील पारदर्शकता निर्माण करण्याची जी आवश्यकता आहे तीहि पूर्ण होईल व चौकशी करीत असतांना ज्यांनी मदत केली त्यांची नांवे उघड न करणे या दोन्ही गोष्टी साधता येतील. त्यामुळे वर दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध चौकशी अहवालाचे दोन भाग करावेत व सांख्यिकी भाग ज्यामध्ये यामध्ये फक्त अपसंपदेचा विषय हाताळला असेल त्या भागाची माहिती अपीलार्थीस हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १० मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/४०१६१/तक्रार क्रमांक ३५५/०१

श्री.डॉ.श्रीकांत प्रभू -----तक्रारदार
बी-२३, उदयानप्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुद्रांक अधीक्षक (मुख्यालय) ----उत्तरवादी
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अं-१)
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

३. जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अं-२)
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

आयोगाने अपील क्र.मुमाआ/२००८/२९८८०/अपील ३३३६/०२ प्रकरणी दि. ३१ डिसेंबर, २००८ रोजी आदेश पारित करुन अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत अपीलार्थींना प्रकरणाच्या सद्य:स्थितीची माहिती देण्यात यावी असे निर्देश उपरोक्त उत्तरवादी क्र.२ यांना उद्देशून दिले होते. मात्र त्याचे अनुपालन झाले नाही या कारणास्तव तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार सादर केली होती.

जन माहिती अधिकारी (उत्तरवादी क्र.२) यांनी दि. ३१/१२/२००८ च्या आयोगाच्या आदेशाचे अनुपालन न केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा लेखी खुलासा दि. १८/५/२००९ रोजी ५-०० वाजता आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा असे दि. २९/४/२००९ रोजी समक्रमांकाचे आदेश

पारित करण्यात आले होते.

प्रस्तुत प्रकरणी डॉ. श्रीकांत प्रभू यांनी माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती ही उपरोक्त उत्तरवादी क्र. २ (जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमलबजावणी-२) ) यांच्याशी संबंधित असल्याने त्या कार्यालयाचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा.नगर रचनाकार (अंमलबजावणी-२) मुंबई यांनी आयोगाच्या दि.२९/४/२००९ च्या आदेशास अनुसरुन त्यांच्या दि. १६/५/२००९ च्या पत्रान्वये आयोगास खुलासा सादर केलेला आहे तो पुढीलप्रमाणे -

"अर्जदार डॉ. एस.एस.प्रभू यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ अन्वये राज्य जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२)मुंबई यांचे कार्यालयात दि. २०/२/२००७ रोजीच्या अर्जान्वये शास्त्रीनगर द्वारका को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. ची चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या संबंधाने माहिती अपेक्षिलेली होती. अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नव्हती. त्यामुळे संबंधित संस्थेला चुकविलेल्या मुद्रांक शुल्काच्या अनुषंगाने माहिती सादर करणेबाबत दि. ९/२/२००७ व ८/३/०७ रोजी नोटीस पाठविण्यात आली व त्यानुसार अर्जदारास दि. ३०/३/०७ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन राज्य जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२) यांना कळविले. अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध झालेली नव्हती.

त्यानंतर अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती न दिल्याबाबत तत्कालीन राज्य जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२) यांना दि. १८/७/०७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यावेळी सुध्दा अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती या कार्यालयास उपलब्ध झालेली नव्हती. त्यामुळे संबंधित सोसायटीला नोटीस तसेच स्मरणपत्र पाठविण्यात आल्याचे व संबंधित सोसायटीकडून मुद्रांक जिल्हाधिकारी, (अंमल-२)या कार्यालयास माहिती प्राप्त न झाल्याने पुढील कारवाई करण्यात आली नसल्याबाबत तसेच आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे दि. ०७/०८/२००८ च्या पत्रान्वये अर्जदारास कळविले.

अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती न दिल्याचे कारण नमूद करुन कायद्याचे कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि. ६/८/०७ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. अपील प्रकरणात अर्जदारास अपिलीय प्राधिकारी तथा मुद्रांक अधीक्षक, (मुख्यालय) मुंबई यांनी दि. ३०/८/०७,

१३/९/०७ व १८/१०/०७ रोजी सुनावणी दिली.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थीने अपेक्षिलेली माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. याबाबत माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कळविले की, अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसून सदर माहितीबाबत संबंधित संस्थेला नोटीस देऊन माहिती सादर करणेबाबत सुचित केले आहे. संस्थेकडून अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. माहिती प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास देण्यात येईल. तसेच या वस्तुस्थितीबाबत अर्जदारास दि. ३०/३/०७ व ७/८/०७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे नमूद करुन सदर पत्राच्या प्रतीसुध्दा माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी दाखल केल्या. माहिती अधिकाराचे अर्जावर उत्तरादाखल दिलेल्या दि. ३०/३/०७ व ०७/०७/०७ रोजीचे पत्र मिळाल्याबाबत अपीलार्थीने मान्य केले. तथापि संबंधित संस्थेच्या मुद्रांक शुल्क वसुली संबंधाने कार्यवाही करण्यात आली नसल्याबाबत अपीलार्थीनी सुनावणीच्या वेळेस सांगितले.

अर्जदारास अपेक्षित असलेली माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी(अंमल-२)यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती. ही वस्तुस्थिती अपीलार्थींचे निदर्शनास आणण्यासाठी संबंधित नस्ती अर्जदारास अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२) यांना दि. ८/११/०७ च्या आदेशान्वये कळविण्यात आले व त्या अनुषंगाने अपीलार्थीस प्रकरणाची संबंधित नस्ती निरीक्षणासाठी सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आली होती.

त्यानंतर अर्जदाराने या कार्यालयास दि. ६/१२/०७ रोजी सादर केलेल्या विकसन करारनाम्याच्या दस्ताच्या प्रतीवरुन दस्तामध्ये उपलब्ध असलेल्या माहितीनुसार मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२) या कार्यालयाकडून मुल्यांकन करुन संबंधित संस्थेला दि. १/३/०८ रोजी मागणी नोटीस पाठविण्यात आली. या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या नोटीसला संबंधित संस्थेकडून/सदस्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याने दि. ५/१२/०८ रोजी उपमुद्रांक अधीक्षक यांना शासनाच्या दि. २३/७/०८ च्या परिपत्रकानुसार प्रत्यक्ष मोक्याच्या ठिकाणी जाऊन संस्थेचा अभिलेख तपासण्यासाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ६७/६८ अन्वये प्राधिकृत करण्यात आले.

दरम्यान अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती न दिल्याचे कारण नमूद करुन कायद्याचे कलम

१९(३) अन्वये दुसरे अपील दाखल केले. सदर अपील प्रकरणात संदर्भिय आदेश क्र.१ नुसार अर्जदारास मागणी केलेली माहिती आदेश प्राप्त झालेले दिनांकापासून १० दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यास आदेशित करण्यात आले होते.

उपमुद्रांक अधीक्षक यांनी स्वतः संबंधित सोसायटीला दि. १८/२/२००९ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन तेथील रहिवाश्यांशी संपर्क साधला. त्यावेळी तेथील रहिवाश्यांनी सदर इमारतीचे विकासक एस.डी.कंन्स्ट्रक्शन यांचे सोबत कोणत्याही प्रकारचे ॲग्रीमेंट तयार केले नसल्याबाबत सांगितले. तसेच इमारतीचे बांधकाम करीत असलेले विकासक एस.डी.कंन्स्ट्रक्शन यांचे कार्यालयात स्वतः भेट दिली. त्यावेळी उपमुद्रांक अधीक्षक यांनी एस.डी.कन्स्ट्रक्शन यांना प्रथम नोटीसची प्रत आणि दुसरी नोटीस दिली आहे.

अर्जदार श्री. प्रभु यांना दि. १८/२/२००९ रोजी वरील बाबतीत दुरध्वनीवरुन सोसायटीमधील सद्य:स्थितीबाबत माहिती दिली. श्री. प्रभु यांनी सदर सोसायटीवर प्रशासक म्हणून श्री. इंदूलकर यांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचेशी संपर्क साधण्यास कळविले. त्यानंतर अर्जदार श्री.प्रभु यांनी पुन्हा फेब्रूवारी महिन्यामध्ये या कार्यालयास भेट दिली त्यावेळी त्यांनी माझ्या तक्रारीवर कार्यालयाने केलेल्या कार्यवाही बाबत मला माहिती आहे, परंतु काही सभासदांनी त्यांचे फ्लॅटस ॲग्रीमेंट न करता परस्पर विकले असून कार्यालयाने त्या सभासदाकडून अजून मुद्रांक शुल्काची वसूली केलेली नाही असे सांगितले. त्यावेळी श्री.प्रभु यांना मुंबई मुद्रांक अधिनियम १०५८ मधील तरतुदींची पुन्हा कल्पना दिली व अधिनियमातील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क हे व्यवहारावर लागत नसून व्यवहाराच्या दस्तावेजांवर लावण्यात येते असे स्पष्ट केले. यावर श्री.प्रभु यांनी या कार्यालयास विकासकाला ॲग्रीमेंट तयार करण्यास आदेश द्यावेत असे सांगितले. याबाबतीत मुंबई मुद्रांक अधिनियमामध्ये विकासक किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला दस्तावेज तयार करण्याची सूचना/सक्ती/आदेश देण्याची तरतुद नसून दस्तावेज तयार करण्याकरिता त्यांनी सोसायटीच्या वतीने विकासकाला भाग पाडणे आवश्यक आहे. तसेच सोसायटीतर्फे म्हाडा आणि सोसायटी फेडरेशनचे कार्यालयाशी संपर्क साधून विकासकाकडून करारनामे करुन घेण्याबाबत श्री.प्रभु यांना सांगण्यात आले. याबाबत श्री.प्रभु यांना या कार्यालयाचे दि. २९/४/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अर्जदाराने अपेक्षिलेली माहिती संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने तसेच विकासक मे.एस.डी.कंन्स्ट्रक्शन यांनी सदर संस्थेच्या रहिवाश्यांसोबत अद्यापी कोणत्याही प्रकारचे ॲग्रीमेंट तयार केले नसल्यामुळे सदर रहिवाश्यांकडून मुद्रांक शुल्क वसुलीचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल -२) तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती दिली नाही, असे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही. चुकविलेले मुद्रांक शुल्काच्या वसूलीबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी,(अंमल-२) यांचे स्तरावर आवश्यक कार्यवाही सुरु असून संस्थेकडून हयानंतर प्राप्त होणारी माहिती व मुद्रांक जिल्हाधिकारी (अंमल-२) यांचेकडून केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास कळविण्यात येईल.

तक्रारदारांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने असेही सादर करण्यात येते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये "माहितीचा अधिकार" याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दि. ६/९/२००८ मध्ये नमूद केले आहे की,

" या अधिनियमाअंतर्गत माहिती पुरवताना सार्वजनिक प्राधिकरणाकडे कलम २(ज) मध्ये व्याख्या केलेली व उपलब्ध असलेली माहिती पुरविणे अभिप्रेत असून जेथे वेगळयाने माहितीचे संकलन, संशोधन, पृथ्थकरण करणे आवश्यक आहे, अशा स्वरुपातील माहिती पुरविणे अभिप्रेत नाही."

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता तक्रारदाराने अपेक्षिलेली माहिती या कार्यालयात/ संबंधित संस्थेकडे/ विकासकाकडे उपलब्ध नसून, विकासकाकडून करारनामे तयार करुन घेण्याची कार्यवाही करणे तक्रारकर्त्यांस अपेक्षित आहे. ही बाब मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या तरतुदीत समाविष्ट नाही. तसेच या कार्यालयाकडून करण्या ताअलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारास वेळोवेळी अवगत केलेले आहे.

सबब केंद्रीय माहितीचा अधिकार कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत तक्रारदाराने केलेली मागणी अयोग्य आहे. कारण माहिती अधिका-याने जाणून बुजून चुकीची/अपूर्ण/दिशाभूल करणारी माहिती अर्जदारास दिलेली नाही. मागितलेली माहिती नष्ट

केलेली नाही अथवा अर्जदाराची विनंती दुष्ट हेतूने नाकारलेली नाही. त्यामुळे कलम २०(१) व २०(२) खाली माहिती अधिका-याविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. या वस्तुस्थितीचा विचार करुन तक्रारकर्त्यांनी केलेला तक्रार अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात येत आहे. "

जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार (अंमल-२) मुंबई यांचा खुलासा लक्षात घेता असे दिसते की, डॉ. प्रभु यांनी अपेक्षिलेली माहिती संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे.

***----आदेश---***

तक्रारदारांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
शास्तीचे कोणतेही आदेश नाहीत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १० मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८३/अपील क्रमांक ५३९९/०२

श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी
२ अ, सन & सी अपार्टमेंटस,
रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ----उत्तरवादी
सहकारी संस्था (३) मुंबई
म्हाडा इमारत, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक
सहकारी संस्था के/पश्चिम
म्हाडा इमारत, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १९ नोव्हेंबर, २००९
सुनावणीची तारीख १७/२/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या प्रथम अपीलास अनुसरुन पुढील निर्देश दिले होते.

" अर्जदार श्री. विजय के. चौहान यांना उपनिबंधक, के पश्चिम विभाग यांनी मुद्दा क्र. १ बाबत दिलेले उत्तर सयुक्तिक वाटत नाही. मुद्दयास अनुसरुन उत्तर द्यावे. मुद्दा क्र. २ व ३ बाबत दिलेले उत्तर बरोबर आहे. तसेच मुद्दा क्र. ४ हा मुद्दा क्र. २ व ३ शी निगडीत असून दिलेले उत्तर बरोबर आहे. अर्जदार श्री. विजय चौहान यांचे अपील अर्जावर खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

---आदेश---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ अन्वये श्री. विजय चौहान यांचे अपील क्र. ८५/२००९ अंशत: मान्य करीत आहे. "

या निर्देशास अनुसरुन कारवाई न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" या कार्यालयाने श्री. विजय चौहान यांना माहिती अधिकारांतर्गत मुद्दा क्र. १ ॲड्.आर डिसोझा यांचे दि. २/६/२००९ च्या पत्रातील मुद्दे संस्थेविरुध्द कार्यवाही करण्यासाठी पुरेस नाहीत असे कळविलेले होते. ॲड् आर. डिसोझा यांनी दि.२/६/२००९ रोजी पत्र लिहून संस्थेच्या व्यवस्थापक समिती विरुध्द कायदा कलम ७८ व ७९ योग्य ती कारवाई करावी असे नमूद केले होते. या कार्यालयाने ॲड्. आर. डिसोझा यांना दि. २६/६/२००९ च्या पत्राने सन ॲन्ड सी अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.लि. विरुध्द केलेल्या तक्रारीचे मुद्दे संस्थेवर कायदा कलम ७८ खाली कारवाई करणेसाठी पुरेसे नाहीत असे कळविलेले होते. सदर मुद्दयांबाबत तक्रारकर्ते यांना माहिती दिलेली असून सदरची माहिती अपीलकर्ते यांनाही या कार्यालयाने माहितीचा अधिकारांतर्गत विचारलेला मुद्दा क्र. १ नुसार माहिती दिलेली आहे. तसेच मा. राज्य माहिती आयुक्त यांनी अपील क्र.२००८/३३८८/०२ मध्ये दि. ३१/१०/२००९ रोजी **"Why a particular decision was taken or not taken is beyond the scope of the RTI Act. "** दिलेल्या निर्णयात नमूद केलेले आहे. "

अपीलार्थींनी सुध्दा विस्तृत निवेदन दिलेले आहे. मात्र त्यांचा मुख्यत्वेकरुन ओघ हा जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द त्यांच्या असलेल्या अनेक प्रशासकीय तक्रारीं असा आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्र. १ बाबत दिलेले उत्तर सयुक्तिक वाटत नाही असे जे नमूद केलेले आहे यावरुन त्यांना कदाचित उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी ॲड्. आर. डिसोझा यांना सन ॲन्ड सी को.ऑप.सोसायटी यांच्या विरुध्दच्या तक्रारीसंदर्भात कायदा कलम ७८ खाली कारवाई करण्यासाठी तक्रारीतील मुद्दे पुरेसे नाहीत, असे जे कळविले आहे ही बाब उपनिबंधकांनी पुन्हा एकदा तपासुन पाहणे अभिप्रेत असू शकते हे ऑब्झर्व्हेशन वरिष्ठ अधिकारी या नात्याने त्यांनी (जिल्हा उपनिबंधक )केलेले दिसते. माहितीच्या अधिकाराच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांचे विश्लेषण व विवेचन जरी योग्य वाटत असले तरी त्यानुसार रेकॉर्डला असलेली माहिती त्यांनी

दिलेली असली तरी वरिष्ठ अधिका-यांनी केलेले आव्झर्व्हेशन वर जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधक यांना याबाबतीत अहवाल सादर करुन त्यांच्याकडून अंतीम आदेश प्राप्त करुन घेणे हे उचित राहिले असते.

जिल्हा उपनिबंधक हे जर दि. २६/६/२००९ रोजीच्या पत्रात उपनिबंधकांनी घेतलेल्या निर्णयाशी सहमत नसतील तर ते सहकार कायद्याअंतर्गत त्यांना असलेल्या अधिकारात जी कारवाई करायची ती ते करु शकतात. यादृष्टीने या आदेशाची प्रत ही अपिलीय अधिकारी यांनाहि पाठविण्यात यावी. त्यांनी "उत्तर सयुक्तिक वाटत नाही " अये जे ऑब्झर्व्हेशन केलेले आहे त्यासंबंधी स्पष्ट निर्देश द्यावेत.

*----आदेश---*

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ११ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७१९८/अपील क्रमांक ५६५४/०२

श्री.चेतन कोठारी ----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाभाई पटेल लेन, भुलाभाई देसाई रोड समोर,
मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह सचिव ----उत्तरवादी
गृह विभाग- पोल ४, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
गृह विभाग- पोल ४, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २१ फेब्रूवारी, २०१०
सुनावणीची तारीख ११/५/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या दि. ३/१०/२००९ रोजीच्या अर्जानुसार २६/११/२००८ रोजी घडलेल्या घटनेसंदर्भात कोस्टल सिक्युरिटीसाठी घेतलेल्या स्पिड बोटी, त्यांचे मेंटेनन्स, पर्सोनेत वगैरे बाबतीत माहिती पाहिजे होती.

यापैकी कांही मुद्दयांची माहिती अपीलार्थीस गृह विभागाचे सह सचिव तथा अपिलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिल्यानंतर मिळालेली आहे. मात्र गृह विभागाने हा अर्ज माहिती अधिकारी आयुक्त राज्य गुप्ता वार्ता विभाग यांच्या कार्यालयाकडे सुध्दा माहिती देण्यासाठी पाठविला होता. पण गुप्त वार्ता विभाग या विभागास गोपनीय स्वरुपाची माहिती देण्यापासून वगळण्यांत आले आहे म्हणून माहिती दिलेली नाही.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी श्रीयुत चेतन कोठारी यांनी खुद्द पोलीस आयुक्तांनी कोस्टल सिक्युरिटी विषयीची माहिती जनतेला व प्रेसला दिलेली आहे. तेव्हा त्यात गुप्त स्वरुपाचे कांही नाही असे प्रतिपादन केले. कोस्टल सिक्युरिटी सारख्या संवेदनाक्षम विषयाच्या बाबतीत २६/११/२००८ रोजी घडलेल्या घटनेच्या संदर्भात जनतेला आश्वस्थ करणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच यासंदर्भात ज्या गोष्टी गोपनीय राहणे आवश्यक आहे त्या गोपनीय ठेवणे हेहि तेवढेच आवश्यक आहे. त्यामुळे याबाबतीत कोस्टल सिक्युरिटी याविषयावर कलम ४ खाली प्रशासनाने स्वतःहूनच द्यावयाची माहिती ही पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी माहिती तयार करावी व ती जनतेसाठी उपलब्ध करुन द्यावी. हे करीत असतांना अपीलार्थीच्या अर्जाचा विचारहि करण्यात यावा, जेणेकरुन सर्वसाधारणपणे कशा पध्दतीची माहिती अपेक्षित असते व कोणती माहिती द्यावयाची किंवा नाही याचा विचार पोलीस आयुक्तांच्या सर्वोच्च पातळीवर होऊ शकतो. जेणेकरुन जनतेची माहितीची गरज, त्यांच्यातील सुरक्षिततेची भावना तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती गोपनियता या तिन्ही बाबींचा सर्व समावेशकपणे एकत्रित विचार करुन जनतेला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी गृह विभागाने अपीलार्थीचा अर्ज पोलीस आयुक्तांकडे पाठवावा व त्यांनी अशा प्रकारे माहिती तयार करुन ती जनतेला व अपीलार्थीस द्यावी.

***----आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

गृह विभागाचे उत्तरवादी अधिकारी व पोलीस आयुक्त यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ११ मे, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३१८९/अपील क्रमांक ५६५७/०२

श्री. स्वप्निल गायकवाड ----अपीलार्थी
१३९/ ४११७ , कन्नमवार नगर नं.२,
विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
एस वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.

२.जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी
एस वॉर्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका,
भांडूप (पश्चिम) मुंबई ४०० ०७८.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १३/११/ २००९
सुनावणीची तारीख ११/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

" मुळ माहिती अर्जानुसार अर्जदारास माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येत नाही. अर्जदारास जन माहिती अधिक्ारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी विहित कालावधीत उत्तर दिलेले आहे. दि. ९/२/२००९ रोजी श्री. स्वप्निल गायगवाड यांनी एस विभाग कार्यालयातील वैद्यकीय आरोग्य अधिकारी या विभागाकडे प्रथम माहिती अर्ज सादर केला होता. सदर अर्जास कार्यालयाचे पत्र क्र. सआ/एस विभाग/वैआअ/३११०२/दि. १६/२/२००९ अन्वये उत्तर विहीत मुदतीत देण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिका-यासाठी- खुलासा पुढीलप्रमाणे

अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आलेली आहे. अपीलाची सुनावणी मंगळवार दि. ९/६/२००९ रोजी निश्चित केली होती. सुनावणी दरम्यान अपीलकर्ता अनुपस्थित होते. परंतु वैद्यकीय आरोग्य अधिकारी उपस्थित होते. तद्नंतर या कार्यालयाचे पत्र क्र. सहाआ/४४४१/वैआअ/ओडी/आरआय दि. १२/६/२००९ अन्वये अपीलकर्त्यास पुनःश्च निवेदन सादर करण्याची संधी देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांनी एस विभाग कार्यालयाकडे संपर्क साधलेला नाही. सुनावणीनंतर या कार्यालयाचे पत्र क्र. सहाआ/२०४/वै.आ.अ/ओडी/आरआय दि. २६/६/०९ अन्वये दिलेले आदेश स्वयंस्पष्ट आहेत. उपरोक्त दोन्ही उत्तरे पुरेसी व समाधानकारक आणि विहित कालावधीत दिलेली आहेत.

या कार्यालयातर्फे देण्यात आलेली माहिती पुरेशी व समाधानकारक असून त्यामध्ये कोणतीही दिरंगाई झाल्याचे आढळत नाही. "

याच विषयाच्या संदर्भात आयोगाने अपील क्र. ५११२/०२ मध्ये दि. १९ डिसेंबर, २००९ रोजी निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिका-यांचे निवेदन व आधीचा झालेला निर्णय या दोन्ही गोष्टी लक्षात घेता पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ११ मे, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७३५७/अपील क्रमांक ५६५०/०२

श्री. रोमन सिलवेरा ----अपीलार्थी
सुविनेर अपार्टमेंट, फ्लॅट नं. ११,
डॉ. पीटर डायस रोड, बांद्रा (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट वॉर्ड,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २४ फेब्रूवारी, २००९
सुनावणीची तारीख ११/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलाबाबत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले.

" वरील विषयाबाबत असे सादर करण्यात येते की, अपीलार्थीने हया कार्यालयात दि. १/९/२००९ रोजी अर्ज करुन सन १९९९ पासून सन २००८ पर्यंत केलेल्या तक्रारींची माहिती विचारलेली होती. त्या अर्जानुसार हया कार्यालयाने दि. १/१०/२००९ रोजी अपीलार्थीस पत्र पाठवून हया कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे त्याच्या सत्यप्रती केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ अन्वये योग्य ते शुल्क भरुन घ्याव्यात असे कळविले होते. परंतु अपीलार्थीनी सदर कागदपत्रे घेतलेली नव्हती.

सदर अपीलार्थीने दि. २८/१०/२००९ रोजी कार्यकारी अभियंता एच/पश्चिम विभाग

यांच्याकडे प्रथम अपील केलेले होते. त्यानुसार दि. १८/११/२००९ रोजी सुनावणी होऊन दि. २३/११/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध कागदपत्रे देण्यात यावीत असे आदेश पारित केलेले होते. त्यानुसार अपीलार्थीने दि. ९/१२/२००९ रोजी या कार्यालयात हजर राहून दि. २५/९/२००८ च्या तक्रारीबाबत उपलब्ध असलेली १२ कागदपत्रे घेतलेली आहेत. "

अपीलार्थीचे अपील व त्यावर महापालिकेने केलेली कारवाई तसेच संबंधित मुद्दयासंबंधीची कागदपत्रे पाहिली असतांना यासंदर्भात सोसायटीने महापालिकेला दि. ९/२/२०१० रोजी जे पत्र लिहिलेले आहे त्यात अपीलार्थी व सोसायटी यांचा संबंध तसेच सोसायटीची अपीलार्थीच्या तक्रारीविषयीची भूमिका याहि गोष्टी स्पष्ट आहेत. सुनावणीच्या वेळी या पत्राची प्रत अपीलार्थीस देण्याचे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे अंतिमतः अपीलार्थी व सोसायटी यांचे म्हणणे लक्षात घेऊन महापालिका जो कांही अंतिमतः निर्णय घेईल त्यासंबंधीची माहिती सुध्दा योग्य वेळी अपीलार्थीस देण्याचे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १२ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६९२२/अपील क्रमांक ५६५३/०२

श्री. चेतन कोठारी ----अपीलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाभाई पटेल लेन, भुलाभाई देसाई रोड समोर,
मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (रस्ते) ----उत्तरवादी
६ वा मजला, बृहन्मुंबई महानगरपालिका II,
ॲनेक्स बिल्डींग, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (ब्रिजेस & MUTP)
म्युनिसिपल स्टोअर बिल्डींग, १ ला मजला,
डॉ. ई मोझेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ४ फेब्रूवारी, २०१०
सुनावणीची तारीख ११/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील ओव्हर ब्रिजेस, ब्रिजेस, फ्लाय ओव्हर आणि सब्-वे च्या बांधकामांबाबत माहिती पाहिजे होती. त्यातील कांही माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे.

अपीलार्थीचे म्हणणे की, याच विषयासंदर्भात पुण्याचे श्रीयुत. विहार दुर्वे यांनी अर्ज केला असता त्यांना माहिती देण्यात आली. मात्र अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली नाही.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीच्या म्हणण्यात तथ्य आढळून आले. मात्र त्यामध्ये कुठचाहि

कुहेतू नाही.	मात्र अपीलार्थींच्या अर्जातील प्रत्येक मुद्दयाबाबत जन माहिती अधिकारी यांनी जागरुक राहून माहिती देणे हेहि तेवढेच आवश्यक आहे याची जाणीव त्यांना करुन देण्यात आली. अपीलार्थीस हवी असलेली ब्रिजेस वगैरेच्या दुरुस्तीबाबत महापालिका उचलत असलेली पावले यासंदर्भातील माहिती अपीलार्थीस १० दिवसांचे आंत विनामूल्य देण्याचे निर्देश सुनावणीच्या वेळेस देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १२ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४५३८०/अपील क्रमांक ५६५६/०२

श्री. संजय गुप्ता ----अपीलार्थी
हरेवाडी, लाला गेट, जी.बी. हिल रोड,
जुहू गल्ली, अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक ----उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सह निबंधक
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १६/११/ २००९
सुनावणीची तारीख ११/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींच्या अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

"अपीलार्थी श्री. संजय प्रेमनाथ गुप्ता यांनी दि. २६/१०/२००९ रोजीच्या अर्जान्वये जुहू लेन मिलाप को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. प्लॉट बिअरिंग सि.टी.एस.नं. २६४(पार्ट) आणि २०८(पार्ट) व्हिलेज अंधेरी ॲट गिल्बर्ट हिल, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८ या संस्थेच्या सदनिका वाटपासंबंधीच्या सी.डी/डी.व्ही.डी सदनिकावाटप यादी (सदनिका क्रमांक, परिशिष्ट क्रमांक, पात्र झोपडीधारकाचे नांव) इत्यादी माहितीची मागणी केलेली आहे. अर्जदार यांच्या अर्जास अनुसरुन राज्य जन माहिती अधिकारी यांनी दि. ३/११/२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना या कार्यालयाकडे आवश्यक त्या

शुल्काचा चलनाच्या स्वरुपात भरणा करुन माहिती प्राप्त करण्याबाबत लेखी कळविलेले आहे. त्यानुसार अर्जदार यांनी या कार्यालयाकडे दि. ४/११/२००९ रोजी रु. २९६/- एवढया रकमेचे चलनाचा भरणा केलेला आहे व त्याप्रमाणे अर्जदार यांस राज्य जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली आहे. अर्जदार यांनी माहिती मिळाल्याची पोहोच राज्य जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे.

तद्‌नंतर अर्जदार यांनी या कार्यालयाकडे दि. ३०/१०/२००९ रोजी अपील अर्ज दाखल केलेला आहे. सदरच्या अपील अर्जास अनुसरुन या कार्यालयाकडून दि. २५/११/२००९ रोजी आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत. अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही नियम ७(१) अन्वये ४८ तासांत द्यावी असे नमूद केलेले आहे. मात्र माहितीचा विषय हा जीवनमरणाचा प्रश्न नसल्यामुळे शासकीय माहिती अधिकारी यांनी मुदतीत उत्तर दिलेले आहे. तसेच अर्जदार यांनी माहिती अधिकारान्वये अपील करणेस जो कालावधी दिलेला आहे तो कालावधी संपण्याअगोदरच अपील केलेले आहे. सुनावणी दरम्यान शासकीय माहिती अधिकारी यांनी वाटप यादी व सी.डी. अर्जदार यांस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकार यांचा अपील अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे.

अर्जदार /अपीलकार श्री. संजय प्रेमनाथ गुप्ता यांनी मागणी केलेली व या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदार यांना या कार्यालयाकडून विहित कालावधीत पुरविण्यांत आलेली आहे. त्यामुळे अपीलकार श्री.संजय प्रेमनाथ गुप्हा यांचा अपील अर्ज निकाली काढण्यांत यावा ही विनंती. "

अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या निवेदनातील मुद्दे योग्य वाटतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश----*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १२ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४८२२/अपील क्रमांक ५६५८/०२

श्री. प्रदिपसिंह ठाकूर ----अपीलार्थी
लालजीसिंह चाळ, खोतवाडी,
पी.एम. रोड, सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ५४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक ----उत्तरवादी
रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमि.
प्लॉट (ई)७ , एम.आय.डी.सी.
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९३.

२.जन माहिती अधिकारी
रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमि.
प्लॉट (ई)७ , एम.आय.डी.सी.
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०९३.

*---विवेचन---*

अपीलार्थीस जन माहिती अधिकारी, उर्जा विभाग, मंत्रालय यांच्याकडून रिलायन्स एनर्जी व महाराष्ट्र सरकार यांच्यात भागीदारीविषयाची माहिती त्यांच्या दि. ३ ऑगस्ट २००९ रोजीच्या अर्जानुसार पाहिजे होती. हा अर्ज त्यांनी रिलायन्स एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर लिमि. यांच्याकडे पाठविला. मात्र रिलायन्स एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर लिमि. यांच्या म्हणण्यानुसार त्यांना माहितीचा अधिकार कायदा लागू नाही त्यामुळे त्यांनी माहिती देण्यास नकार दिला.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे ती रिलायन्स व महाराष्ट्र सरकार यांच्या भागीदारीविषयीची आहे, व जी माहिती सरकारकडे आहे ती माहिती महाराष्ट्र शासनाच्या उर्जा विभागाने देण्यास कुठच्याहि प्रकारे हरकत नाही.

तेव्हा जन माहिती अधिकारी, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अपीलार्थीच्या अर्जाच्या संदर्भात शासनाकडे असलेली माहिती अपीलार्थीस १५

**दिवसांच्या आत पुरवावी.**

**रिलायन्स एनर्जी हे जन प्राधिकरण आहे हे सिध्द करण्याबाबत सबळ पुरावे आयोगास सादर करण्यात आलेले नाहीत.**

***---आदेश---***

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक १२ मे, २०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६४१८/अपील क्रमांक ५५९४/०२

श्री. विनोद घोलप ----अपीलार्थी
अे-१, शिवसदन , गोरसवाडी,
लजपतराय रोड, मालाड (पश्चिम)

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग कार्यालय
मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)

२.जन माहिती अधिकारी
मुंबई महानगरपालिका, पी /उत्तर विभाग कार्यालय
मामलेदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)

***---विवेचन---***

अपील क्रमांक ५५९४ मधील दि. २६/२/२०१० रोजीच्या आदेशानुसार अपीलार्थीस माहिती देण्याचे निर्देश देण्यांत आले होते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेविरुध्द शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा करण्यासाठी दि. ३०/३/२०१० रोजी बोलाविण्यात आले होते. मात्र जन माहिती अधिकारी उपस्थित न राहता त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्यामुळे दि. १९/४/२०१० व त्यानंतर दि. ३०/४/२०१० व त्याहि दिवशी उपस्थित नसल्यामुळे दि. ११/५/२०१० रोजी जन माहिती अधिका-यांना बोलाविण्यात आले. या सर्व दिवशी जन माहिती अधिकारी अनुपस्थित राहिले त्यामुळे त्यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम महापालिका आयुक्त यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दि. १ जुलै, २०१० रोजी मिळणा-या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसे केल्याचा अनुपालन अहवाल शास्ती वसूलीच्या चलनाच्या प्रतीसह आयोगाकडे दि. १५ जुलै, २०१० पर्यंत पाठविण्यात यावा.

---आदेश---

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

या आदेशाची प्रत महापालिका आयुक्त यांनाहि पाठविण्यांत यावी, व त्यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १२ मे, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६३८४/अपील क्रमांक ५६४७/०२**
**क्रमांक-मु.मा.आ/--------/अपील क्रमांक ५६४८/०२**

**श्री. राजेश धारप ----अपीलार्थी**
**अे/ ४०२, सिध्दिविनायक होरीझोन,**
**डॉ. व्ही.एन.रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ३, मध्य नियंत्रण कक्ष,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई २७.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार**
**टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स,**
**वी.एन. पुरव मार्ग,देवनार, मुंबई ८८.**

**३.जन माहिती अधिकारी तथा डेप्यूटी रजिस्ट्रार**
**टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स,**
**वी.एन. पुरव मार्ग,देवनार, मुंबई ८८.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ८ जानेवारी, २०१०**
**सुनावणीची तारीख ११/५/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी टाटा इं.ऑफ सो. सायन्स उपस्थित.**

अपीलार्थी यांच्या पत्नी संगिता राजेश धारप यांनी त्यांच्याविरुध्द दादर पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी केलेल्या आहेत. तसेच त्यांनी महिला व मुले यांसाठी जो स्पेशल सेल दादर पोलीस स्टेशन

प्रिमायसेसमध्ये आहे त्यांच्याकडे केलेल्या तक्रारींच्या बाबतीत माहिती पाहिजे होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार पोलीस स्टेशनमध्ये असणारी माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. मात्र स्पेशल सेलकडे असलेली माहिती ही त्यांना नाकारण्यात आलेली आहे. म्हणून अंतिमतः त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

अपीलार्थीचे म्हणणे की त्यांना माहिती मिळायला पाहिजे असे आहे. याबाबतीत स्पेशल सेल ज्यांचे व्यवस्थापक टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस करतात त्यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे आहे.

**"We have to state that we have not deliberately with held the information asked by Mr. Rajesh L.Dharap as alleged by him. We have applied our mind in replying to Mr.Dharap that the information asked by him is personal information pertaining to others and hence cannot be disclosed under section 8(j) of Right to Information Act,2005 Every time mr.Dharap asked for the same information he was sent the reply in time.**

**The special Cell for women and Children, which has been serving the needs of women facing violence for the past 25 years, is situated in the premises of the Dadar police station and is a Field Action project of the Tata Institute of Social Sciences. Women from all strata of society come to seek help from the special Cell for women and Children as they face violence from their husbands and inlaws. They narrate their woes to the social Workers in the special Cell in strict confidence and are counseled by them. If such confidential communication is disclosed to the very people about whose alleged misconduct it is made, the women may in all likelihood become the target of future attracks. The social Worker is a Counselor who stands in fiduciary relation with the troubled women who has come to seek guidance and solace and a solution to the violence she faces in her intimate relationships. The special cell is therefore sworn to secrecy and duty bound to protect the interests of the woman. If the information given to the special cell in confidence is disclosed, ther will be a gross violation of the privancy of the women concerned and will cause them tremendous trauma and make them**

**vulnerable to futher family violence. Further, the women will feel that the trust they reposed in the special cell has been betrayed and this will deter them from approaching outside agencies for help ever again. This will no doubt deepen that despair they face already, with disastrous consequences for their health and wellbeing.**

**This is to further state and submit that the Case Diary Maintained by our Social Workers is a private document about the course the counseling of the woman is taking and concerns only the personnel of the special Cell and the woman in question. It has no relation to any public activity or interest whatsoever; hence the extracts from the Daily Case diary cannot be given.**

**In the circumstances, we submit that the public interest in protencting the privacy and wellbeing of the women in question and the confidential nature of counseling in general far outweighs the public interest(if any) in disclosure of the information sought by Mr.Rajesh Dharap. In addition we hace to state the information sought by him is not in any way connected with depriving him of his life and liberty.**

**In light of the above stated facts, we pray that his appeal to be provided with the complaint letters given by his wife to the special Cell and copies of the opinions/views recorded by the special cell in the case Diary should not be granted**

**Thanking you,**

**महिला व मुले यांच्यासाठी कौन्सिलिंग सेंटर (स्पेशल सेल) ही कशा पध्दतीने चालवावी याबाबतची मार्गदर्श क तत्वे शासनाने विहित केलेली आहेत.  त्यात स्पेशल सेलच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निर्गमित केलेले आहेत.**

**The special Cell's approach to work on violence against Women.**

**The special Cell's priority of work is the violated woman, and it is committed to work in the interest of violated woman as a marginalized and vulnerable group. The special cell works with all women, irrespective of caste,**

**class, and ethnicity. The special cell recongises the violated woman as person with rights and entitlements, and enables her toi gain access to these though the problem-solving process. The special cell belives that the violated woman has innate strengths, as well as the potential capacity to make her own decisions, and determine the course of her own life. She is empowered though the problem-solving process, which validates her experience. The special cell acknowledges with humility the violated woman's spirit to survives, and her struggles.**

**The Objectives of the special Cells are defined as**

1. **Rebuilding violated women's self-esteem, self-worth and dignity.**
2. **Offer immediate services in case of family violence and atrocities against women in the form of.**
   - (a) **police assistance in registering criminal complaints and in any other matter**
   - (b) **Placement in institutions.**
   - (c) **Counselling**
   - (d) **Referral to family services agencies and other services including medical, psychiatric, educational and vocational.**
   - (e) **Legal aid.**
3. **Be a liaison between police and organizations for women and children**
4. **Create awareness among women themselves, among professional groups and general public of the atrocities committed against women and children.**

**यावरुन असे दिसून येते की, स्पेशल सेलचे उद्दिष्ट महिलेला तिच्याविरुध्द झालेल्या अन्यायाच्या बाबतीत प्रतिकार करण्यास मदत करणे व तिच्या पुनर्वसनासाठी तिला शक्यते सहाय्य करणे.**

अपीलार्थींचे पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारींबाबत फौजदारी संहितेप्रमाणे योग्यती कारवाई तो विभाग करीलच. मात्र स्पेशल सेलकडे जी तक्रार त्या स्त्रीने केलेली असेल त्या संबंधीची माहिती न देण्याचे योग्य त्या कारणासाठीच संस्थेने नाकारलेले आहे असे वाटते.

अपीलार्थी यांच्यावर त्यांच्या पत्नीने कांही आरोप केले असतील त्याची शहानिशा पोलीस करतीलच. मात्र स्पेशल सेलच्या कामकाजाचे उद्दिष्ट लक्षात घेता त्यांच्याकडे विश्वासाहर्ततेने सुपूर्द केलेली माहिती ही तक्रारदारास नाकारणे हे सयुक्तिक होईल. ज्यावेळेला चार्जशिट कोर्टात दाखल होईल त्यावेळेला कोर्टास नैसर्गिक न्यायाच्या तत्वाने जर काही माहिती ही स्पेशल सेलकडून मागवाविशी वाटली तर ते निश्चितपणे तसे आदेश स्पेशल सेलला देऊ शकतील व ते त्यांचेवर बंधनकारक राहिलच.

माहितीच्या अधिकाराच्या कलम ८ मध्ये जी माहिती देण्यापासून अपवाद दर्शविण्यात येत आहे त्यात सदरील केस बसते असे आयोगास वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १२ मे, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७५९/अपील क्रमांक ५६६४/०२

श्री. अजितकुमार पंजाबी ----अपीलार्थी
द्वारा-रमझान भटार चाळ, घर नं. ५/२६३
डॉ. आंबेडकर मार्ग, तक्यावार्ड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर अभियंता ----उत्तरवादी
महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता
इमारत बांधकाम (शहर) मुंबई महानगरपालिका,
ई विभाग कार्यालय, खो.क्र. ३२, ३ रा मजला,
१० शेख हफिउद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई - ८

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३ फेब्रूवारी , २०१०
सुनावणीची तारीख १२/५/२०१०
अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीचे म्हणणे असे की, त्यांना माहिती मिळत नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे की, अपीलार्थींनी विहित शुल्क न भरल्यामुळे त्यांना माहिती देता येऊ शकली नाही.

दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी किंवा त्यांचे प्रतिनिधी (ॲथॉरिटी लेटर दिले असेल तर ) हे दि २६ मे, २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जातील. त्यांना सर्व कागदपत्रे दाखविण्यात येतील व त्यांनी निवड केलेली कागदपत्रे विहित शुल्क भरल्यानंतर देण्यांत येतील.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक १२ मे, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७५८/अपील क्रमांक ५६६३/०२

श्री. अमजद रेडकर ----अपीलार्थी
मालवणी तिरंगा सोसायटी, प्लॉट १४०,
स.नं. १०/सी, सेक्टर ८, म्हाडा,
मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०९५

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
पी/ उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
पी/ उत्तर विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक १ फेब्रूवारी , २०१०
सुनावणीची तारीख १२/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस इस्टर्न मॉल मालाड (पूर्व) या वास्तूच्या बांधकामासंबंधीची माहिती पाहिजे होती. तसेच अनधिकृत बांधकामांविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईची माहिती सुध्दा अपीलार्थींनी मागितली होती.

अपीलार्थींचा अर्ज वाचला असता अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही इमारत प्रस्ताव विभागाकडे असावयास पाहिजे व त्या मुद्दयांची माहिती देण्यासाठी सदर अर्ज सुरुवातीलच जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे पाठवावयास पाहिजे होता.

अनधिकृत बांधकामासंबंधी अपीलार्थी स्वतः त्यांचेकडे असणारी माहिती देणार होते. तसेच

यासंदर्भात चौकशी पूर्ण करुन माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी अर्ज इमारत प्रस्ताव विभागाकडे त्वरित पाठवावा व त्या विभागाने अपीलार्थीस १५ दिवसांचे आत माहिती द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १२ मे, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४४५८०/अपील क्रमांक ५३९०/०२

श्रीमती श्रेयल जे. सिक्वेरा ----अपीलार्थी
विजय विहार कॉम्प्लेक्स, अ विंग,
रजनीगंधा, फ्लॅट नं. १०३, एव्हरशाईन सिटी,
वसई (पूर्व) जि. ठाणे.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
सहायक मनपा आयुक्त कार्यालय, के/ वेस्ट विभाग कार्यालय,
२ रा मजला, पालीराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
सहायक मनपा आयुक्त कार्यालय, के/ वेस्ट विभाग कार्यालय,
२ रा मजला, पालीराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

---*विवेचन*---

अपीलांचा दिनांक २५/११/२००९
सुनावणीची तारीख १६/२/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. १६/६/२००९ च्या माहिती अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीचे थोडक्यात स्वरुप खालीलप्रमाणे -

१. शांताराम हरी पेडणेकर चाळीतील भाडेकरुंची यादी.

२. क्षेत्रफळ

३. आय.ओ.डी व सी.सी. च्या प्रती.

४. सिटी सर्व्हे नंबर

५. अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

६. एम.आर.टी.पी. ची छायाप्रत इत्यादि.

सदर माहिती अर्जाला दि. २५/७/२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले. त्यानुसार त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस पुरविण्यात आली. परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर प्राप्त होण्याआधीच अपीलार्थी यांनी दि. २३/७/२००९ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. २९/८/२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर उत्तर देण्याबाबत दक्षता घ्यावी असे निर्देश देण्यांत येऊन अपील निकाली काढण्यात आले.

अपीलार्थींचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. लेखी निवेदनाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थींना पुरविलेली आहे. याबाबत आयोगाचे निदेश आहेत की, अनधिकृत बांधकामाबाबत कार्यालयाने पोलीस खात्याकडे दाखल केलेल्या तक्रारींच्या प्रती व त्या अनुषंगाने झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत अपीलार्थींना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १२ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७६३/अपील क्रमांक ५६६७/०२

श्री. कमाल अहमद खान ----अपीलार्थी
रुम नं. ३६/१, प्रबुध्द नगर, आर किडवई मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
एफ/दक्षिण विभाग, रुम नं. ३२,
डॉ. बी.ए.रोड, परळ, मुंबई ४०० ०१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (प.व दु.)
एफ/दक्षिण विभाग, डॉ. बी.ए.रोड, परळ,
मुंबई ४०० ०१२.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३ फेब्रूवारी , २०१०
सुनावणीची तारीख १२/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अर्जाच्या बाबतीत संबंधित रस्त्यावरील पुनर्वसन करावयाच्या प्रत्येक कुटुंबाची माहिती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. मात्र अपीलार्थीस आता त्याची एकत्रित स्वरुपात ज्यांना ज्यांना अल्टरनेट निवासस्थान देण्यात आलेले आहे त्याची एकत्रित स्वरुपात यादी पाहिजे.

अशी यादी वेगळयाने तयार केलेली नाही पण एम.एम.आर.डी.अे. अशा प्रकारची यादी एकत्रित स्वरुपात तयार करीत असते व ती उपयुक्तहि वाटते. हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी अशी यादी १० दिवसांत तयार करुन अपीलार्थीस देण्याचे मान्य केले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १३ मे, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६७६३/अपील क्रमांक ५६६९/०२**

**श्री. प्रकाश नवाथे ----अपीलार्थी**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. सोसायटी,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई १९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (सर्कल ४) ---उत्तरवादी**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**सोनावाला इमारत, शिंदेवाडी,**
**पालव मार्ग, दादर.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (एफ/एन)**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**सोनावाला इमारत, शिंदेवाडी,**
**पालव मार्ग, दादर.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ३ फेब्रूवारी , २०१०**
**सुनावणीची तारीख १२/५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीच्या या एकाच इमारतीबाबत त्याच त्याच मुद्दयांवर २० ते २५ अपीले आतापर्यंत आयोगाने ऐकलेली आहे. अपीलार्थीच्या अर्जामध्ये इमारत दुरुस्तीर व पुनर्रचना मंडळाने जी ५ व्या क्रंमाकाची अट घातली होती त्या अटीचे पालन झाले नसल्यास काय कारवाई करणार त्याची माहिती विचारली आहे.**

**यासंदर्भात वरील विषयाबाबतची संपूर्ण नस्ती अपीलार्थीस दाखविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी प्रस्तावित केले होते.**

महापालिकेकडे केलेले अर्ज व मंडळाकडे केलेले अर्ज जर एकत्रितपणे बघता सदरील बांधकामाला जरी ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिलेले नाही तरीहि इमारत पूर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला आहे असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी लिहून दिलेले दिसते. पण अटीचे पालन न झ ाल्यास कारवाई काय करणार याचे उत्तर अपीलार्थीस पाहिजे आहे. मात्र त्यासंबंधी कुठचीही कागदपत्रे नसल्यामुळे व इमारत पूर्ण होऊन ७/८ वर्षापूर्वीच सर्व गाळेधारक राहावयास गेले असल्यामुळे व इतरांची तक्रार नसल्यामुळे मंडळाने कांहीही कारवाई केलेली दिसत नाही.

कारवाई करावयाची किंवा नाही हा निर्णय सर्वस्वी मंडळाने घ्यावयाचा आहे व त्यासंबंधी आजघटकेला तरी कुठचीही कारवाई झालेली दिसत नाही. त्यामुळे अपीलार्थीस हवी असणारी कागदपत्रे व माहिती देता येत नाही अशी सद्यःपरिस्थिती आहे. यासंबंधी हवे तर मंडळाशी संबंधित नियंत्रण विभागाकडे अपीलार्थींनी दाद मागावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १३ मे, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६७६५/अपील क्रमांक ५६७०/०२**

**श्री. प्रकाश नवाथे ----अपीलार्थी**
**२०४, राजबाग, दलुचंद को.ऑप. सोसायटी,**
**२७१, सर भालचंद्र मार्ग, माटुंगा, मुंबई १९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक ---उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई शहर.**
**६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**मुंबई ४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक एफ/उत्तर**
**सहकारी संस्था, मुंबई शहर.**
**६ वा मजला, मल्होत्रा हाऊस, जी.पी.ओ.समोर,**
**मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ३ फेब्रूवारी , २०१०**
**सुनावणीची तारीख १२/५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी उपस्थित.**

**दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व प्रथम अपीलाचा निर्णय वाचला तर असे दिसून येते की, अपीलार्थीच्या अर्जासंबंधी प्रथम अपीलात प्रत्येक मुद्दयांवर उहापोह केलेला आहे. अपीलार्थीस रेकॉर्डला असलेली सर्व माहिती देण्यात आलेली आहे. मात्र अपीलार्थींच्या अर्जाचे स्वरुप स्पष्टीकरण मागणे, मत विचारणे किंवा आपण काय कारवाई करणार अशा पृच्छेच्या स्वरुपाचे आहे.**

**अपीलार्थींच्या तक्रारीच्या बाबतीत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत**

**कोणत्या पध्दतीने कारवाई होऊ शकते याचेहि मार्गदर्शन प्रथम अपीलीय आदेशात आढळते. मात्र जी कागदपत्रे अस्तित्वातच नाहीत ती कागदपत्रे देता येणार नाही. तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थापातळीवरची जी कागदपत्रे आहेत ती कागदपत्रे त्यांनी त्याच संस्थेचे ते स्वतः सदस्य असल्यामुळे सहकार कायद्याअंतर्गत घेऊ शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**

**दिनांक १३ मे, २०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७७६/अपील क्रमांक ५६७६/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६७७५/अपील क्रमांक ५६७७/०२
क्रमांक-मु.मा.आ/४६७७२/अपील क्रमांक ५६७८/०२

श्री. महेंद्र चव्हाण ----अपीलार्थी
८५/२, चाळके चाळ, ताडवाडी,
स्वदेशी मिल, सायन चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव ---उत्तरवादी
राज्य माहिती आयोग, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर, मुंबई ३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग, १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर, मुंबई ३२.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २८ जानेवारी , २०१०
सुनावणीची तारीख १३/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी ज्या पध्दतीने माहिती मागतात त्या पध्दतीने माहिती आयोगाच्या कार्यालयात रेकॉर्ड ठेवल्या जात नाही. तेव्हा ज्या ज्या संस्थेबाबतची माहिती अपीलार्थीस पाहिजे असेल त्या त्या संस्थेकडेच वेगळा अर्ज करणे हे जास्त योग्य राहिल.

मात्र आयोगाच्या सन २००९ च्या वार्षिक अहवालात आयोगाने ज्या शिफारसी केल्या आहेत त्याची प्रत अपीलार्थीस देण्यात यावी.

**तसेच कोणत्या व्यक्तींना दंड केलेला आहे त्याची यादी अपीलार्थीस पाठविण्यात यावी असे जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यांत आले.**

***----आदेश---***

**तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**
**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक १३ मे, २०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६७७४/अपील क्रमांक ५६७९/०२**

**श्री. रमाकांत मनमोहन पावसकर ----अपीलार्थी**
**२/२५, अब्दुल रजाक बिल्डींग,**
**जेरबाई वाडीया रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ---उत्तरवादी**
**मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण वॉर्ड,**
**डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (एम.ॲन्ड आर)**
**मुंबई महानगरपालिका, एफ/दक्षिण वॉर्ड,**
**डॉ. आंबेडकर रोड, परेल, मुंबई ४०० ०१२.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १ फेब्रूवारी , २०१०**
**सुनावणीची तारीख १३/५/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपील क्र. २००८/३१०१ मध्ये दि. १५/१०/२००८ रोजी या आयोगाने माहिती देण्यासंदर्भात काही आदेश दिलेले होते. त्यासंबंधी अपीलार्थींनी पुन्हा पाठपुरावा माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अर्जाद्वारेच केला आहे व त्यासंदर्भातील द्वितीय अपील आज आयोगासमोर आहे.**

**दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व सर्व कागदपत्रे बघितल्यानंतर जी माहिती द्यावयास पाहिजे होती ती अपीलार्थीस देण्यात आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी श्री. पावसकर यांना यापेक्षा अधिक माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे लिहून दिलेले आहे. तेव्हा अपीलार्थींचे जे प्रश्न असतील ते त्यांनी संबंधित उपआयुक्त**

यांच्या निदर्शनास आणून आपल्या प्रश्नांची सोडवणूक करुन घेणे हेच ईष्ट राहिल.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १३ मे, २०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७३३७/अपील क्रमांक ५६९२/०२

श्री. कौस्तुभ गोखले ----अपीलार्थी
सिध्दीविनायक प्रसाद, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी रोड,
डोंबिवली (पूर्व) ता. कल्याण, जि. ठाणे ४२१ २०१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-१२) ---उत्तरवादी
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-१२)
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २६ फेब्रूवारी , २०१०
सुनावणीची तारीख १४/५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस याअगोदरही अनेकदा सुनावणीस हजर राहण्यास पाहिजे याची जाणीव करुन देण्यांत आलेली आहे. तसेच अपवादात्मक परिस्थितीत उपस्थित न राहू शकल्यास तसे आयोगास कारणे देऊन कळविणे हेहि आवश्यक आहे याची पुन्हा जाणीव करुन देण्यात येत आहे.

अपीलार्थीस पुढील माहिती पाहिजे होती.

" उल्हासनगर परिक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याचा अध्यादेश दि. १४/१/२००६ तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याबाबत दि. २०/११/२००६ रोजीची विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदी यांचे वाचन होऊन खालीलप्रमाणे माहिती मिळावी.

१. संबंधित दोन्ही महानगरपालिका परिक्षेत्रातील जी अनधिकृत बांधकामे उपरोक्त

आदेशामुळे नियमानुकुल करण्यात आली आहे किंवा करण्यात येणार आहेत ती अनधिकृत बांधकामे कायद्यातील तरतुदींचे पालन करुन Due Process of Low प्रमाणे अनधिकृत घोषित करण्यात आली अथवा कसे याची माहिती मिळावी व केली नसल्यास तशी माहिती मिळावी.

२. संबंधित दोन्ही महानगरपालिका परिक्षेत्रातील जी अनधिकृत बांधकामे उपरोक्त आदेशामुळे नियमानुकुल करण्यात आली आहे किंवा करण्यात येणार आहेत ती अनधिकृत बांधकामे भारतीय संविधानातील मानवी हक्कांच्या तरतुदीमध्ये नमूद असल्याप्रमाणे मानवी राहणीमानास योग्य आहेत याची निश्‍चिती शासनाने संबंधित दोन्ही अध्यादेश काढताना केली अथवा कसे याची माहिती मिळावी व केली नसल्यास तशी माहिती मिळावी. "

जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक, स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची असल्यामुळे अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलार्थीस कळविलेले आहे. तसेच अपिलीय अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत शासन निर्णय, नियमांचे इंटरप्रिटेशन देणे अपेक्षित नाही असेहि नमूद केलेले आहे. त्याविरुध्दचे हे अपील आहे.

या दोन्ही मुद्दयांच्या बाबतीत शासनाचे परिपत्रक, अध्यादेश व नियमावली याच्या प्रती अपीलार्थीकडे आहेत. अपीलार्थीच्या प्रश्नांची उत्तरे सापडतील अशी कागदपत्रे असतील तरच ती देता येऊ शकतील. मात्र कागदपत्रे अपीलार्थीकडेच आहेतच आणि आवश्यकता असूनहि एखादया गोष्टीचा त्यात परामर्श घेतला गेला नसेल असे अपीलार्थीस वाटत असेल तर ते संबंधित प्राधिकरणाकडे /न्यायालयाकडे त्याची दाद मागू शकतात.

प्रथम अपिलीय आदेश हे त्यादृष्टीने योग्यच वाटतात. मात्र अपीलार्थीस हवे तर याविषयासंबंधातील संपूर्ण नस्ती व विशेष करुन नोटींग साईट ते स्वतः पाहू शकतात व त्यातील आवश्यक त्या EXCERPTS च्या प्रती त्यांना निश्‍चितपणे माहितीच्या अधिकाराखाली मिळू शकतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १४ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७५००/अपील क्रमांक ५६९५/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०१/अपील क्रमांक ५६९६/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०२/अपील क्रमांक ५६९७/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०३/अपील क्रमांक ५६९८/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०४/अपील क्रमांक ५६९९/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०५/अपील क्रमांक ५७००/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०६/अपील क्रमांक ५७०१/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०७/अपील क्रमांक ५७०२/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०८/अपील क्रमांक ५७०३/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५०९/अपील क्रमांक ५७०४/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५१०/अपील क्रमांक ५७०५/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७५११/अपील क्रमांक ५७०६/०२

श्री. अहमद ताज खान ----अपीलार्थी
रुम नं. २०, शिवसाई नगर,
चार्ली डिसोझा चाळीजवळ, सिंधी कॉलनीच्या मागे,
सेंट फ्रांसिस रोड, विलेपार्ले (पश्चिम) मुंबई ४०० ०५६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख ---उत्तरवादी
(पु.व.पु.) MUTP
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
३ रा मजला, एम.एम.आर.डी.ए.बिल्डींग,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा समाज विकास अधिकारी MUTP
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
एम.एम.आर.डी.ए.बिल्डींग,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

या १२ हि अपीलांची सुनावणी दि. १४/५/२०१० व १५/५/२०१० रोजी ठेवण्यांत आली होती. त्यावेळेला अपीलार्थी अनुपस्थित होते. त्यांच्या पत्त्यावर पाठविलेले पाकिट पोस्टाकडून परत

आलेले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी जागतिक बँकेच्या अधिका-यांसमवेत ते १४ व १५ या दोन्ही दिवशी व्यस्त असल्यामुळे सुनावणीस हजर राहू शकत नाहीत असे कळविले आहे.

या १२ हि अपीलांतील कागदपत्रांचे वाचन केले असता अपीलार्थीस, अपिलीय अधिका-यांनी माहिती दिल्याचा निर्वाळा दिलेला आहे, तर अपीलार्थी यांचे म्हणणे त्यांना माहिती मिळालेली नाही असे आहे.

अपीलार्थींनी ब-याच अपीलामध्ये कोणती माहिती दिलेली नाही हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही, व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द कारवाईची मागणी केलेली आहे.

कांही अर्जांच्या बाबतीत अपिलीय अधिकारी यांनी जी माहिती त्या जन माहिती अधिका-यांकडे नाही तर तो अपीलार्थींचा अर्ज ज्यांच्याकडे ती माहिती असू शकेल त्यांच्याकडे तो पाठवायचा आहे असेहि निर्देश दिलेले आहेत. तेव्हा या सर्व अपीलांच्या बाबतीत अपीलार्थींना बोलवावे. अपीलार्थींना ज्या मुद्दयांवर माहिती मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे असेल ते मुद्दे स्पष्टपणे अपिलीय अधिकारी यांच्यापुढे मांडावे व अपिलीय अधिका-यांनी तेवढया मुद्दयांपुरतीच माहिती दिलेली आहे किंवा नाही याची स्वतः खात्री करुन घ्यावी.

अपीलार्थीस हवे तर यासंबंधीचे सर्व रेकॉर्डहि दाखविण्यात यावेत, जेणेकरुन माहिती उपलब्ध असून सुध्दा दिलेली नाही हे आक्षेप घेता येणार नाहीत.

<u>*----आदेश---*</u>

१२ हि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

या १२ हि अपीलांच्या बाबतीत प्रथम अपिलीय अधिका-यांनी उपरनिर्दिष्ट निर्देशांचे पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७४९८/अपील क्रमांक ५७०९/०२

श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी
२ अ, सन & सी अपार्टमेंटस,
रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,
पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (मेंटेनन्स)
दक्षिण, के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

३. पेस्ट कंट्रोल ऑफिसर
के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक १५ मार्च, २०१०
सुनावणीची तारीख १५/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिका-यांचे आदेश पाहिले असता ते परिपूर्ण असून त्यात अपीलार्थींच्या मुळ अर्जाच्या संबंधात सद्य:स्थितीची संपूर्ण माहिती आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७४९८/अपील क्रमांक ५७०७/०२

श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी
२ अ, सन & सी अपार्टमेंटस,
रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
के/पश्चिम विभाग, पालिराम पथ,
बेस्ट स्टेशनसमोर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ व का)
के/पश्चिम विभाग, पालिराम पथ,
बेस्ट स्टेशनसमोर, अंधेरी (पश्चिम) मुंबई ५८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ मार्च, २०१०
सुनावणीची तारीख १५/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सन ॲन्ड सी सोसायटीच्या बाबतीत जी कंपाऊंड वॉल आहे त्यासंदर्भात वॉर्ड कार्यकारी अभियंता तथा अपिलीय अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता (बि.प्लॅन्स) यांचे रिमार्क मागवाववेत व वॉल ॲथोराईज्ड किंवा नियमानुकूल करण्यासारखी आहे किंवा कसे यासंबंधी ठरविण्यात यावे व कारवाई करावी असे निर्देश दिले. यापुढील परिस्थिती न कळल्यामुळे अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यात आले की, कार्यकारी अभियंता यांनी सदरील इमारतीचे प्लान्स त्या विभागास पाठविलेले आहेत व सोसायटीने कंपाऊंड वॉलच्या बाबतीत त्यांचे निवेदन दिलेले आहे ते विचाराधिन आहे.

निवेदनाची तपासणी करुन डि.सी. रेग्युलेशन प्रमाणे त्यावर निर्णय घेण्यात येईल.

सोसायटीकडून आलेले रिप्रेझेंटेशन व सद्य:स्थितीची माहिती अपीलार्थीस ७ दिवसांचे आत कळविण्याचे निर्देश देण्यांत आले.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७४९७/अपील क्रमांक ५७०८/०२

श्री. विजय के. चौव्हाण ----अपीलार्थी
२ अ, सन & सी अपार्टमेंटस,
रॉयल लेन, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम)
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभाग कार्यालय,
पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
दक्षिण, के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

३. वरिष्ठ निरीक्षक (लायसन्स)
के/पश्चिम विभाग, पालिराम पथ, बेस्ट स्टेशनसमोर,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५८.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १५ मार्च, २०१०
सुनावणीची तारीख १५/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

" अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि. २८/८/०९ रोजी या कार्यालयाकडे अर्ज केला होता. त्यात त्यांनी सन ॲन्ड सी अपार्टमेंट मधील अनधिकृत बांधकामाबाबत या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कारवाईचा प्रगती अहवाल मागितलेला होता. त्या अर्जाची या कार्यालयाने दक्षता घेऊन अर्जदारास पत्र क्र. सआ/केप/२५०६३/इ व का अन्वये दि. २५/९/०९ रोजी कळविलेले आहे.

सदरहू उत्तराने समाधान न झाल्याने अर्जदाराने सहायक आयुक्त (के/प) तथा अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दि. २५/११/२००९ रोजी केले होते. त्याची सुनावणी दि. ४/१/२०१० रोजी घेण्यात आली. सदरहू सुनावणीत अपिलीय अधिकारी यांनी मा. राज्य माहिती आयुक्तांच्या आदेशाचे पालन करण्यात यावे असे आदेश दिले होते.

मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या दि. २१/७/०९ रोजीच्या आदेशाचे या कार्यालयाने पालन करण्यासंबंधी सोसायटीतील इतर सभासदांस नोटीसीतील बांधकाम नियमित करण्याकरिता कळविलेले होते. सभासदांनी बांधकाम नियमित करण्याकरीता आवश्यक असलेले शुल्क भरलेले आहे. त्यामुळे पुढील योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल. तसेच एका बांधकामाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पुढील योग्य ती कारवाई मा.न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येईल.

उपरोक्त माहिती अपीलकर्ता यांना यापूर्वीच निदर्शनास आणून दिलेली आहे. "

अपीलार्थीच्या अर्जासंदर्भात सद्यःस्थितीची उपरनिर्दिष्ट माहिती अपीलार्थीच्या यापूर्वीच निदर्शनास आणलेली आहे हे लक्षात घेता पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ मे, २०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील .**

**क्रमांक-मु.मा.आ/२००९/४५८८३/अपील क्रमांक ५४८६/०२**

**श्री.डॉ.श्रीकांत प्रभू** **-----तक्रारदार**
**बी-२३, उदयानप्रभा, तेजपाल स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक** **----उत्तरवादी**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई.**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक**
**सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई.**
**मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ.समोर,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**डॉ. श्रीकांत एस.प्रभू, अपीलार्थी यांनी जन माहिती अधिका-यांकडे दि. २३/७/२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अर्ज करुन त्यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई कार्यालयात यापूर्वी जे विविध तक्रार अर्ज केले होते त्या तक्रार अर्जांच्या सद्य:स्थितीबाबत माहिती मागविली होती.**

**जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ४/५/२००९ रोजीच्या पत्राने उत्तर दिलेले आहे. परंतु सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी उक्त अधिनियमाच्या कलम १९(१)अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे दि. २८/८/२००९ रोजी अपील दाखल केले.**

**श्री. प्रभू, अपीलार्थी यांनी शास्त्रीनगर को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेबाबत मा.मंत्रीमहोदय/ व शासनाकडे विविध तक्रार अर्ज केले होते. सदर तक्रार अर्ज शासनाकडून प्राप्त झाल्यावर त्यावर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयाने काय**

कार्यवाही केली याबाबतची सद्य:स्थिती कळविण्याबाबत माहिती अर्जाद्वारे मागणी केली होती. श्री.प्रभू यांनी केलेल्या तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आल्या असून त्या कार्यालयाकडून अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याची सद्य:स्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस लेखी कळविली असून त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अहवाल देता आलेला नाही असा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात निष्कर्ष काढलेला आहे. त्याअनुषंगाने त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. ९/१०/२००९ च्या आदेशान्वये असे निर्देश दिले की, जन माहिती अधिका-यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना श्री. एस.एस.प्रभू यांच्या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदार श्री. प्रभू यांना कळविण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे उपरोक्त नमूद आदेश अपीलार्थीस दि. ६/११/२००९ रोजी प्राप्त झाले. सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्याच्या कारणास्तव अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि. १५/१२/२००९ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील सादर केले. त्यावर दि. १०/३/२०१० रोजी आयोगासमोर सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी अपीलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सहायक श्री.चंद्रशेखर डोंगरवार हे उपस्थित होते. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. संदिप आमणे) हे सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दुस-या दिवशी म्हणजे दि. ११/३/२०१० रोजी दुपारी ४-०० वा. ठेवण्यात आली व त्यावेळी स्वत: संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे निर्देश श्री. चंद्रशेखर डोंगरवार यांना देण्यात आले. दि. ११/३/२०१० रोजी देखिल जन माहिती अधिकारी उपस्थित राहू शकले नाहीत त्यामुळे पुढील सुनावणी दि. १७/३/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यादिवशी सुनावणीस अपीलार्थी तसेच श्री. संदिप आमणे , जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहायक निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई हे उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जातील मुद्दयांबाबत पुढीलप्रमाणे मुद्देनिहाय माहिती सादर केली ---

| मुद्दा | अर्जदार यांचे अर्जातील मुद्दे | केलेली कार्यवाही | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| १ | **Inspection of the information source u/s. ७ (४) of RTI** | माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७ (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विकलांग व्यक्तींनी तपासणीसाठी या कार्यालयाकडे अर्ज केलेला नाही. | ----- |
| २ | श्री.यु.जी.तुपे व श्री.संदिप आमणे यांनी विभागीय सहनिबंधक कार्यालयास सादर केलेल्या अंतीम अहवालाची प्रत | सोबत अहवालाची प्रत | ----- |
| ३ | वरील अहवालावर विभागीय सहनिबंधक, मुंबई मंडळ यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | सदर अहवालाच्या अनुषंगाने उपनिबंधक, (दक्षता कक्ष), मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दिनांक ९.०६.२००९ च्या अ.शा पत्रान्वये पाठविण्यात आलेला आहे. | सोबत दि. ९.०६.२००९ रोजीच्या अ.शा.पत्राची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे. |
| ४ | विभागीय सहनिबंधक कार्यालयानी काढलेल्या आदेशाचा भंग<br>झाल्यामुळे प्रशासका विरुध्द केलेली शिस्तभंगाची कार्यवाही | उपनिबंधक, सहकारी संस्था,म्हाडा,मुंबई यांचे कार्यालयाकडून प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती, याबाबत कार्यवाही उपनिबंधक, म्हाडा कार्यालयाकडून अपेक्षित आहे | ----- |
| ५ | श्री.एस.एस.प्रभू यांनी दि. ६.०७.२००९ रोजीचे आपल्या कार्यालयात दि.१३.०७.२००९ रोजी सादर केलेल्या माजी दोषी पदाधिकाऱ्याविरुध्द कार्यवाही बाबतच्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती द्यावी. | या कार्यालयाकडील दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये डॉ.प्रभू यांचा दि. ६.०७.२००९ चा अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना वर्ग करुन सदर अर्जावर उचित कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. | सोबत दि. १०.०८.२००९ रोजीच्या पत्राची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे. |
| ६ | विभागीय सहनिबंधक, मुंबई कार्यालयाची दि.१७.०७.२००९ ची पोहच घेतलेले डॉ.प्रभू यांचे **Adiministrator Shri Shankar Inderlkar letter of dated ७.०७.२००९ to Dr. S.S. Prabhu** सदर पत्रावरील विभागीय सहनिबंधक कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची | या कार्यालयाने उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांना दि. १०.०८.२००९ रोजी दिलेल्या पत्रासोबत डॉ.प्रभू यांचे सदर मुद्दांत नमूद केलेले पत्र पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेले आहे. | सोबत वरील पत्राची प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| | माहिती | | |
| ७ | चौकशी अधिकारी श्री.पी.पी.गोसावी यांनी उपनिबंधक,सहकारी संस्था, म्हाडा, यांना दि. १६.०६.२००९ ला सादर केलेल्या कार्यवाही वरील विभागीय सहनिबंधक, मुंबई मंडळ कार्यालयाने केलेली कार्यवाही माहिती | चौकशी अधिकारी श्री. पी.पी.गोसावी यांचा चौकशी अहवाल उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांचे कार्यालयाकडे सादर केला असून त्याची प्रत या कार्यालयाकडे उपलब्ध झालेली नाही | ----- |
| ८ | वरील ७ मुद्दांवरील कार्यवाही रिपोर्ट | वरील प्रमाणे | |
| ९ | जर कार्यवाही केलेली नसेल अथवा अपूर्ण कार्यवाही केली असेल त्याबद्दलच्या कारणाची माहिती द्यावी | श्री.एस.एस.प्रभू यांच्या प्राप्त होणाऱ्या अर्जावर वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे. | |
| १० | कार्यवाही न केल्यास अथवा अपूर्ण कार्यवाही केल्यास त्यास जबाबदार व्यक्तीचे नांव,पद व संपर्काचा पत्ता मला माहिती अधिकारात द्यावा. | लागू नाही | ------ |
| ११ | जबाबदार अधिकारी/व्यक्ती यांनी आपल्या वरील जबाबदारी टाळून कार्यवाही न करणे, चुकीची कार्यवाही करणे, अपूर्ण कार्यवाही करणे या कृत्याबद्दल वरील माणसावर झालेली अथवा होऊ घातलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी | अशा प्रकारे कार्यवाही केलेली नाही | ----- |
| १२ | दप्तर दिरंगाई कायदा २००६ अंतर्गत कलम १० (१) खाली वरील दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. | अशा प्रकारे कार्यवाही केलेली नाही | ------ |
| १३ | वरील माहिती शिवाय अतिरिक्त माहिती वरील १ ते १२ मुद्यांबद्दल | वरील प्रमाणे | ----- |
| १४ | वरील आदेश,तक्रारीचे निराकरण करण्याच्या दृष्टीने अपेक्षित कालावधीचे सविस्तर विवेचन व माहिती द्यावी | तक्रारीचे अनुषंगाने कार्यवाही करणे ही बाब वैधानिक स्वरुपाची असल्याने यास कालावधी निश्चीत करता येणे शक्य नाही. | ----- |

तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या दि. ९/१०/२००९ च्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना उद्देशून लिहिलेल्या दि. ३/११/२००९ च्या पत्राची प्रत अपीलार्थीसही अग्रेषित केली असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले.

अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच सुनावणीच्या वेळी मांडलेले म्हणणे लक्षात घेता येथे असे नमूद करण्यात येते की, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाकडे अपीलार्थी यांनी मागितलेली काही माहिती जर उपलब्धच नव्हती तर अशा प्रसंगी त्या कार्यालयास अपीलार्थी यांच्या दि. २३/७/२००९ रोजीचा माहिती अर्ज उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा या कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांकडे उक्त अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये हस्तांतर करणे सयुक्तिक ठरले असते.

जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस विहित मुदतीमध्ये दिली असल्याने तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांना पाठविलेल्या दि. ३/११/२००९ ची प्रत अपीलार्थीसही अग्रेषित केली असल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर कलम २० अन्वये शास्ती लादण्याबाबतची अपीलार्थी यांची मागणी मान्य करता येऊ शकत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक १५ मे, २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७४८१/अपील क्रमांक ५७१४/०२

श्रीमती. शकुंतला नंदा ----अपीलार्थी
शॉप नं२, गोरज श्रीजी, प्लॉट नं ६४,
गोरज-II , एल.टी. रोड. बोरीवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०९१

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी ----उत्तरवादी
बोरीवली, एम.एम.आर.डी.ए. इमारत,
१ ला मजला, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहा.नगर रचनाकार
बोरीवली, एम.एम.आर.डी.ए. इमारत,
१ ला मजला, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २५ फेब्रूवारी, २०१०
सुनावणीची तारीख १५/५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय निर्णयानुसार अपीलार्थीस सर्व कागदपत्रे दिलेली आहेत. मात्र अपीलार्थीस, त्यांना भरावयास सांगितलेली स्टॅम्पडयूटी व दंड हा चुकीचा आहे असे वाटत असेल व त्याबद्दल त्यांची परताव्याची मागणी असेल तर त्यांनी त्याबाबत स्टॅम्प ॲक्ट खाली संबंधित प्राधिका-यांकडे अपील करणे हे जास्त श्रेयस्कर राहिल.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक १५ मे, २०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२२४/अपील क्रमांक ५५४७/०२

श्री. वसंत शामराव उटीकर -----अपीलार्थी
तिरंगा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.
डी- २०/०:३, तळमजला, सेक्टर २५,
जुई नगर, नवी मुंबई ४०० ७०५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त ----उत्तरवादी
(मुख्यालय) विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

२. जन माहिती अधिकारी
विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

***---विवेचन---***

श्री.वसंत शामराव उटीकर यांनी दि. १/६/२००९ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी, विक्रीकर कार्यालय मुंबई यांचेकडे एकूण ६ मुद्दयांची माहिती मागविली असून त्या मुद्दयांमध्ये विक्रीकर निरीक्षक या संवर्गाच्या बदल्या, बढती, कार्यमुक्त करणे, बदली रद्द करणे इत्यादि आस्थापना विषयक बाबींचा समावेश आहे.

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा विक्रीकर उप आयुक्त (आस्थापना)यांनी दि. १४/७/२००९ रोजी मुद्देनिहाय उत्तर पाठविल्याचे दिसते. सदर आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. ३०/७/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलांत मुद्दा क्र. ७ चा नव्याने समावेश केल्याचे दिसते जो की माहिती अर्जात नव्हता.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि. १०/९/२००९ रोजीच्या आदेशान्वये आदेश

पारित केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपीलार्थीनी जन माहिती अधिका-यांकडे जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती प्रथम अपीलात देखिल मागणे अपेक्षित आहे. प्रथम अपीलामध्ये नव्याने प्रश्न अपेक्षित नाही असे कारण देऊन प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. २४/१२/२००९ रोजी माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दि. १९/३/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तथापि प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे वतीने विक्रीकर निरीक्षक उपस्थित होते.

अपीलार्थीनी दाखल केलेले द्वितीय अपील व सोबतची कागदपत्रे तसेच सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखावर जी माहिती उपलब्ध आहे तीच देण्यात येईल असे कळविले आहे. काही माहिती अभिलेख्यावर उपलब्ध नाही ती देता येणार नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या अनुषंगाने योग्य असे आदेश पारित करणे अपेक्षित होते. जी माहिती, माहिती अर्जात विचारलेली नाही ती वगळून इतर माहितीबाबत आदेशात स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक होते.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस काही माहिती दिली आहे. अपीलार्थीचे सदर माहितीने समाधान झालेले नाही. तरी त्यांनी मागितलेल्या कर्मचा-यांच्या बदली, बढती इत्यादि नस्त्यांचे अवलोकन करण्यास सांगून त्यांनी (गोपनीय अहवाल वगळता) हवी असलेली माहिती देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २०.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२३३/अपील क्रमांक ५५४६/०२

श्री. वसंत शामराव उटीकर -----अपीलार्थी
तिरंगा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.
डी- २०/०:३, तळमजला, सेक्टर २५,
जुई नगर, नवी मुंबई ४०० ७०५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त ----उत्तरवादी
(मुख्यालय) विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

२. जन माहिती अधिकारी
विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

*---विवेचन---*

श्री. वसंत शामराव उटीकर, यांनी दि. ३१/७/२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अर्जान्वये वेतन, प्रवासभत्ता, अंतीम वेतन प्रमाणपत्र, रजा आदेश, सेवापुस्तकातील नोंदी, संगणक अग्रीम व कार्यालयात रुजू होताना रुजू अर्जावर स्वाक्षरी करण्यास नकार देणे इत्यादि बाबतची माहिती मागितली होती.

श्री.उटीकर यांनी एकूण ८ मुद्दयांची माहिती मागितलेली असून त्यापैकी ७ मुद्दयांची माहिती विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशासन) नांदेड या कार्यालयाशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०/८/२००९ रोजी अपीलार्थीस माहिती अर्जाच्या अनुषंगाने नांदेड कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आल्याचे कळविले आहे.

सदर आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. १७/८/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २४/९/०९

रोजी प्रथम अपीलास उत्तर दिलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. २४/१२/०९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १९/३/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या सुनावणीस जन माहिती अधिकारी, अपीलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे वतीने विक्रीकर निरीक्षक उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १०/८/२००९ रोजीच्या पत्रान्वये निश्चित काय माहिती दिली याचा बोध होत नाही. कारण सदर पत्र अपीलार्थी किंवा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेले नाही. अपीलार्थी हे जवळ जवळ २०९ दिवस विनापरवानगी कार्यालयात गैरहजर असल्याचे दिसते व त्याबाबतचे त्यांचे रजेचे आदेश संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केल्याचे दिसून आले.

अपीलार्थींचे सदर माहितीने समाधान झाले नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यामुळे अपीलार्थीस जी माहिती मिळाली नाही असे वाटत असेल ती माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी चर्चा करुन उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना हवी असलेली माहिती विहित शुल्क घेऊन द्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २०.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६२३३/अपील क्रमांक ५५४९/०२

श्री. वसंत शामराव उटीकर -----अपीलार्थी
तिरंगा को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.
डी- २०/०:३, तळमजला, सेक्टर २५,
जुई नगर, नवी मुंबई ४०० ७०५.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त ----उत्तरवादी
(मुख्यालय) विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

२. जन माहिती अधिकारी
विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०.

*---विवेचन---*

श्री. वसंत शामराव उटीकर, नवी मुंबई यांनी दि. ४/८/०९ रोजीच्या माहिती अर्जान्वये आस्थापना अधिकारी, विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट)नांदेड यांचे कार्यालय, यांनी दि. ३/३/०९, २५/३/०९ , २०/४/०९ व दि. १/६/०९ अन्वये निर्गमित केलेले रजा ज्ञापन व सन २००७-२००८ व २००८-२००९ या कालावधीतील फॉर्म नं. १६ इत्यादी बाबतची माहिती मागविलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अपीलार्थीस दि. ९/९/२००९ च्या पत्रान्वये दिलेली आहे. त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून दि. १६/९/०९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०/११/०९ रोजी स्वयंस्पष्ट असे आदेश पारित केलेले आहेत.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी पारित केलेले आदेशाविरुध्द आयोगाकडे दि. २४/१२/०९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १९/३/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती.

**अपीलार्थींनी दाखल केलेले अपील व त्यासोबतची कागदपत्रे तसेच जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेली माहिती विचारात घेता मी असे आदेश देत आहे की, अपीलार्थींनी मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्यांत आली आहे. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखिल दि. ३०/११/०९ रोजी योग्य आदेश पारित केलेले आहेत त्या आदेशाशी मी सहमत आहे.**

***----आदेश---***

**अपीलार्थींचे अपील फेटाळण्यात येत आहे.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: २०.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६८६८/अपील क्रमांक ५६५२/०२

श्रीमती. आफताफ सिद्दिकी -----अपीलार्थी
४, सदानंद क्लासिक, प्लॉट नं. ५२८,
३३ वा रस्ता, खार (पश्चिम) मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एच/वेस्ट,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक ७ फेब्रूवारी, २०१०
सुनावणीची तारीख ११/५/२०१०

अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित, मात्र त्यांनी त्यांचे प्रतिवेदन पाठविलेले आहे. अपीलार्थी यांनी त्या येऊ शकणार नाहीत असे कळविले होते. मात्र ई.मेल ने त्यांचे म्हणणे सादर करीत असल्याचे त्यांनी सांगितले, मात्र अजूनपर्यंत असा ई.मेल प्राप्त झालेला नाही.

अपीलार्थीस त्यांच्या २० ऑक्टोबर, २००९ रोजीच्या अर्जाने त्यांनी नमूद केलेल्या कांही सिटी सर्व्हे नंबरवरील विकास प्रस्ताव व सर्व करस्पॉडंट यांच्या प्रती पाहिजे होत्या. सदरील सर्व नस्त्या या चाचणी व लेखा परिक्षक मुख्यालय यांच्याकडे चौकशीसाठी पाठविण्यात आलेल्या होत्या व त्या अजूनहि परत प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे अपीलार्थीस माहिती देता आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

अपीलार्थींचा मुळ अर्ज येऊन ७ महिने झालेले आहेत. जर चाचणी व लेखा परिक्षक

मुख्यालय यांच्याकडे चौकशीसाठी गेलेल्या नस्त्या अजूनहि परत आलेल्या नसतील तर त्या चाचणी व लेखा परिक्षक मुख्यालयाकडून एक आठवडयासाठी परत मागवून घेण्यात याव्यात व अपीलार्थीस त्या नस्त्या दाखवून त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात.

सदरील आदेशाची प्रत चाचणी व लेखा परिक्षक मुख्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई १ यांनाहि पाठविण्यात यावी.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/१८७८/अपील क्रमांक९१८ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१८७६/अपील क्रमांक ९२०/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१८७५/अपील क्रमांक ९२१/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/१८७९/अपील क्रमांक ९१७/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/३६८८/अपील क्रमांक ६०२/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/---- /अपील क्रमांक ४१८ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/५०६८/अपील क्रमांक ७००/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ज़ ४१६ ४१६

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा चेअरमन ----उत्तरवादी
लट्ठे एज्यूकेशन सोसायटी, टिंबर एरिया,
सांगली.

१. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
क.वा.महाविद्यालय, टिंबर एरिया, सांगली.
२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
क.वा.महाविद्यालय, टिंबर एरिया, सांगली.
३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
मथुबाई गखारे कन्या महाविद्यालय, सांगली.
४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
दमाणी हायस्कूल, चांदणी चौक, सांगली.

*---विवेचन---*

डॉ. ज्ञानचंद पाटील, रा. सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम १९(३) खाली दाखल केलेल्या अपीलांची सुनावणी सांगली येथे दि. ५/५/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपीलार्थी डॉ. पाटील तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी अंती खालीलप्रमाणे आदेश पारित

करण्यात आले.

| अ.क्र | अपील क्रं. | आदेश |
|---|---|---|
| १ | ९१८ | अपीलार्थींना त्यांच्या माहिती अर्जात उल्लेखलेली सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीशी संपर्क साधून पूर्व नियोजित वेळ निश्चित करावी. निरीक्षणाअंती अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांना ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या आहेत त्याचा तपशील द्यावा व या छायाप्रती अपीलार्थींना विनामूल्य पुरवाव्या. |
| २ | ९२० | उत्तरवादीच्या लेखी निवेदनानुसार अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. तथापि अपीलार्थींना माहिती परिपूर्ण वाटत नाही. यास्तव आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना पूर्व नियोजित वेळ निश्चित करुन सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावीत व अपीलार्थींना आवश्यकतेनुसार त्याच्या छायाप्रती विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. |
| ३ | ९२१ | अपीलार्थीच्या दि. १०/९/२००८ च्या माहिती अर्जातील माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे अपीलार्थींना अवलोकनार्थ उपलब्ध करुन द्यावी. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी संपर्क साधून सोयीची तारीख ठरवावी. आवश्यकतेनुसार अपीलार्थींना कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य पुरवाव्या. |
| ४ | ९१७ | अपीलार्थीनी सादर केलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, अपीलार्थींना मागितलेली माहिती एक महिन्याच्या आत मोफत देण्यात येईल. ही बाब विचारात घेऊन आयोगाचे निदेश आहेत की, अपीलार्थींना १ महिन्याच्या आत माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. |
| ५ | ६०२ | अपीलार्थीच्या दि. १८/१/२००८ च्या माहिती अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपीलार्थीनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की, माहितीशी संबंधित सर्व रेकॉर्ड अपीलार्थींना निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावा. अपीलार्थीनी त्याचे निरीक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांचा तपशील जन माहिती अधिकारी यांना द्यावा व यानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्याच्या छायाप्रती अपीलार्थींना विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. |
| ६ | ४१८ | अपीलार्थीनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व कागदपत्रे अपीलार्थींना निरीक्षणासाठी द्यावीत. आवश्यकते नुसार ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थींना हव्या आहेत त्याच्या छायाप्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनाशुल्य उपलब्ध करुन द्याव्यात. |
| ७ | ७०० | आयोगाकडे सुनावणीच्या वेळी सादर झालेल्या कागदपत्रांवरुन असे दिसते की, दि. ५/६/२००८ रोजी अपीलार्थींना अपुरी कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | दाखवावीत. अपीलार्थींना यातील ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या असतील त्या विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात. |

*----आदेश---*

उपरोक्त सातहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाच्या उपरनिर्दिष्ट निदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २१.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/५१८६/अपील क्रमांक ६३८/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ÷ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा आयुक्त ----उत्तरवादी
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(पा.पु.वि.)
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली.

***---विवेचन---***

डॉ. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील, सांगली यांनी दि. २८/१/२००८ च्या अर्जान्वये दि. ३/४/२००८ ते ३/७/०८ या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांचेकडे सांगली मनपा क्षेत्रातील एकूण घरगुती, व्यापारी ,औद्योगिक ,सार्वजनिक किंवा इतर वापरासाठी पाणी जोडणीची वार्ड निहाय संख्या, त्याची नोंदवही तसेच मीटर असलेल्या व नसलेल्या जोडण्यांची संख्या, पाणी बील आकारणीबाबतच्या अटी व शर्ती इत्यादी व आणखी ब-याचशा माहितीच्या नस्त्यांचे निरीक्षण करण्यासाठी दिनांक व वेळ कळविण्याची विनंती केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १५/२/०८ च्या पत्रान्वये निरीक्षणासाठीची वेळ व दिनांक (दि. २७/२/०८ रोजी दुपारी ४-००) कळविण्यात आला होता. सदर दिनांकास जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी दिल्ली येथे गेले असल्यामुळे निरीक्षण करता आले नाही.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि. २६/३/०८ च्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पा.पु) यांना असे निर्देश दिले की, अपीलार्थीनी मागणी केलेली

माहिती व फाईल्स पहाणेसाठी तयार ठेवून अपीलार्थीस पाहणी करण्याची वेळ व दिनांक ठरवून ते जी माहिती मागतील ती विनामूल्य द्यावी.

डॉ. पाटील यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. ४/५/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या सुनावणीस जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश देऊनहि जन माहिती अधिकारी यांनी आदेशाचे पालन केलेले दिसून येत नाही त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे. यापुढे माहिती अर्जावर विहित वेळेत कार्यवाही करावी. तसेच अपीलार्थीनी देखिल माहिती किती प्रमाणात मागावी याचा देखिल विवेक ठेवणे गरजेचे आहे. अपीलार्थींनी त्यांना हवी असलेली माहिती निरीक्षण करुन घेण्यासाठी त्यांना असलेली सोईची वेळ व दिनांक जन माहिती अधिकारी यांना कळवावा व अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती विनामूल्य देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २०१/१०

श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ -----अपीलार्थी
७३६, अन्सार रोड मालेगांव,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य)
शिक्षणाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २०/११/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०/११/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/७/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. श्री.गुरुदेव चैतन्य स्वरुप जंगलीदास हायस्कूल, कौळाणे (गा) ता. मालेगांव या शाळेची उच्चस्तरिय चौकशी करुन कर्मचारी वर्गावर होणारा अन्याय थांबवून दोषींवर कारवाई

करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांनी सुचविल्याप्रमाणे काय कारवाई केली याच्या अहवालाची प्रत.

२. संघटनेने माहिती अधिकाराखाली शासनाला संघटनेच्या तक्रारीवर काय कारवाई केली असता त्यांनी आपणाकडे सदर अर्ज पाठविला असता त्यावर आपण काय कारवाई केली त्याच्या अहवालाची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कोणत्याही प्रकारे माहिती दिली नाही त्यामुळे अपीलार्थींनी दि. २७/८/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावरही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही त्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान अपीलार्थींनी सांगितले की, दोन्ही अधिका-यांनी विहित कालावधी उलटून गेला तरी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस प्रथम अर्जावर १५ दिवसांत चौकशी करण्यांत येईल असे सांगितले होते. मात्र चौकशी अजून अपूर्ण आहे. १५ दिवसात चौकशी पूर्ण करण्यात येईल व कार्यवाहीबाबत अपीलार्थीस १५ दिवसात कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन दिले. त्याप्रमाणे अपीलार्थींनी मागितलेली माहिती ३० दिवसांत विनामूल्य देण्यांत यावी.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे अपील प्राप्त झाले नाही हे कारण सयुक्तिक वाटत नाही. त्यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना सूचना देऊन ती देण्यास भाग पाडणे आवश्यक होते. ही जबाबदारी त्यांनी टाळलेली आहे तरी यापुढे अशा अनावश्यक गोष्टी टाळाव्यात.

<u>*----आदेश---*</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २४.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २०४/१०**

**श्री. रमेश बी. अग्रवाल -----अपीलार्थी**
**१०७, इंद्रलोक, त्रिवेणी पार्क,**
**रिलायन्स फ्रेश समोर, जेल रोड, नाशिकरोड, नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी**
**नगर रचना विभाग, नाशिक महानगरपालिका,**
**नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी**
**अधीक्षक अभियंता (भु.ग.यो.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २२/१०/२००९**
**सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. रमेश बी. अग्रवाल यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २२/१०/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९/६/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली होती.**

१.	नाशिक मनपा क्षेत्रात मुख्य रस्त्यावरील किती हॉटेल्स , किती मॉल्स यांना फेनींग आहे.

२.	मनपा क्षेत्रात दूरसंचार व खाजगी कंपनीचे किती टॉवर्स आहेत. त्यांना कोणत्या नियमातील परवानगी दिली १ त्यांचे उत्पन्न यांची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३०/६/२००९ च्या पत्राद्वारे हॉटेल्स व मॉल्सच्या फेनिंगची माहिती कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नाही. तसेच नाशिक मनपा क्षेत्रातील दूरसंचार टॉवर्सची यादी व नियमावली याची माहिती उपलब्ध असून ती प्राप्त करुन घेण्यासाठी रु.८/- चा भरणा करावा असे अपीलार्थीस लेखी कळविले.

माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्याच्या कारणास्तव अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १२/८/२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु काही कारणास्तव ती रद्द झाली. तरीही अपीलार्थीस दि. २४/८/२००९ च्या पत्राद्वारे मुद्देसुद माहिती देण्यात आलेली दिसते.

अपीलार्थीनी असमाधानकारक व अपूर्ण माहिती मिळाली म्हणून द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती दिलेली आहे तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी फेनिंगबाबतच्या नियमावलीची प्रत देण्यांत आली असून फेनिंगबाबत योग्य नियोजन करुन बांधकामास नियमांचे पालन करुन परवानगी देण्यात येते हेहि त्यांच्या लेखी निदर्शनास आणलेले आहे. एकूण या प्रकरणांत अपीलार्थीस योग्य ती माहिती पुरविण्यात आली आहे. यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहेत.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २४.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २०८/१०

श्री. प्रशांत रमेश जाधव -----अपीलार्थी
बस स्टॅन्ड समोर, मु.पो. घोटी ,
ता. इगतपुरी, जि. नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तससिलदार ----उत्तरवादी
तहसिल कार्यालय इगतपुरी, ता. इगतपुरी,
जि. नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय इगतपुरी, ता. इगतपुरी,
जि. नाशिक.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २४/०९/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. प्रशांत रमेश जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २/०७/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. सौ. ए.एम. घळसासी , दुय्यम निबंधक वर्ग १, इगतपुरी यांचे गैरवर्तन व भ्रष्टाचाराच्या तक्रारीवरील केलेल्या कारवाईची माहिती, कारवाई करणा-या अधिका-याचे कार्यक्षेत्र

,नांव व पदनाम.

२. कारवाई अहवालाची छायांकित प्रत.

३. अधिका-याने कारवाई केली नसल्यास विलंबासंबंधीची कारणे.

४. शासन परिपत्रक दि १३/१२/९६ ची साक्षांकित छायाप्रत इत्यादि.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीनी केलेला अर्ज दि. २/७/२००९ चा अर्ज पत्र क्र. १६३/२००९ दि. ८/७/२००९ नुसार सदरची बाब तहसिल कार्यालयाच्या अखत्यारितील नसल्याचे कळवून अर्ज निकाली काढल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले.

अपीलार्थीनी केलेला अर्ज, जन माहिती अधिकारी यांनी परस्वर निकाली काढल्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी असल्याने त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आणण्यांत आले की, परंतु अपीलार्थीनी केलेली मूळ तक्रार मागे घेतली असल्याचे सुनावणीच्या वेळी सांगण्यात आले. अशा परिस्थितीत जर अपीलार्थीनी केलेली तक्रार मागे घेतली आहे. त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली आहे. कांही तक्रार राहिलेली नाही. या परिस्थितीत मी खालील आदेश पारित करीत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २४.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/३८३७६/तक्रार क्रमांक २६९/०१
क्रमांक-मु.मा.आ/२००९/----/तक्रार क्रमांक ४७७/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)
१३३/ सेक्टर ९, चारकोप, कादिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन) ----उत्तरवादी
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
(नवीन इमारत) सेंट जॉर्ज हॉस्पिटल परिसर,
छत्रपती शिवाजी टर्मिनल, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
(नवीन इमारत) सेंट जॉर्ज हॉस्पिटल परिसर,
छत्रपती शिवाजी टर्मिनल, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

तक्रारदारांच्या दि. १३ जानेवारी, २००९ च्या अर्जावर माझ्या दिनांक २९ एप्रिल २००९ च्या समक्रमांकाच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांच्या दि. १८/१०/२००८ रोजीच्या अर्जावर कार्यवाही करण्यास १०० दिवसांपेक्षा जास्त विलंब लागल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१)मधील तरतुदीनुसार कमाल मर्यादेच्या अधिन राहून रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) पर्यंतची शास्ती जन माहिती अधिकारी यांना का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा दि. १६ मे, २००९ रोजी समक्ष उपस्थित राहून सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आदेश मिळेपर्यंत तक्रारदारांस माहिती दिली नसल्यास त्याबाबतच्या स्पष्टीकरणाचा अंत:र्भावही खुलाश्यामध्ये करावा

असेहि निर्देश दिले होते.  त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे.
-

"  मी माजी सैनिक असून माहिती अधिकाराचा कट्टर पुरस्कर्ता आहे.  मी आरोग्य सेवा संचालनालयात दि. १/६/२००८ पासून मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी असून माझेकडे सर्व वर्ग १ ,वर्ग २ मधील १०५०० वैद्यकीय अधिका-यांची आस्थापना आहे.  तसेच राज्यातील वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/ कर्मचा-यांची सर्व न्यायालयीन प्रकरणे, लोक आयुक्त प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे, परिविक्षा कालावधी, विभागीय पदोन्नती समितीचे सदस्य सचिव म्हणून कामकाज ,भांडारविभाग, बदल्या तसेच संचालनालयातील लेखाविषयक बाबींचे नियंत्रण अधिकारी म्हणून कार्यभार, आरोग्य सेवा संचालनालयातील रचना व कार्यपध्दती, संचालनालयात माहितीसाठी व इतर अनुषंगिक कामासाठी येणा-या अधिकारी/ कर्मचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांची गा-हाणी ऐकणे व त्यांचे निराकरण करणे, मंत्रालयात व संचालनालयात होणा-या विविध बैठकांना उपस्थित राहणे, राज्यातील आरोग्य संस्थांचे पर्यवेक्षण व चौकशी संदर्भात दौरे, आरोग्य सेवा संचालनालयातील अधिका-यांची वाहतुक व्यवस्था या व अशा स्वरुपाची अनेक दैनंदिन कामकाज मला पहावे लागते.  त्याअनुषंगाने किमान ५० ते ५५ नस्ती दर तासाला माझ याकडे संबंधित कक्षांमार्फत सादर केल्या जातात.  माझ्या अधिपत्याखाली संचालनालयात १० प्रशासकीय अधिकारी कार्यरत असून ते सहायक माहिती अधिकारी म्हणून कामकाज करतात.

श्री. एस.के. नानगिया यांनी माहिती अधिकारांतर्गत केलेला अर्ज संचालनालयाकडे दि. ३१/१०/२००८ रोजी प्राप्त झालेला होता असे आवक शाखा यांनी अर्जावर मारलेल्या रबरी शिक्क्यावरुन दिसते.  सदरहू प्रकरण हे कक्ष २ अ (श्री.परदेशी, प्रशासकीय अधिकारी) यांच्या कक्षाने निर्गमित केलेल्या दि. २३/६/२००८ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने केलेले दिसते. त्यामुळे मी सदरहू पत्रावर २ अ "त्वरित माहिती द्यावी" असे नोंदवून दि. २४/११/२००८ रोजी श्री. परदेशी यांचे कक्षाकडे माहिती देण्यासाठी दिले.  याबाबतची नोंद कार्यालयाच्या आवक नोंदवहीमध्ये अनुक्रमांक २६३ नुसार घेतलेली दिसते.  असे असतानाही संबंधित कक्षाच्या प्रशासकीय अधिकारी श्री. एस.आर.परदेशी व त्यांचे कक्षाकडून माहिती देण्यास विलंब झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

श्री. नानगिया यांनी दि. ८/१२/२००८ रोजी केलेला अपील अर्ज या कार्यालयाकडे दि. २०/१२/२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आवक शाखेने मारलेल्या प्रस्तुत अपील अर्जावर मारलेल्या शिक्क्यावरुन दिसून येते. तथापि डिसेंबर महिन्यांत नागपूर येथे विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन असल्याने बहुतेक सर्व अधिकारी नागपूर येथे गेलेले होते. श्री. नानगिया यांचे अपील अर्जाचे अवलोकन केले असता सदर अर्ज अपिलीय अधिका-यांना उद्देशून पाठविलेला असल्याने सदरहू अर्ज माझ्याकडे टपालात आला नाही अथवा माझ्या पाहण्यातही आलेला नाही. त्यानंतर त्यांचे अपील अर्जावर अपिलीय अधिकारी श्री. नितीन पाटील यांनी या संचालनालयाचे प.क्र. संआसे/आस्था/मा.अ./श्री.नानगिया/टे-२/कक्ष५२००९ दि. २९/१/२००९ अन्वये श्री. नानगिया यांना दि. ९/२/२००९ रोजी दुपारी ३-०० वा. सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे कळविल्याचे दिसते. तथापि श्री. नितीन पाटील, अपिलीय अधिकारी यांनी दि. २६/२/२००९ रोजी अपील अर्जावर दिलेल्या आदेशाची प्रत जरी माहिती अधिकारी तथा मुख्यस प्रशासकीय अधिकारी म्हणजे मला मार्क केलेली आहे तरी सदरहू आदेश हे परस्पर दि. ६/३/२००९ रोजी कक्ष २ अ यांना दिल्याचे आवक नोंदवहीतील नोंदीवरुन दिसते.

आपले कार्यालयीन पत्र क्रमांक मुमाआ २००९/३८३७६/तक्रार २६९/०१ दि. १८/२/०९ या कार्यालयास दि. २४/२/२००९ रोजी प्राप्त झाल्याचे पत्रावर मारलेल्या आवक शाखेच्या शिक्क्यावरुन दिसून येते. तथापि सदरहू आदेशाचे अवलोकन केले असता ते पत्रावर माझी कोठेही स्वाक्षरी नसून ते आदेश माझ्यापर्यंत आलेलेच नव्हते. अन्यथा मी त्याचवेळी आपल्यासमोर सुनावणीस उपस्थित राहिलो असतो. तसेच आपले आदेश दि. १६/५/२००९ रोजी सकाळी ११-०० वाजता कार्यालयातील संबंधित कक्षाने दाखविले. वास्तविकपणे अपिलीय अधिकारी श्री. नितीन पाटील यांनी दि. १२/५/२००९ रोजी आपल्या कार्यालयात उपस्थित राहून जो खुलासा सादर केला त्यावेळी मला अवगत करणे आवश्यक होते. तथापि त्यांनी मला श्री. एस.के. नानगिया यांचेप्रकरणी मा. आयुक्तांकडे उपस्थित राहणेबाबत व निवेदन करण्याबाबत काहीही कळविलेले नाही. या प्रकरणाची नस्ती अपिलीय अधिकारी निवडणूक विषयक कामकाजास जाताना दि. १४/५/२००९ रोजी देऊन गेल्याचे संबंधित कक्षाने मला आज खुलासा करताना सांगितले आहे. परंतु सदरहू नस्ती

माझ्याकडे प्रत्यक्षात आज दि. १६/५/२००९ रोजी सकाळी ११-०० वाजता देण्यात येऊन श्री. नानगिया यांचेप्रकरणी मा.आयुक्तांकडे उपस्थित रहावयाचे आहे असे सांगून हस्तांतरित केली.

प्रस्तुत प्रकरणी मी नम्रपणे सांगू इच्छितो की, या प्रकरणी माझा व्यक्तिश: कोणताही दोष नाही. मा. आयुक्तांचे आदेशाचा अनादर करण्याचा कोणताही हेतू नाही. मी आजपर्यंत अत्यंत इमाने इतबारे व तत्परतेने काम केलेले असून माझ्या ३२ वर्षाच्या सेवेपैकी १५ वर्षे भारतीय वायूसेनेत नोकरी केलेली आहे. मी स्वत: एलएलएम असून कायद्याचा नितांत आदर करतो. याप्रकरणी माझा कोणताही दोष नसून मला याप्रकरणी कोणताही आर्थिक दंड करण्यात येवू नये ही नम्र विनंती. जर कळत नकळत माझ्या हातून काही चुक झाल्यास मी आपली क्षमायाचना करीत आहे. तसेच मा.आयुक्त याप्रकरणी जो काही आदेश देतील त्याचे मी पालन करण्यास कटीबध्द आहे. "

दि. १६/५/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी उपस्थित राहू शकणार नसल्याचे त्यांच्या दि. ११/५/२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. कारण त्यावेळी त्यांना निवडणूक निरीक्षक म्हणून आंध्रप्रदेश येथै नियुक्त केले होते.

मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार श्री. एस.के.नानगिया यांनी संचालनालयाकडे दि. १८/१०/२००८ अशी तारीख टाकून जो माहिती अर्ज केला आहे तो प्रत्यक्ष दि. ३१/१०/२००८ रोजी प्राप्त झाल्याचे जरी गृहित धरले तरी त्यांनी तो श्री. एस.आर.परदेशी, प्रशासकीय अधिकारी (कक्ष २ अ) यांना हस्तांतरित करायला दि. २४/११/२००८ ही तारीख उजाडली. अशाप्रकारे मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज हस्तांतर करायला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) मधील तरतुदीचा भंग केला आहे. त्यांनी माहिती अर्ज हस्तांतर करण्यासाठी ५ दिवसांची कालमर्यादा लक्षात घेता एकूण १९ दिवसांचा विलंब केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांचे निवेदन पाहता त्यांनी कालमर्यादा अतिशय काटेकोरपणे पाळावी अशी समज देण्यात येत आहे.

ज्यांच्याकडे दि. १८/१०/२००८ चा माहिती अर्ज हस्तांतर करण्यात आला ते संबंधित प्रशासकीय अधिकारी व त्यांचे सहकारी अधिकारी यांना दि. २४/११/२००८ रोजी अर्ज प्राप्त झाल्यापासून त्यांनी श्री. नानगिया यांना माहिती दिली आहे का १ दिली असल्यास नक्की कधी दिली १ या प्रश्नांची उत्तरे उपलब्ध कागदपत्रे तपासली असता आढळून येत नाहीत. वास्तविक या

मुद्दयांचा उहापोह प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या आदेशात करणे अपेक्षित होते. केवळ अपीलार्थी/तक्रारदार हे प्रथम अपीलाकरीता सुनावणीस उपस्थित नव्हते या कारणास्त प्रथम अपील निकाली काढण्याची त्यांची कृती सयुक्तिक म्हणता येणार नाही. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ११ मे २००९ रोजी आयोगास पत्र पाठवून जो खुलासा केलेला आहे त्यामध्ये देखिल अपीलार्थीस संचालनालयाकडून माहिती दिली गेली आहे अशा अर्थाचा कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही. दि. १८/१०/२००८ चा माहिती अर्ज सादर करुन आजमितीस ९ महिने उलटून गेले तरी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारांस अद्याप माहिती दिली नसल्याचे श्री. एस.के.नानगिया यांनी त्यांच्या दि.२७/७/२००९ च्या अर्जान्वये आयोगाच्या निदर्शनास आणलेले आहे. त्यावर आयोगाने प्रस्तुत प्रकरणी दि. २७/८/२००९ रोजी सुनावणी आयोजित केली होती. त्यावेळी तक्रारदार व जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी (श्री. व्ही.आर. भैसाणे) उपस्थित होते, प्रथम अपिलीय प्राधिकारी हे अनुपस्थित होते.

आयोगाच्या आदेशास अनुसरुन जरी तक्रारदारांस माहिती देण्यात आली असली तरी मुख्य मुद्दा हा संबंधित प्रशासकीय अधिका-यांनी माहिती तयार करण्यास लावलेला वेळ हा अनुत्तरीत राहतोच. याबाबत आयोग असे निर्देश देत आहे की, संचालक, आरोग्य संचालनालय यांनी वरील विलंबाची विभागीय चौकशी करावी व विलंबास जबाबदार असलेल्या अधिका-यांवर कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास ३ महिन्यात पाठवावा.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनाहि अशी समज देण्यात येत आहे की, अपीलकर्ते सुनावणीस हजर नव्हते या एका कारणास्तव गुणवत्तेवर निकाल न देता अपील खारीज करणे योग्य नाही. याची पुनरावृत्ती होता कामा नये.

***---आदेश---***

दोन्ही तक्रारी निकाली काढण्यात येत आहेत.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २५.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

क्रमांक-मु.मा.आ/२००९/४२८५५/तक्रार क्रमांक ४७५/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था (म)
१३३/ सेक्टर ९, चारकोप, कादिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (आरोग्य सेवा) ----उत्तरवादी
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, ५ वा मजला,
(नवीन इमारत) सेंट जॉर्ज हॉस्पिटल परिसर,
छत्रपती शिवाजी टर्मिनल, मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी
सह संचालक (आरोग्य सेवा) यांचे कार्यालय,
आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन,
(नवीन इमारत) सेंट जॉर्ज हॉस्पिटल परिसर,
छत्रपती शिवाजी टर्मिनल, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

श्री. एस.के.नानगिया यांनी सहसंचालक (आरोग्य सेवा) यांच्या कार्यालयाकडे दि. १५/५/२००९ च्या माहिती अर्जान्वये सहसंचालक यांचकडे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून एप्रिल २००७ ते माच २००८ व २००८- ०९ या दोन वर्षाच्या कालावधीत प्राप्त झालेल्या प्रथम अपीलांच्या अनुषंगाने एकूण सात मुद्दयांची माहिती मागवून त्यातील काही मुद्दयांशी संबंधित अभिलेखाची तपासणी करण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे नाव/पदनाम याचा पत्रात कुठेही उल्लेख न करता केवळ " संचालक, आरोग्य सेवा, मुंबईकरीता " असे संबोधून दि. २१ मे, २००९ रोजीच्या पत्र

क्रमांक आसेसं/आस्था/कक्ष-५/टे-२/श्री.नानगिया/मआअ०९ अन्वये श्री. नानगिया यांना असे कळविले की, " या संचालनालयात पाच सहसंचालक(आस्थापना, जिल्हास्तर, राज्यस्तर, खरेदी कक्ष, असंसर्गजन्य रोग) कार्यरत आहेत. तरी आपणांस नेमकी कोणत्या सह संचालकांचे अधिपत्याखालील कक्षाची अपीलाची माहिती आवश्यक आहे याचा बोध होत नाही. तरी आपणास वरील पाचपैकी कोणत्या सहसंचालकांच्या आस्थापनेची माहिती हवी आहे याचा सविस्तर तपशील या संचालनालयास सादर करावा, जेणेकरुन आपणास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करन देणे सुकर होईल. "

सदर पत्रास अनुसरुन श्री.नानगिया यांनी संचालक, आरोग्य सेवा यांना उद्देशून दि. १२ जून, २००९ रोजी उद्वेगानेच त्यांना काय अभिप्रेत आहे याचा खुलासा करणारे पत्र पाठविले.

दि. १५/५/२००९ रोजी माहिती अर्ज करुन दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटूनहि अद्याप माहिती मिळाली नसल्याने श्री. एस.के. नानगिया यांनी त्यांच्या दि. २७ जुलै, २००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे तक्रार केली. तक्रारीत त्यांनी असेहि नमूद केले आहे की, खरे तर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये माहिती न दिल्यास त्यांनी त्यांच्या वरील अधिका-यांकडे (प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे ) कलम १९(१) अन्वये अपील करणे आवश्यक होते. तथापि आजवरचा त्यांचा प्रथम अपिलीय प्राधिकारी याजकडून अपील निर्गत करण्यास होत असलेल्या विलंबाचा अनुभव लक्षात घेता त्यांनी अपील न करता आयोगाकडे कलम १८(१) अन्वये तक्रार करण्याचा पर्याय स्वीकारणे त्यांना भाग पडले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींकडे दुर्लक्ष करुन हेतूपुरस्सर अवमान करण्याची प्रवृत्ती बळावू नये म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी यांना मागणी केलेली माहिती तातडीने तक्रारदारास देण्याबाबत निर्देश देऊन त्यांच्यावर कलम २० अन्वये शास्ती लादण्यात यावी अशी मागणी तक्रारीत केली आहे.

सदर तक्रारीवर दि. २७/८/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार तसेच श्री. व्ही.आर.भैसाणे, जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २६ ऑगस्ट, २००९ च्या पत्र क्रमांक आसेसं/आस्था/कक्षछ५/टे-२/मा.अ.अ./श्री.नानगिया/अपील/०९ अन्वये जो खुलासा दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी अर्जाच्या उत्तर द्यावयाच्या कालावधीत मोठया प्रमाणावर (अंदाजे ११०० वैद्यकिय अधिकारी यांना पदस्थापना देण्याचे कामे, या आदेशाच्या पालनाची तपासणी, तसेच सुमारे १२०० अस्थाई वैद्यकिय अधिका-यांना कायम स्वरुपी शासकीय सेवेत समाविष्ट करण्याची कार्यवाही तसेच सार्वत्रिक बदल्या यामुळे अर्जदाराच्या अर्जास मुदतीत उत्तर देता आले नाही असे नमूद केले आहे. )

अर्जदारास अंतिमतः ४ सप्टेंबर, २००९ रोजी माहिती देण्यात आली आहे. बदल्यांच्या कामातील व्यस्तता हे कारण सर्वसाधारण आहे. इतर दोन कारणे अंशतःच फक्त विचारात घेता येण्याजोगी आहेत. मात्र अपीलांचे रजिस्टर व्यवस्थित ठेवले असते तर अर्जदारास त्वरित माहिती पुरविणे हेहि कठीण नव्हते हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना यापुढे काटेकोरपणे मुदतीचे पालन करण्याची समज देण्यात येत आहे.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २५.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/७०६६/अपील क्रमांक ६९८/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य ----उत्तरवादी
गुलाबराव पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
मिरज.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक
गुलाबराव पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज,
मिरज.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ७/९/२००८
सुनावणीचा दिनांक ५/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. ४/६/२००८ च्या माहिती अर्जाद्वारे दि. १/२/२००८ ते ४/६/२००६ या कालावधीची विविध मुद्दयांवर (एकूण ७ मुद्दे) माहिती मागितली. परंतु या अर्जाला प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी दि. ७/९/२००८ रोजी प्रथम अपील केले. दरम्यानच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/८/२००८ रोजी त्यांना माहितीप्रित्यर्थ एकूण ४३ छायाप्रती पुरविल्या.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी विहित मुदतीत प्रथम अपील अर्ज निकाली काढला नाही व माहिती मुदतीत दिली नाही या कारणास्तव आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रे व उत्तरवादीचे निवेदन याचे

अवलोकन केले असता असे दिसून आले की,  अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे व त्यासाठी रु. २६/- इतके शुल्क आकारण्यात आले आहे.

अपीलार्थींच्या दि. ३०/६/२००८ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र. १ व १० ची माहिती अद्याप देण्यात आलेली नाही असे अपीलार्थींनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

या सर्व बाबींचा विचार करता आयोगाचे असे निदेश देण्यात येत आहेत की, अपीलार्थींना उर्वरित माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विनाशुल्क देण्यात यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य  मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २५.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/२७२८/अपील क्रमांक ९७३/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली -- ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा सरकारी वकील ----उत्तरवादी
जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालय,
राजवाडा, सांगली.

२. जन माहिती अधिकारी
जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालय,
राजवाडा, सांगली.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक २३/३/२००९
सुनावणीचा दिनांक ५/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. १९/११/२००८ च्या माहिती अर्जाद्वारे दि. १२/१०/२००५ ते १/११/२००८ या कालावधीची विविध मुद्दयांवर माहिती मागितली. या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दि. २४/११/२००८ रोजी उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/१२/२००८ रोजी प्रथम अपील केले. अपील अर्जाला कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नाहीत हे कारण नमूद करुन दि. २३/१२/२००८ च्या पत्रान्वये त्यांचे अपील फेटाळण्यात आले. यानंतर अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की,

माहितीच्या शुल्कापोटी प्रत्येक पानाच्या छायाप्रतीसाठी रु. १०/- या प्रमाणे आकारणी केली आहे. वास्तविक पाहता ती आकारणी रु. २/- प्रती पान अशी करावयास हवी होती. तेव्हा याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थीकडून जादा आकारण्यात आलेले शुल्क त्यांना परत करण्यात यावे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः २५.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक २३९/१०

श्री. अच्युत जनार्दन इनामदार -----अपीलार्थी
दिव्य दर्शन सोसायटी, बी-९,
विसे मळा, कॉलेज रोड, नाशिक.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र,
नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ५/१०/२००९
सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री. अच्युत जनार्दन इनामदार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५/१०/०९ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०/०८/२००९ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली.

१. नाशिक परिक्षेत्रात असलेल्या मोटार परिवहन विभागाबाबत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत.
२. सील केलेल्या स्पेअर पार्टसबाबत केलेल्या चौकशी अहवालाची प्रत.

३. स्टॉक इंडेड ४/२००४ मधील आयशर प्लेट व क्लच प्लेट बाबत पवार ऑटो यांनी दिलेले प्रमाणपत्राबाबत चौकशी अहवालाची प्रत.

४. मंजूर अनुदानापेक्षा जादा आलेल्या खर्चाच्या विवरणपत्राची प्रत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ७/९/२००८ च्या पत्राद्वारे मुद्दा क्र.१ माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (१) (ज) अन्वये तसेच महाराष्ट्र राज्य लाचलुचपत विरोधी केंद्र कार्यपध्दती सुचना व नियमावली मधील नियम १० अन्वये गुप्त चौकशी व उघड चौकशी जी प्रकरणे गोपनीय समजण्यांत येतात या कारणास्तव अपीलार्थीस माहिती देता येत नाही असे कळविले. त्या विरोधात अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये असे सांगण्यात आले की, मोटार परिवहन विभागातील हलक्या व खोटया बनावटीचे स्पेअर पार्टस संदर्भात चौकशी प्रकरण ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना मूळ कागदपत्रांसह सादर केले आहे. ते प्रकरण विचाराधीन आहे. या व्यतिरिक्त मुद्दा क्र. १ ते ४ मुद्दयावरील माहिती ही केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ चे कलम ८(१) (ज) व (ञ) अन्वये देता येणार नसल्याचे सांगितले. या विरोधात अपीलार्थीनी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी मुख्य सुनावणीच्या वेळी गैरहजर राहिल्याने त्यांचे याबाबत काय म्हणणे होते हे समजू शकले नाही. परंतु चौकशीच्या बाबतीत अजून अंतिम निर्णय न झाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणांत केलेली कृती योग्य असून तसे अपीलार्थीस यापूर्वी कळविलेले आहे. मात्र चौकशीच्या बाबतीत ब्युरोचा निर्णय झाल्यानंतर अपीलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यांत यावी. त्या अनुषंगाने मी खालील आदेश पारित करीत आहे.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २५.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/१८/अपील क्रमांक८७८ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/५८७/अपील क्रमांक ९८५/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/३६८४/अपील क्रमांक ५९७/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/----/अपील क्रमांक १५२३/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/----/अपील क्रमांक ४१८/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/---- /अपील क्रमांक १५२२ /०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक ----उत्तरवादी
(उच्च शिक्षण) विद्यानगर कोल्हापूर.

१. जन माहिती अधिकारी
सहसंचालक (उ.शि) यांचे कार्यालय,
विद्यानगर, कोल्हापूर.
२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज,
राजनेमी आवार, टिंबर एरिया, सांगली.
३. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
मथुबाई गरवाारे कन्या महाविद्यालय, सांगली.
४. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उ.शि.) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
विभागीय सहसंचालक(उ.शि) राजाराम कॉलेज परिसर,
विद्यानगर, कोल्हापूर.

*---विवेचन---*

डॉ. ज्ञानचंद पाटील, रा. सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम

१९(३) खाली दाखल केलेल्या अपीलांची सुनावणी सांगली येथे दि. ४/५/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपीलार्थी डॉ. पाटील तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी अंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

| अ.क्र | अपील क्रं. | आदेश |
|---|---|---|
| १ | ८७८ | सुनावणीच्या वेळी आयोगाने अपीलार्थी व उत्तरवादींचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच दोन्ही पक्षांनी सादर केलेल्या निवेदनाचे अवलोकन केले. याचा विचार करुन आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींच्या मुळ माहिती अर्जानुसार एकूण ५ मुद्दयांवरील माहिती अपीलार्थींना विनामूल्य पुरविण्यात यावी. तसेच माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन नेमकी काय माहिती त्यांना हवी आहे याचा उलगडा होऊ शकेल. आवश्यकतेनुसार कागदपत्रांच्या छायाप्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना विनाशुल्क पुरवाव्यात. |
| २ | ९८५ | सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपीलार्थींनी मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत अधिनियमाच्या कलम ६(३)नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींचा मुळ अर्ज ५ दिवसाच्या आंत ज्या जन माहिती अधिका-यांकडे माहिती उपलब्ध होऊ शकली असती त्यांच्याकडे माहितीचे मुद्दे विनिर्दिष्ट करुन वर्ग करावयास हवा होता. परंतु तसे केल्याचे आढळत नाही. तरी याबाबत भविष्यात दक्षता घ्यावी. याबाबत आयोगाचे आता असे निदेश आहेत की, अपीलार्थींच्या मूळ माहिती अर्जानुसार नेमकी कोणती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आहे याचा शोध घ्यावा व ती अपीलार्थींना विनामूल्य पुरवावी. जी माहिती उपसंचालक कार्यालयात उपलब्ध नाही ती विनिर्दिष्ट करुन ती ज्या कार्यालया कडे उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडून त्वरित मागवून घेऊन अपीलार्थींना शुल्क न आकारता पुरवावी. |
| ३ | ५९७ | उत्तरवारींच्या कथनानुसार अधिनियमाच्या कलम ४ नुसार कार्यालयाने त्यांच्या वेबसाईटवर माहिती प्रसिध्द केलेली आहे. तेव्हा अपीलार्थींनी ती बघावी व याउपर त्यांना आणखी काही माहिती हवी असेल अथवा कागदपत्रांचे निरीक्षण करावयाचे असेल तर त्यांनी तसे जन माहिती अधिकारी यांना लेखी द्यावे. अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या. |
| ४ | १५२३ | अपीलार्थींच्या कथनानुसार त्यांना त्यांच्या मागणीनुसार संपूर्ण माहिती मिळालेली नाही. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की, जन माहिती |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी तारीख व वेळ मुक्रर करुन अपीलार्थींना कार्यालयात बोलवावे व त्यांना सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. निरीक्षणाअंती ज्या कागदपत्रांच्या छायाप्रतींची अपीलार्थी मागणी करतील त्या त्यांना विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. |
| ५ | ४१८ | अपीलाशी संबंधित कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसते की, जन माहिती अधिकारी अपीलार्थींना माहिती देण्यास तयार आहेत. तेव्हा आयोगाचे असे निदेश आहेत की, अपीलार्थींना सर्व कागदपत्रे पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावीत व अपीलार्थींना त्यातील ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या आहेत त्या जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या. |
| ६ | १५२२ | अपीलावरील सुनावणीच्या वेळी उत्तरवादीतर्फे असे सादर करण्यात आले की, अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. तथापि अपीलार्थींच्या कथनानुसार त्याला अपुरी माहिती मिळालेली आहे. याचा विचार करता आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थींनी त्यांना जी माहिती मिळालेली नाही ती विनिर्दिष्ट करावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ती विनामूल्य पुरवावी. |

उपरोक्त सहाहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाच्या उपरनिर्दिष्ट निदेशानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २६.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/३०९८/अपील क्रमांक९८६ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/३०९५/अपील क्रमांक ९८९/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/---- /अपील क्रमांक १६२२/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ‌ ४१६ ४१६

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक ----उत्तरवादी
सोमवार पेठ, कोल्हापूर.

जन माहिती अधिकारी
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
सोमवार पेठ, कोल्हापूर.

*---विवेचन---*

डॉ. ज्ञानचंद पाटील, रा. सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम १९(३) खाली दाखल केलेल्या अपीलांची सुनावणी सांगली येथे दि. ४/५/२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपीलार्थी डॉ. पाटील तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी अंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

| अ.क्र | अपील क्रं. | आदेश |
|---|---|---|
| १ | ९८६ | अपीलार्थीच्या दि. ६/४/२००९ चे अपील व सुनावणीच्या वेळी अपीलार्थीनी सादर केलेले लेखी निवेदन विचारात घेऊन असे निर्देश देण्यांत येतात की, अपीलार्थीना त्यांनी मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी व त्यांच्या मागणीनुसार त्यातील कागदपत्रांच्या छायाप्रती विनाशुल्क जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्याव्या. |

| | | |
|---|---|---|
| २ | ९८९ | सुनावणीच्या वेळी अपीलार्थींनी दिलेले लेखी निवेदन व उत्तरवादीनी सादर केलेला खुलासा बघता आयोगाचे असे निर्देश आहेत की, अपीलार्थीच्या मूळ माहिती अर्जानुसार त्यांना जी माहिती अद्याप देण्यात आलेली नाही ती जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क पुरवावी. अपीलार्थीच्या दि. ५/२/२००९ च्या प्रथम अपील अर्जावर दि. १/६/२००९ रोजी म्हणजे विलंबाने सुनावणी घेण्यात आली आहे. याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांना आयोगाचे असे निर्देश आहेत की, प्रथम अपील अर्जावरील सुनावणी अधिनियमात विहित केलेल्या कालमर्यादेत घेतली जाईल याची त्यांनी दक्षता घ्यावी. |
| ३ | १६२२ | अपीलार्थीच्या कथनानुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपुरी माहिती पुरविलेली आहे. आयोग याबाबत असे निर्देश देत आहे की, अपीलार्थीच्या मुळ माहिती अर्जात मागितलेल्या माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. अपीलार्थींनी त्याची सखोल पाहणी करावी व त्यातील ज्या कागदपत्रांच्या त्यांना छायाप्रती हव्या आहेत त्याची यादी त्यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावी. या यादीनुसार जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थींना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या. |

उपरोक्त तीनहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
आयोगाच्या उपरनिर्दिष्ट निदेशानुसार संबंधितांनी पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: २६.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/अपील/सीआर क्रमांक १८१/१०**

**श्री. डी. एस. रत्नाकर -----अपीलार्थी**
**मु.पो. डुबेरे, ता. सिन्नर, जि. नाशिक.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार ----उत्तरवादी**
**तहसिल कार्यालय सिन्नर, ता. सिन्नर,**
**जि. नाशिक.**

**२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ११/०९/२००९**
**सुनावणीचा दिनांक १८/०५/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थी श्री. डी. एस. रत्नाकर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११/०९/०९ रोजी द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा नाशिक येथे दि. १८/५/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८/०५/२००९ रोजी अर्ज करुन मौजे वडगांव सिन्नर येथील ग.नं. २४९ वरील नो.नं. २८४१ तक्रार अर्ज नसतांना रद्द करण्यात का आला व नो.नं. २८३४,२८३५ बाबत कायदेशीर तक्रार दाखल केली असतांना कशाच्या आधारे मंजूर करण्यांत आली १ यात श्री. सांबाळे यांना संधी देण्यात आली का आलीच नाही याची माहिती माहितली होती.**

जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्ज उशीरा प्राप्त झाला असे नमूद केले असले तरी तहसिलदार यांनी सदर माहिती तलाठी दप्तराशी संबंधित असल्याने तो अर्ज तलाठी कार्यालयांत वर्ग केला. तलाठी कार्यालयाने माहिती उपलब्ध असून योग्य ती फी आकारुन हवे असलेली कागदपत्र देण्यात येतील असे अपीलार्थीस कळविण्यांत आले होते. परंतु अपीलार्थीनी कोणतेच उत्तर दिलेले नाही. तरीही अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. त्यावेळी अपीलार्थी व सामनेवाले हजर होते. त्यावेळी अपीलार्थीस सर्व बाब समजावून सांगण्यात आली व त्यांना हवे असलेले माहितीची संचिका बघणेकामी पत्र पाठविले होते. तसेच शासकीय अधिका-यानी अपीलार्थीस माहिती पुरविण्याची तयारी दाखविली होती. तरीही ते कार्यालयात हजर झाले नाहीत. परंतु अपीलार्थी यांनी माहिती पुरविली म्हणून द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी अनुपस्थित होते. अपीलार्थीच्या अनुपस्थितीमुळे त्यांचे म्हणणे काय आहे हे समजू शकले नाही. परंतु एकंदरीत या प्रकरणी माहिती देण्यास उशीर झाला असला तरी त्याला अपीलार्थीही तेवढेच जबाबदार आहेत. हव्या असलेल्या माहितीचे अवलोकन करण्यास वेळ नाही, फी भरु शकत नाहीत आणि सुनावणीस हजरही राहू शकत नाहीत. अशा परिस्थितीत त्यांनी कार्यालयीन कामाचा वेळ फुकट घालविला आहे असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतलेली असतांनाही अपीलार्थीनी त्यांना सहकार्य करणे आवश्यक होते. परंतु तसे घडलेले नाही. तरी अपीलार्थीस अजूनहि हवी असेल तर ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत विनामूल्य पुरवावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २८.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/८५३०/अपील क्रमांक७६३ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/८५३४/अपील क्रमांक७६४/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/८५३१/अपील क्रमांक ७६६/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/८५३२ /अपील क्रमांक७६७ /०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/ ८५३५/अपील क्रमांक ७६९ /०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ----उत्तरवादी
महात्मा गांधी ग्रंथालय,
६१, महावीर नगर, सांगली.

जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल
महात्मा गांधी ग्रंथालय,
६१, महावीर नगर, सांगली.

*---विवेचन---*

डॉ. ज्ञानचंद पाटील, रा. सांगली यांनी एकूण ५ माहितीच्या अर्जांद्वारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेन जानेवारी २००८ बाबत जमाखर्च, वाहन व्यवस्था, कार्यालयीन कामकाज, अल्पोपहार व भोजन इत्यादि विविध विषयांवरील माहितीची मागणी केली होती.

उपरोक्त अर्जांना समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी प्रत्येक प्रकरणी प्रथम अपील केले. यानंतर त्यांना माहिती मिळाली नाही या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली.

सर्व अपीलांची एकत्रित सुनावणी आयोगापुढे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी उत्तरवादीतर्फे असे सादर करण्यात आले की, महात्मा गांधी ग्रंथालयाचा अखिल भारतीय साहित्य

संम्मेलनाच्या आर्थिक व्यवहाराशी कांही संबंध पोहोचत नाही. ग्रंथालयाने अखिल भारतीय साहित्य सम्मेलनाचे प्रायोजकत्व साहित्य परिषदेने ग्रंथालयाला केलेल्या विनंतीनुरुप स्वीकारले. ग्रंथालयाने प्रायोजक म्हणून भूमिका निभावली. त्याचा साहित्य संमेलनाच्या आर्थिक व्यवहाराशी संबंध नाही. अपीलार्थीनी त्यांच्या अपील अर्जात उपस्थित केलेले मुद्दे व उत्तरवादींनी सादर केलेली लेखी निवेदने याचे अवलोकन करुन आयोगाचे असे निर्देश आहेत की, ग्रंथालय व अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे आयोजक यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे अपीलार्थींना या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी. अपीलार्थींनी निरीक्षणांअंती ज्या कागदपत्रांच्या छायाप्रतीची त्यांना आवश्यकता आहे त्याचा तपशील जन माहिति अधिकारी यांना द्यावा व जन माहिति अधिकारी यांनी छायाप्रती विनाशुल्क पुरवाव्या.

***----आदेश---***

पांचहि अपले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाच्या उपरनिर्दिष्ट निदेशानुसार संबंधितांनी पुढील कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः २८.५.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७३३९/अपील क्रमांक ५७२१/०२

श्री. नितीन गवाणकर ----अपीलार्थी
०५, गवाणकर निवास, साईकृपा बिल्डींगसमोर,
शिववल्लभ रोड, दहिसर, मुंबई ४०० ०६८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता ----उत्तरवादी
इमारत प्रस्ताव- प/उ २,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,
९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदिवली (पूर्व)

२.जन माहिती अधिकारी
इमारत प्रस्ताव- प/उ २ कार्यालय,
महापालिका इमारत, सी विंग, संस्कृती कॉम्प्लेक्स,
९० फूट डी.पी.रोड, सेंट लॉरेन्स शाळेजवळ,
कांदिवली (पूर्व)

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २२/०२/२०१०
सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार अपीलार्थींनी स्वतः संबंधित धारिकेचे निरीक्षण करुन दि. ६/२/२०१० रोजी निवडलेली कागदपत्रे प्राप्त करुन घेतलेली आहेत.

अपीलाच्या मुद्दयांत त्यांनी ॲक्शन टेकन रिपोर्ट दिलेला नाही असे लिहिलेले आहे. जर कागदपत्रांत ॲक्शन टेकन रिपोर्ट असेल तर तो देता येऊ शकेल. माहितीच्या बाबतीत जर ते

कागदपत्रांततच नसतील तर ते अर्थातच देता येणार नाही.  अपीलार्थींनी स्वतः नस्तीची पाहणी करुन त्यातील कागदपत्रांची निवड केली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २९.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४७३३८/अपील क्रमांक ५७२२/०२**

**श्री. दत्ताराम माने ----अपीलार्थी**
**२८-अ/१९७२, अभ्युदय नगर,**
**काळाचौकी, मुंबई ४०० ०३३.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**के.ई.एम. हॉस्पीटल, परेल,**
**मुंबई. ४०० ०१२.**

**२.जन माहिती अधिकारी**
**के.ई.एम. हॉस्पीटल, परेल,**
**मुंबई. ४०० ०१२.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/०२/२०१०**
**सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**श्री. दत्ताराम माने यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दि. ५/१/२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज करुन चंद्रकांत वसंत तुळसकर या रुग्णाच्या उपचारांविषयी माहिती मागितली होती. रुग्णसेवा विषयक संकेत आहेत की, रुग्णाला झालेला आजार व उपचार याविषयी माहिती स्वतः रुग्णाची किंवा त्याच्या जवळच्या नातेवाईकाची इच्छा असल्याखेरीज जाहिर केली जात नाही. याबाबत रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकांशी पत्र क्र. केइएम/१०४३/एमआरडी दि. १६/११/२००९ अन्वये संपर्क साधून त्यांची याबाबत परवानगी आहे किंवा कसे याची विचारणा केली होती, परंतु त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने माहिती देण्यात आली नव्हती. त्यामुळे अपीलार्थी हे रुग्णाचे जवळचे नातेवाईक नाहीत या कारणास्तव माहिती नाकारण्यात आली होती व त्याच आधारावर प्रथम अपीलावर अपिलीय अधिकारी यांनी**

तोच निर्णय कायम ठेवला होता.

वरील निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

रुग्णावर झालेले उपचार ही वैयक्तिक बाब आहे. आणि तसेच ठोस सार्वजनिक स्वरुपाचे कारण असल्याशिवाय अशा प्रकारची माहिती न देण्याची जन माहिती अधिका-यांची कृती ही योग्यच आहे असे आयोगास वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २९.५.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७४३८/अपील क्रमांक ५७२३अे/०२
क्रमांक-मु.मा.आ/४७४३८/अपील क्रमांक ५७२३बी/०२

श्री. जी. सी. अग्रवाल ----अपीलार्थी
६४, अमिता बिल्डींग, १३ वा मजला,
जनरल जे.बी. मार्ग, यशवंतराव चव्हाण ओडोटोरियमसमोर,
मुंबई ४०० ०२१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ २, मुंबई .

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक १५ मार्च, २०१०
सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०

सदरील दोन्ही अपीलांची सुनावणी दि. २९/५/२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींना जी माहिती जन माहिती अधिकारी दक्षिण प्रादेशिक विभाग यांच्याकडून पाहिजे होती ती माहिती कोर्टात आहे व ती कोर्टाकडून घ्यावी असे कळविल्यावरुन अपीलार्थींनी कोर्टामध्ये अर्ज केला व कोर्टाने, या केसच्या बाबतीत अे-समरी दिलेली आहे व यातील कोणताही ओरिजिनल रेकॉर्ड आता कोर्टामध्ये नाही, त्यामुळे अपीलार्थींनी पोलीसांकडेच माहितीसाठी प्रयत्न करावेत असे निर्देश दिले.

पोलीस विभागाकडे दाखल केलेल्या केसल्या अे-समरी दिलेली असल्यामुळे संबंधित कागदपत्रे आता अपीलार्थींना दाखविण्यास/ देण्यास कुठचीहि हरकत नाही.

मागितलेल्या माहितीत जी माहिती अधिनियमाच्या कलम ८ खाली देण्याबाबत अपवाद

**केलेला आहे तेवढी माहिती वगळून अपीलार्थीस इतर सर्व केसपेपर्स दाखविण्यात यावेत व त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या प्रती देण्यात याव्यात. याबाबत संबंधित पोलीस स्टेशनला कोणत्या तारखेला हजर रहावे ते जन माहिती अधिकारी यांनी कळवावे व त्याप्रमाणे अपीलार्थींनी उपस्थित राहून कागदपत्रांची पाहणी करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात.**

***----आदेश---***

**दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: २९.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४७४४१/अपील क्रमांक ५७२६/०२**

**श्री. शैलेश कडव ----अपीलार्थी**
**२/३, सहयाद्री नगर, चारकोप**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी**
**श्री.रामकृष्ण शिक्षण मंडळ,**
**पी.टी. आर.एफ. , १७१, महात्मा गांधी मार्ग,**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

**२.जन माहिती अधिकारी**
**श्री.रामकृष्ण शिक्षण मंडळ,**
**पी.टी. आर.एफ. , १७१, महात्मा गांधी मार्ग,**
**कांदिवली (पश्चिम) मुंबई ४०० ०६७.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ९ मार्च, २०१०**
**सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

अपीलार्थींना ट्रस्ट कडून जी माहिती पाहिजे आहे त्या माहितीच्या बाबतीत सदरील कागदपत्रे हे ट्रस्टने वेळोवेळी धर्मादाय आयुक्त तसेच इतर संबंधित शासकीय विभाग यांना पुरविलेली आहे. त्यामुळे धर्मादाय आयुक्तांच्या निर्देशांशिवाय माहिती देता येणार नाही असे अपीलार्थीस कळविण्यांत आलेले आहे. त्याविरुध्दचे सदरचे अपील आहे.

ज्या ट्रस्टना भरीव अर्थसहाय्य मिळत नाही त्या ट्रस्ट हया "जन प्राधिकरणे " नाहीत असाच निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच दिलेला आहे. मात्र मुंबई पब्लिक

ट्रस्ट अॅक्ट १९५० नुसार जी ट्रस्टची माहिती ही ट्रस्टने संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे द्यावयाची असते ती माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील माहिती या संज्ञे खाली येते. त्यामुळे अपीलार्थींचा मुळ अर्ज हा संस्थेने धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांकडे पाठवावा व त्यांनी एक तर त्यांच्या कार्यालयातून माहिती या संज्ञेत येणारी माहिती अपीलार्थीस द्यावी किंवा रामकृष्ण मंडळास निर्देशित करुन देण्याची व्यवस्था करावी.

<u>*----आदेश---*</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

संबंधितांनी वरिलप्रमाणे कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत धर्मादाय आयुक्त कार्यालय यांनाहि पाठविण्यात यावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: २९.५.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७३४०/अपील क्रमांक ५७२०/०२

श्री. बिपिन देढीया ----अपीलार्थी
बी/३, लक्ष्मीनारायण भुवन,
कस्तुरबा रोड नं.१, देना बँकेच्या वर,
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०० ०६६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
रुम नं. ४०८, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक २ मार्च, २०१०
सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस सेस बिल्डींगच्या पुनर्विकासासंदर्भात रुल्स रेग्युलेशन, मॅन्युअल संदर्भात माहिती त्यांच्या दि. २२/९/२००९ रोजीच्या अर्जाने पाहिजे होती.

दि. १९ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या पत्राने संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी बुकलेटसची प्रत पाठविण्यांत आली आहे असे कळविले. पण प्रत्यक्षात बुकलेटची प्रत पाठविलीच नाही असे अपीलार्थीचे म्हणणे होते. अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्देशाप्रमाणे त्यांना ही प्रत पुन्हा पुरविण्यात आली.

अपीलार्थींचा अर्ज हा दि. २२/९/२००९ रोजीचा होता व तो दि. २४/९/२००९ रोजी कार्यालयास प्राप्त झाला. म्हणजे २४ ऑक्टोबर, २००९ पर्यंत माहिती देणे हे आवश्यक होते. मात्र अपीलार्थीस माहिती दि. १९ नोव्हेंबर २००९ रोजीच्या पत्राने देण्यांत आलेली आहे. म्हणजेच २४ दिवसांचा विलंब तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी लावलेला आहे. याबद्दल त्यांच्यावर २४x२५०=६०००/- या रक्कमेची शास्ती का लावू नये याचा खुलासा त्यांनी आयोगाच्या कार्यालयात दि. १७ जून, २०१० रोजी प्रत्यक्ष लेखी निवेदनाद्वारे सादर करावा.

अपीलार्थींचे जे दोन मुद्दे महापालिकेशी संबंधित होते त्या मुद्दयांच्या बाबतीत जन माहिती अधिका-यांनी स्वतःच त्या अर्जाची प्रत महापालिकेला पाठविणे आवश्यक होते याची नोंद त्यांनी घ्यावी.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना या आदेशाची प्रत देण्याची जबाबदारी मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांना या आदेशाच्या दोन प्रती पाठविण्यात याव्यात.**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**

**दिनांक: २९.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४७३३६/अपील क्रमांक ५७१९/०२

श्री. राजन अलिमचंदानी ----अपीलार्थी
४७/बी विनस, डॉ. आर.जी. थडाणी मार्ग,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा,
२ रा मजला, हायकोर्ट एक्सटेंशन,
फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा,
२ रा मजला, हायकोर्ट एक्सटेंशन,
फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

***---विवेचन---***

अपीलांचा दिनांक २४ फेब्रूवारी २०१०
सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बार कौन्सिल हे जन प्राधिकरण आहेत असाच अंतिम निर्णय या आयोगाने दिलेला आहे. तो मान्य नसल्यास मा.हायकोर्टाचे आदेश मिळवावेत हाच पर्याय बार कौन्सिलपुढे आहे. जोपर्यंत असे आदेश बार कौन्सिल मिळवित नाही तोपर्यंत ते जन प्राधिकरणे आहेत, व त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करावे असे निर्देश सुनावणीच्या वेळेस देण्यांत आले.

अपीलार्थीच्या प्रस्तुत अर्जामध्ये त्यांनी अर्जाची फी व अपीलाची फी ही अर्जासोबत १०/- व २०/- ची नोट अर्जासोबत जोडून अदा केली होती. बार कौन्सिलचे म्हणणे अर्ज व अपीलास

कोर्ट फी स्टॅम्प लावावयास पाहिजे. महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००५ (दि. ११ ऑक्टोंबर २००५) अधिनियमाच्या कलम ३ नुसार अर्जाची फी ही रोख रक्कमेच्या स्वरुपात व नियम ५ नुसार अपीलाची फी ही रोख रक्कमेच्या स्वरुपात स्वीकारुन त्याची रिसिट देता येते. त्यामुळे कोर्ट फी स्टँपद्वारेच अशी फी देण्यात यावी ही बार कौन्सिलच्या जन माहिती अधिका-यांची मागणी योग्य नाही. मात्र रोख रक्कमेच्या स्वरुपात फी द्यायची असल्यास अर्जदाराने पैसे भरुन त्याची रिसिप्ट तेव्हाच प्राप्त करुन घ्यायची असते. अर्जासोबत नुसतीच नोट जोडल्याने त्याचा दुरुपयोग होऊ शकतो व त्याचा पुरावाहि राहात नाही याची नोंद अर्जदाराने घ्यावी व पुढे त्यांना कोर्ट फी स्टॅम्प लावायचा नसल्यास व रोखीनेच रक्कम द्यायची असल्यास त्याची तेव्हाच स्वतः किंवा प्रतिनिधीद्वारे रिसिप्ट प्राप्त करुन घ्यावी अशी सूचना देण्यात येते.

अपीलार्थीच्या अर्जाबाबत अपीलार्थीच्या कांही मुद्दयांवर माहिती देण्यात आलेली आहे व कांही मुद्दयांबाबत त्यांना कायदेशीर सल्ला विचारला आहे. सल्ला देणे बंधनकारक नाही हे बार कौन्सिलच्या जन माहिती अधिका-यांचे म्हणणे योग्यच आहे.

एखादया विवक्षित कालावधीत केस नमूद करुन त्यात अस्तित्वात असलेले कायदेशीर टिपण मागणे हे वेगळे तर याबाबतीत कायदेशीर परिस्थिती काय राहिल याबाबतचे मत मागणे हे वेगळे व अशा प्रकारचे मत तयार करुन देणे हे माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचे वरिल विवेचन हे अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी या दोघांनी पुढील मार्गदर्शनासाठी विचारात घ्यावे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः २९.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४७४३९/अपील क्रमांक ५७२४/०२**

**श्री. अमृत आबाजी लोखंडे ----अपीलार्थी**
**४, बकुळ बंगला, प्लॉट नं. १५,**
**सेक्टर नं. ४, श्रीनगर, ठाणे (पूर्व)**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----उत्तरवादी**
**डी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जोबनपूत्र कंपाऊंड, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.**

**२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता)**
**डी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**जोबनपूत्र कंपाऊंड, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक १३ मार्च, २०१०**
**सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थीस जी १९८७ सालच्या ३ विवक्षित पत्रांच्या प्रती पाहिजेत ती पत्रे रेकॉर्डला आढळून आली नाहीत म्हणून ती देता आली नाहीत. मात्र सदर विषयासंबंधात इतर कांही कागदपत्रे अपीलार्थीस देण्यांत आलेली आहेत. या ३ पत्रांच्या प्रती त्यावेळेला १९८७ साली अपीलार्थीच्या वडिलांना देण्यांत आलेल्या आहेत पण त्यांच्याकडे सुध्दा त्या प्रती आढळून येत नाहीत म्हणून त्याची मागणी केलेली आहे.**

**यासंदर्भात इतर संलग्न विभागाच्या रेकॉर्डमध्ये पुन्हा तपासणी करुन अपीलार्थीस हवी असलेली पत्रे शोधून काढण्याचा प्रयत्न करावा व १५ दिवसांत अपीलार्थीस त्याप्रमाणे उत्तर द्यावे**

असे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांकः २९.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६५१५/अपील क्रमांक ५७२७/०२

श्रीमती. भागिरथी जाधव ----अपीलार्थी
२०१५, बी.डी.डी. चाळ,
ना.म. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०१३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ३, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,
बावला कंपाऊंड, भायखळा (पूर्व) मुंबई.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ५/१/२०१०
सुनावणीचा दिनांक २९/०५/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थीस रेकॉर्डमध्ये असलेली माहिती देण्यांत आलेली आहे. मात्र द्वितीय अपीलाच्या निमित्ताने अपीलार्थींनी चौकशीच्या संदर्भात ३ मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार रेकॉर्डला जशा पध्दतीने माहिती असेल तशी माहिती मिळते. अपीलार्थींनी अपीलात उपस्थित केलेले मुद्दे हे गुन्हा अन्वेषण त्रुटीच्या संदर्भातील असल्यामुळे त्याची पोलीस विभाग हे वेगळयाने दखल घेईल. माहितीच्या अधिकारात उपलब्ध माहिती ही दिली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: २९.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६७८६/अपील क्रमांक ५७५३/०२**

**श्री. राजेश उपाध्याय ----अपीलार्थी**
**जानकीदास चाळ, काळा किल्ला,**
**संत रोहिदास मार्ग, धारावी, मुंबई ४०० ०१७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ३, मुंबई.**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**मध्य नियंत्रण कक्ष, मध्य प्रादेशिक विभाग,**
**बावला कंपाऊंड, भायखळा (पूर्व) मुंबई.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक २५/१/२०१०**
**सुनावणीचा दिनांक ३१/०५/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीस त्यांच्या दि. ३०/११/२००९ रोजीच्या अर्जानुसार दि. १६/११/२००९ रोजी FIR नोंद करण्याबाबत जो अर्ज केला होता त्याबाबतीत काय कारवाई झाली याची माहिती मागितली होती.**

**अपीलार्थीनी श्रीयुत सुरेश मिस्त्री यांनी त्यांचा फोटोपास न्यू सातारा जिल्हा नागरी सहकारी पतपेढी यांच्याकडे गिरवी (गिरवी म्हणून ) ठेवली असतांना सुध्दा पोलीस ठाण्यामध्ये फोटोपास हरवला आहे अशी खोटी तक्रार दिलेली आहे. तेव्हा श्रीयुत मिस्त्री यांच्याविरुध्द कारवाई करावी अशा स्वरुपाचा अर्ज श्रीयुत उपाध्याय यांनी पोलीस स्टेशनला दिला होता.**

**संबंधित पोलीस स्टेशनने संबंधित पतपेढीत जाऊन माहिती घेऊन फोटोपोस त्यांच्याकडे**

गिरवी म्हणून आहे याची खात्री केली व श्रीयुत मिस्त्री यांचेविरुध्द गुन्हा नोंद क्र. ९१/१० कलम ४२० भा. दं. वि. नुसार गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच दि. २८/४/२०१० रोजी अटकहि करण्यात आली होती व ते सध्या जामीनावर असून गुन्हयाचा तपास चालू आहे असे निवेदनहि दिलेले आहे. FIR ची प्रत अपीलार्थी यांना देण्यांत आलेली आहे. त्यामुळे माहिती देण्याच्या बाबतीत काही कुचराई झालेली दिसत नाही.

***----आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७८२/अपील क्रमांक५७५६ /०२
क्रमांक-मु.मा.आ/४६७८३/अपील क्रमांक५७५७ /०२
क्रमांक-मु.मा.आ/४६७८४/अपील क्रमांक५७५८ /०२

श्री. विजय मंथेना ----अपीलार्थी
७/३४, अब्दुल्ला मेन्शन, हरियानवाला लेन,
स्टेशन रोड, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख वैद्यकीय अधिकारी ----उत्तरवादी
प्रमुख वैद्यकीय अधिकारी व खाते प्रमुख,
बृहन्मुंबई महानगरपालिका, माध्यमिक आरोग्य सेवा कार्यालय,
के.बी.भाभा रुग्णालय इमारत, ७ वा मजला,
आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०

२. जन माहिती अधिकारी
प्रमुख वैद्यकीय अधिकारी व खाते प्रमुख,
बृहन्मुंबई महानगरपालिका, माध्यमिक आरोग्य सेवा कार्यालय,
के.बी.भाभा रुग्णालय इमारत, ७ वा मजला,
आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०

***---विवेचन---***

या तिन्ही अपीलातील अर्जांद्वारा अपीलार्थींना ज्या रुग्णालयांसंबंधीची माहिती पाहिजे आहे ते रुग्णालय महापालिकेच्या जागेवर, बी.एस.ई.एस. यांनी त्यांच्या खर्चाने बांधून दिलेले आहे व ब्रम्हकुमारीज ग्लोबल हॉस्पिटल रिसर्च सेंटर यांच्या मॅनेजमेंटखाली आहेत, व त्यासंबंधात या तिन्ही संस्थांत सर्व सामंजस्य करार झालेला आहे. महापालिकेचा रोल मर्यादित असल्यामुळे अपीलार्थींना त्यासंबंधात जी माहिती महापालिकेकडे आहे ती देण्यांत आलेली आहे व अपीलार्थीस

हवे तर त्याची तपासणी सुध्दा करुन घेऊ शकतात. तसेच या हॉस्पीटलसंबंधी नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केला असता त्यांना जे उत्तर देण्यांत आलेले आहे त्या उत्तराची प्रतहि अपीलार्थीस देण्यात यावी, जेणेकरुन त्यांचे समाधान होऊ शकेल.

तसेच ज्या ट्रस्टना शासनाचे भरीव अर्थसहाय्य मिळत नाही त्यांना हा माहिती अधिकाराचा कायदा लागू होत नसल्याचा निर्वाळा मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला आहे. मात्र अशा ट्रस्टच्या हॉस्पीटल संदर्भात जी माहिती पब्लिक ट्रस्ट ॲक्ट नुसार धर्मादाय आयुक्तांकडे असायला पाहिजे ती अतिरिक्त माहिती अपीलार्थी संस्थेकडे अर्ज करुन घेऊ शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३१.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४६७८८/अपील क्रमांक५७५४ /०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज ----अपीलार्थी**
**घनश्यामदास चाळ, रुम नं.२,**
**संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,**
**धारावी, मुंबई ४०० ०१७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी**
**परिमंडळ ३, मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,**
**भायखळा (पूर्व) , मुंबई - ४०० ०२७**

**२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,**
**भायखळा (पूर्व) मुंबई ४०० ०२७.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २५/१/२०१०**
**सुनावणीची तारीख ३१ मे, २०१०**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस त्यांनी जो दि. १६/६/२००८ रोजी अर्ज पाठविला होता त्यावर काय कारवाई करण्यांत आली याबाबतची माहिती दि. ९/११/२००९ रोजीच्या पत्राने पाहिजे होती. त्याबाबत दि. २७/११/२००९ रोजीच्या पत्राने अपीलार्थीस कळविण्यात आलेले आहे.**

**अपीलार्थींच्या तक्रारीसंबंधी पोलीस अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उत्तरप्रदेशात जाऊन केलेल्या चौकशीमध्ये असे निष्पन्न झाले की, अपीलार्थींच्या पत्नी या स्वतःहून स्वखुषीने स्वतःचे स्त्री धन**

घेऊन आई-वडिलांकडे राहण्यास गेलेल्या आहेत. अपीलार्थींची चोरीची तक्रार आहे त्यात तथ्य नसल्याचे तपासाअंती आढळून आले आहे असे अपीलार्थींना कळविण्यांत आलेले आहे.

प्रथम अपीलात अपीलार्थींनी मागितलेली माहिती देण्यांत आलेली आहे असाच निर्णय घेण्यांत आला आहे.

माहितीचा अधिकारामध्ये जशी रेकॉर्डला माहिती असेल त्याप्रमाणे ती मिळत असते. त्यामुळे अपीलार्थीस दिलेली माहिती ही पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डप्रमाणे असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)

दिनांक: ३१.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४६७८७/अपील क्रमांक५७५५ /०२

श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज ----अपीलार्थी
घनश्यामदास चाळ, रुम नं.२,
संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,
धारावी, मुंबई ४०० ०१७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ----उत्तरवादी
परिमंडळ ३, मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,
भायखळा (पूर्व) , मुंबई - ४०० ०२७

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य नियंत्रण कक्ष, बावला कंपाऊंड,
भायखळा (पूर्व) मुंबई ४०० ०२७.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २५/१/२०१०
सुनावणीची तारीख ३१ मे, २०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या दि. ४/१२/२००९ रोजीच्या अर्जानुसार जॉन, जॉनीस, मरियम यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत काय कारवाई केली याची माहिती मागितली होती.

दि. १२/१/२०१० रोजी अपीलार्थीस मुदतीत माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच प्रथम अपीलात सुध्दा दिलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा देण्यांत आलेला आहे.

अपीलार्थीस, त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अदखलपात्र गुन्हयाची नोंद करुन तक्रारीची प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. व अपीलार्थीस कलम १५५ फौजदारी संहितेप्रमाणे संबंधित

न्यायालयात दाद मागण्याची समज देण्यात आलेली आहे असे कळविण्यांत आले आहे. तसेच अपीलार्थीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होण्याची शक्यता वाटत नसल्याने अपीलार्थींनी नमूद केलेल्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली नाही असे कळविण्यांत आले आहे. दिलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा देऊन अपीलार्थीचे प्रथम अपील सुध्दा निकाली काढण्यात आलेले होते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, रेकॉर्डप्रमाणे असलेली सर्व माहिती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः ३१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/५५६/तक्रार क्रमांक ७५६ /०१

श्री. एस.के. नानगिया ----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट को.ऑप.हौसिंग सोसायटी,
१३३/सेक्टर६, चारकोप कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी (चौकशी) ----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
मुख्य अधिकारी (चौकशी) यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

***---विवेचन---***

श्रीयुत एस.के.नानगिया यांनी दि. २५ मार्च, २०१० रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज केला होता. त्या तक्रारीच्या संदर्भात दि. ३१/५/२०१० रोजी सुनावणी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला जे स्पष्ट झाले की, अपीलार्थीना जी माहिती पाहिजे होती त्या माहितीच्या बाबतीत महापालिकेच्या इतर १० विभागाना तो अर्ज पाठविण्याचे तसे कारणच नव्हते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या महापालिका कर्मचाऱ्यांविरुध्दच्या कारवाई संबंधीची माहिती अपीलार्थीस पाहिजे होती व अशी प्रकरणे हे मुख्यालय पातळीवरच हाताळली जात असल्यामुळे त्याची एकत्रित स्वरुपात माहिती ही मुख्यालयातच असणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे सुनावणीच्या वेळेला मुख्यालयाने त्यांच्याकडील सर्व माहिती ही एकत्रित करुन आणली

होती व ती योग्य पध्दतीने तयार केलेली आहे असेच दिसून आले. ती तक्रारदारांस देण्याचे निर्देश देण्यांत आले.

एकाच विषयावरची माहिती मुख्यालयात तसेच इतर संलग्न कार्यालयात असू शकते. पण प्रत्येक वेळेला त्यासाठी अर्जदारास सलग्न कार्यालयांना अर्ज करायला सांगणे किंवा अर्जाची प्रत त्यांच्याकडे पाठवून त्यांना माहिती द्यायला सांगणे हे आवश्यक असेलच असे नाही. सदरील केसमध्ये तसे करणे आवश्यक नव्हते असे आयोगास वाटते. याची विभागाने नोंद घ्यावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ३१.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/५५५/तक्रार क्रमांक ७५५ /०१

श्री. एस.के. नानगिया ----तक्रारदार

७०४, गोल्डन चॅरिएट को.ऑप.हौसिंग सोसायटी,
१३३/सेक्टर६, चारकोप कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
उप प्रबंधक (ॲफीलेशन सेक्शन)
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
उप प्रबंधक (ॲफीलेशन सेक्शन)
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

***---विवेचन---***

अपीलार्थीस त्यांच्या दि. ३/८/२००९ रोजीच्या अर्जाने मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित येणा-या महाविद्यालयांना परमनंट ॲफीलेशन देण्याबाबतची आकडेवारी, कमिटीचे गठण, लागणारा वेळ वगैरे माहिती १० वर्षासाठीची पाहिजे होती.

दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे तक्रारदार यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, तक्रारदारांस एकूण २ टप्प्यामध्ये माहिती दिलेली आहे. दिलेली माहिती कॉलेजवाईज व वर्षवाईज आहे. तसेच प्रत्येक कॉलेजच्यासंबंधी जी समिती गठीत केली होती त्यात संबंधित सदस्यांची नांवे सुध्दा दिलेली आहेत. तसेच परमनंट ॲफिलेशन दिलेले आहे किंवा नाही याचाहि त्यात उल्लेख केलेला आहे. मात्र १० व्या वर्षाची म्हणजेच सन २००८-०९ सालची माहिती ही अपीलार्थीस देण्यात आली नसेल तर तीहि तक्रारदारांस देण्यात यावी. तसेच तक्रारदारांना स्वतःचे समाधान करुन घ्यायचे असेल तर त्यांनी रेकॉर्डची तपासणी घ्यावी.

***----आदेश----***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः ३१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/७५५/तक्रार क्रमांक ७५८ /०१

श्री. एस.के. नानगिया ----तक्रारदार
७०४, गोल्डन चॅरिएट को.ऑप.हौसिंग सोसायटी,
१३३/सेक्टर६, चारकोप कांदिवली (पश्चिम)
मुंबई ४०० ०६७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ----उत्तरवादी
परीक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
परीक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

***---विवेचन---***

श्रीयुत एस.के. नानगिया यांच्या दि. १५ एप्रिल, २०१० रोजीच्या तक्रारीची सुनावणी दि. ३१/५/२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक हे उपस्थित होते.

अपीलार्थीचा मुळ अर्ज हा परीक्षा विभागास प्राप्त झाला किंवा नाही यासंदर्भात चौकशी करुन शासन करण्याचे निर्देश या अगोदरच विद्यापीठ प्रशासनाला दिलेले आहेत. त्यामुळे त्या मुद्दयांचा याठिकाणी परामर्श घ्यायची आवश्यकता नाही.

आयोगाने याअगोदर दिलेल्या आदेशानुसार अपीलार्थीस ९ एप्रिल, २०१० रोजी माहिती पाठविण्यांत आलेली आहे. जर मुदतीत परीक्षेचे निकाल लागू शकले नाहीत तर त्याबाबतचा अहवाल हा कुलपती व शासन यांना पाठवायचे असतात. त्याची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक यांनी आणलेली असल्यामुळे ती तक्रारदारास देण्याचे निर्देश सुनावणीच्या वेळेला देण्यांत आले.

विद्यापीठास अर्ज प्राप्त होऊनही त्याचा ठावठिकाणा नसल्याने, नंतर शोधून तक्रारदारांना माहिती देण्यास विलंब झालेला आहे व त्याबाबत प्रशासनिक कारवाई(दंडाची) करण्याचे निर्देश

वेगळयाने तक्रार क्र. २००९/१३०/क्र. ७०७/का-१ अन्वये दिलेले आहेत. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक: ३१.५.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ२००९/९९१९/अपील क्रमांक ८१५/०२
क्रमांक-मु.मा.आ२००९/-----/अपील क्रमांक १६२४/०२

डॉ. ज्ञानचंद्र पाटील -----अपीलार्थी
शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,
सांगली, जि. सांगली ३ ४१६ ४१६

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी ----उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.

२. जन माहिती अधिकारी
जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे कार्यालय,
सांगली.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २९/११/२००८ व १२/११/२००९
सुनावणीचा दिनांक ४/५/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या दि. ४/६/२००८ व १/४/२००९ च्या दोन माहिती अर्जान्वये माहिती मागितली होती. दोनही प्रकरणी त्यांना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील केले होते. तथापि त्यांना माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे उपरोक्त दोन द्वितीय अपील अर्ज दाखल केले.

अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उत्तरवादींनी अपीलार्थींना माहिती दिलेली आहे. अपीलार्थींच्या लेखी निवेदनानुसार त्यांना जी माहिती मिळालेली नाही ती त्यांना विनाशुल्क हवी आहे. यावर आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींच्या मुळ माहिती अर्जातील तपशीलानुसार त्यांना माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे दाखवावित. यासाठी अपीलार्थींना दिनांक व वेळ ठरवून कार्यालयात

बोलावून घ्यावे. अपीलार्थींनी सर्व कागदपत्रांचे बारकाईने निरीक्षण करावे व त्यातील ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती त्यांना हव्या आहेत त्याची यादी जन माहिती अधिकारी यांना द्यावी व त्या यादीनुसार त्यांना कागदपत्रांच्या छायाप्रती विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या.

***----आदेश----***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.
संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांकः ३१.५.२०१०

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४७३५६/अपील क्रमांक ५६५१/०२**

**श्री. सुरेश पी.गोखले,** **------- अपीलकर्ता**
**१/सी/६०२, लान्ह दर्शन-१,**
**दहिसर सबवे जवळ (पूर्व),**
**मुंबई ४०० ०६८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**डेप्यूटी रजिस्टार (सी एस-३), गृहनिर्माण भवन,**
**रुम नं.६९, तळमजला, बांद्रा (पूर्व),**
**मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**डेप्यूटी रजिस्टार सी एस-३ ३१६, ए बिल्डींग,**
**आर वॉर्ड, वडाळा ट्रक टर्मिनल, आरटीओ जवळ,**
**वडाळा (पूर्व), मुंबई ४०० ०३७**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : ११.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपिलासंबंधी जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत श्री.सुरेश गोखले यांनी या कार्यालयाकडे दिनांक २८.१०.२००९ रोजी लाभदर्शन को.ऑप.हौ.सो.लि, या संस्थेच्या कामकाजा संदर्भात दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली या बाबत माहिती मिळण्याविषयी मागणी केलेली होती. सदर बाबत या कार्यालयाने दिनांक १९.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना उत्तर दिलेले होते. सदर उत्तराने अर्जदार यांचे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३), मुंबई यांचेकडे अपील दाखल केलेले होते. सदर अपीलावर निर्णय देताना मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३), मुंबई यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजीच्या आदेशान्वये अर्जदार यांना माहिती दण्यासंदर्भात आदेश पारित झ ाालेले आहेत त्याप्रमाणे अर्जदार यांना या कार्यालयातील त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. अर्जदार यांनी या कार्यालयाकडे संस्थेने दिलेल्या कागदपत्रांच्या सत्य प्रती मिळण्याबाबत मागणी केलेली आहे. अर्जदार यांनी

मागणी केलेली कागदपत्रे ही या कार्यालयातील कागदपत्रे नसल्याने त्यांचे मागणी नुसार संस्थेने दिलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती करुन देता येत नाहीत. सबब अर्जदार यांना या कार्यालयाने माहिती दिली असल्याने त्यांनी केलेले अपील फेटाळण्यात यावे ही विनंती."

अर्जदाराने मागणी केलेली कागदपत्रे ही निबंधक कार्यालयातील नहीत पण ती त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली आहेत. True copy of the document as received in this office असे नमूद करुन साक्षांकित करुन देण्यास हरकत नाही. त्यादृष्टीने कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ११.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४४७०७/अपील क्रमांक ५६५५/०२**

**श्री. इला बलदेव,** **------- अपीलकर्ता**
**बी-०१, वागडनगर , रामदेव पार्क रोड,**
**मीरा रोड (पू), जि.ठाणे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहा पालिका आयुक्त (इ व का ) मुंमनपा, एच वेस्ट,**
**सेंट मार्टिन रस्ता, वांद्रे (पश्चिम),**
**मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा अभियंता (इ व का), मुंमनपा, एच वेस्ट,**
**सेंट मार्टिन रस्ता, वांद्रे (पश्चिम),**
**मुंबई ४०० ०५०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २१.१०.२००९

सुनावणीचा दिनांक : ११.०५.२०१०

अपीलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांना माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार त्या कार्यालयाने दिनांक १८.०३.२००९ रोजी अर्जास उत्तर देऊन केंद्रिय माहिती अधिकार २००५ अन्वये योग्य ते शुल्क भरुन द्यावी असे कळविले होते.

परंतु अपिलार्थीने दिनांक ९.०४.२००९ रोजी सदर अर्जावर कार्यकारी अभियंता एच-पश्चिम विभाग यांच्याकडे प्रथम अपील केले होते. सदर प्रथम अपिलावर दिनांक १३.०५.२००९ रोजी सुनावणी झाल्या नंतर दिनांक १९.०५.२००९ रोजी अपिलकार स्वत: या कार्यालयात उपस्थित राहून अर्जात नमूद केलेल्या सर्व रजिस्टर्स/धारिणी यांची तपासणी केली व सदर तपासणीनंतर अर्जदाराने सर्व माहिती मिळाल्याचे नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार अर्जदार आता

म्हणतात त्याप्रमाणे त्यांना माहिती मिळाली असे लिहून देण्यासाठी कुठलिही आर्जवे केली नव्हती. त्यांनी प्रत्यक्षात माहिती दिली आहे.

अपिलार्थी जर स्वत: उपस्थित असते तर प्रत्यक्षात शहानिशा करता आली असती पण ते उपस्थित नसल्यामुळे तसे करता आले नाही त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो. सुज्ञास सांगणे न लगे

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ११.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४४२८/अपील क्रमांक १९०४/०२**

**श्री. प्रभाकर गोपाळ पाटील** **------- अपीलकर्ता**
**सी डी-५८/डी-४, श्रीरंग युनिट क्र.९,**
**सहकारी संस्था, बी ए निकम मार्ग,**
**ठाणे (प),**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग,**
**ठाणे महानगरपालिका**

**- वि वे च न -**

अपीलाचा दाखल झाल्याचा दिनांक : ३०.०५.२००६
सुनावणीचा दिनांक : १२.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या दिनांक १०.०६.२००६ रोजीच्या अपीलासंदर्भात मोफत माहिती द्यावी व माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना दंड का करु नये याचा खुलासा मागितला होता त्यासंदर्भात ही सुनावणी दिनांक १२.०५.२०१० रोजी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जदाराची जी तक्रार होती त्या संदर्भात संबंधीत फ्लॅट धारकार नोटीस देण्यात आलेली आहे.

मात्र त्या पुढची कार्यवाही अजुनही झालेली नाही. अर्जदाराने हा प्रश्न ठाणे महापालिका आयुक्त यांचेकडे लोकशाही दिनाप्रसंगी सुध्दा उपस्थित केलेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी माहितीच्या बाबतीत सद्यस्थितीत अर्जदारास अवगत केले असले तरी अर्जदाराचे समाधान हे कार्यवाहीनेचे होईल सुज्ञास सांगणे न लगे. यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करुन अर्जदारास अंतीमतः माहिती देत असल्याचे सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १२.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७५६/अपील क्रमांक ५६६१/०२**

**श्री. तानाजी शळके** **------- अपीलकर्ता**
**ब-३५,रुम नं. ३, शासकीय कर्मचारी वसाहत,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपसचिव, संसदीय कार्य विभाग / रोख शाख,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अवरसचिव, संसदीय कार्य विभाग / रोख शाख,**
**मंत्रालय, मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०१.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १२.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारार संसदीय कार्यविभागात कार्यरत असतांना त्यांच्या घरबांधणी संदर्भात वेतनातून दरमहा केलेली वसुली याबाबत तपशील मागितला होता. याबाबत अर्जदारास मुदतीत उत्तरही देण्यात आले होते मात्र त्याने समाधान न झाल्यामुळे त्यांनी अंतीमतः आयोगाकडे धाव घेतलेली आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले की :-

सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनांक ४.०७.२००९ च्या पत्रान्वये श्री.ता.शं.शळके, यांच्या विष्णुप्रिय सह.गृह.संस्था घरबांधणी कर्ज वसुलीचे हप्ते अप्राप्त असल्याबाबत कळविले होते. दिनांक ३.०३.२०१० च्या पत्राव्दारे श्री.ता.शं.शळके, यांच्या माहे ऑक्टो-२००६ ते मे-२००९ पर्यंतच्या वसुलीचा तपशील विवरणपत्राव्दारे सहकार व वस्त्रोद्योग विभागास पाठविण्यात आला आहे व त्याची प्रत श्री.शेळके यांना देखील देण्यात आली आहे.

श्री.शेळके यांच्या मागणीबाबत वेळोवेळी विहित मुदतीत कार्यवाही केलेली आहे. त्यांनी मागितलेली माहिती सहायक अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करणे आवश्यक असतांनादेखील या विभागाकडून त्यांना माहिती देण्यात आली आहे. श्री.शेळके यांच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून प्राप्त पत्रास यापुर्वीच उत्तर दिले असल्यामुळे अपिलाचे प्रयोजन रहात नाहही तेव्हा सदर अपिल फेटाळण्यात यावे अशी आपणांस विनंती करण्यात येत आहे.

मात्र सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की अर्जदारास दिनांक ३.०३.२०१० रोजीच्या पत्राच्या प्रती मिळालेल्या नाहीत व त्या प्रती त्यांना आजच देण्याचे निर्देश विभागास देण्यात आले आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १२.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४४१५४/अपील क्रमांक ५६६२/०२**

**श्री. चेतन सावल,** **------- अपीलकर्ता**
**२०३, बी विंग, प्रतीक बिल्डींग, भवानी शंकर रोड,**
**दादर (प), मुंबई ४०० ०२८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**डेप्यूटी चीफ इंजिनिअर, ई-वॉर्ड, मुंमनपा, १०,**
**शेख अफिजुद्दीन मार्ग, भायखळा (प), मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी तथा**
**एक्झ्यूकिटीव्ह इंजिनिअर, ई-वॉर्ड, मुंमनपा, १०,**
**शेख अफिजुद्दीन मार्ग, भायखळा (प), मुंबई ४०० ००८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १८ सप्टेबर, २००९ तद्नंतर
वरील माहिती उर्वरित कागदपत्र १.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १२.०५.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपीलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे.

" अर्जदार श्री. चेतन सावल यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिनांक ८.०५.२००९ रोजी तत्कालीन सार्वजनिक माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर ३ यांना अर्ज केला होता त्यास अनुसरुन तत्कालीन सार्वजनिक माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-३ यांनी कार्यालयाचे पत्र क्र.ईईबीपी/१५८२/एमआरआय/शहर-३ दिनांक ५.०६.२००९ अन्वये सदरहू कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे विषद केले होते तसेच या विषयी जर अर्जदाराकडे धारिणी क्रमांक उपलब्ध असतील तर ते कळविण्यासाठी कळविले होते ज्यायोगे सदरहू कागदपत्रे शोधण्यात येतील व उपब्ध झाल्यास अर्जदारास उपलब्ध करु असे सुचित केले होते. तदनंतर अर्जदारांनी दिनांक २४.०६.२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इ.प्र) शहर यांचेकडे अपिल अर्ज सादर केला होता. त्याअनुसारुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इ.प्र) शहर यांनी दिनांक २४.०६.२००९ रोजी अर्जदार तसेच

सार्वजनिक माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र) शहर - ३ सदरहू सुनावणीस पाचारण केले होते सदर सुनावणीत अर्जदाराला पुनश्चः संबंधित धारिणीचा क्रमांक माहिती असल्यास संबंधिताना सदर धारिणी क्रमांक कळविण्यासाठी सुचित केले होते. त्यावेळी अर्जदाराने असे विषद केले की, संबंधित धारिणीचा क्रमांक माहिती नसुन वास्तुविशारदाचे नाव विषद केले त्यास अनुसरुन सार्वजनिक माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर-३ यांनी संबंधित वास्तुविशारदाशी संपर्क साधून या विषयची धारिणी क्रमांक कळविण्याकरीता विनंती करण्यात आली होती. तदनंतर संबंधित वास्तुविशारदाकडून सदर विषयाच्या धारिणीचा क्रमांक दुरध्वनीवरुन प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयामार्फत सदरहू धारिणीचा या कार्यालयाच्या अभिलेखात शोध घेण्यात आला व सदर धारिणी अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आली व त्यानंतर अर्जदाराने सदर धारिणीचे अवलोकन केले त्यास अनुसरुन त्या संदर्भातील हया कार्यालयाचे पत्र क्रमांक ईईबीपी/२३१६/शहर-३ दिनांक २७.०८.२००९ रोजी अर्जदारास कळविलेले आहे. त्यामुळे अपुरी माहिती दिल्याच्या तक्रारीत कृपया तथ्य नाही."

निवेदन योग्य वाटते अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्याची पडताळणी करुन पाहता आली नाही.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १२.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७६१/अपील क्रमांक ५६६६/०२**

**श्री. कमल अहमद खान,** **------- अपीलकर्ता**
**रु.नं. ३६/१/१, प्रबुध्दनगर रफि अहमद,**
**किडवाई रोड, वडाला,**
**मुंबई- ४०० ०३१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहप्रकल्प संचालक (पुनर्वसन/पुनर्वसाहत),**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा कुला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहप्रकल्प संचालक (पुनर्वसन), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**बांद्रा कुला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १२.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलाच्या सदर्भात पुढीलप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी निवेदन सादर केले.

" सदर अपील अर्जामध्ये नमूद मुद्दा क्रमांक १ व २ नुसार सादर करण्यात येते की, रफी अहमद किडवाई मार्ग व जकेरिया बंदर मार्गावरील बाधित झोपडीधारकांच्या पुनर्वसनाची माहिती ही "महात्मा गांधी पथक्रांती " योजनेंतर्गत पदपथावर राहणाऱ्या झोपडीधारकांशी संबंधित आहे. या योजनेंतर्गत झोपडीधारकांचे सर्व्हेक्षण करणे, पात्रता ठरविणे व पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक, मुंविप्र-२००६/३६८/प्र.क्र.७९/०६/विशेष प्रकल्प, दिनांक ३१.१२.२००७ नुसार करण्यात येते.

सदर शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २ (xi) नुसार या योजनेत पात्र ठरणाऱ्या झोपडीधारकांच्या पुनर्वसानासाठी लागणाऱ्या सदनिकांचा पुरवठा बृहन्मुंबई महानगरपालिकेस करण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाकडे सोपविण्यात आली आहे. त्यानुसार रफी अहमद किडवाई मार्ग व जकेरिया बंदर मार्गावरील "महात्मा गांधी पथक्रांती" योजनेत

बाधीत होणाऱ्या झोपडीधारकांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मागणी करण्यात आल्याप्रमाणे ८०५ सदनिकांचा पुरवठा करण्यात आला आहे. पात्र झोपडीधारकांना सदनिकांचे वाटप सहाय्यक आयुक्त, (एफ/दक्षिण व एफ/उत्तर यांचेमार्फत करण्यात आले आहे.

श्री कमाल अहमद खान यांचा दिनांक निरंक रोजीचा अपिल अर्ज प्राधिकरणाच्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प विभागाकडून दिनांक १६.१२.२००९ रोजी या विभागास (मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प ) प्राप्त झाला आहे. सदर अपिल अर्जावर दिनांक ११.०१.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली असून दिनांक २०.०१.२०१० रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशाची प्रत अर्जदार यांनी दिनांक २२.०१.२०१० रोजी व्यक्तीशः कार्यालयात येऊन प्राप्त करुन घेतली आहे (सोबत स्थळप्रत जोडली आहे.)

सदर आदेशान्वये अर्जदार यांना स्पष्ट करण्यात आले आहे की, रफी अहमद किडवाई मार्ग व जकेरिया बंदर मार्गावरील रस्त्याच्या पदपथावरील बाधित प्रकल्पग्रस्तांबाबतची अपेक्षित असलेली माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहाय्यक आयुक्त (एफ/दक्षिण) परेल व (एफ/उत्तर) माटुंगा, विभाग यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. तसेच पुढील कार्यवाहीसाठी आपल्या अर्जाची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहाय्यक आयुक्त (एफ/दक्षिण) परेल व (एफ/उत्तर माटुंगा, यांचेकडे पुन्हा पाठविण्यात आले आहे.

अर्जदार री कमाल अहमद खान हे रफी अहमद किडवाई रोड, जकेरीया बंदर रोड, शिवडी क्रॉस रोड या रस्त्यावरील "महात्मा गांधी पथक्रांती" योजनेत बाधीत झालेल्या झोपडीधारकांबाबत वारंवार या कार्यालयाकडे अर्ज करीत असतात. तसेच त्यांनी केलेले सर्व अर्ज रफी अहमद किडवाई रोड व जकेरीया बंदर रोड या दोन रस्त्यांसाठी केले असल्याचे दिसून येते. त्यांनी विचारणा केलेल्या माहितीबाबत या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना यापूर्वी पुरविण्यात आलेली आहे."

अपिलार्थीचे म्हणणे असे की अर्जदारास हवी असणारी माहिती एमएमआरडीएनेच द्यायला पाहिजे, एमएमआरडीऐचे म्हणणे असे की ही माहिती मुंबई महापालिकेकडे असल्यामुळे ती अर्जदाराने मुंबई महापालिकेकडून घ्यावी असे त्यांना कळविण्यात आलेले आहे. अर्जदारास त्याच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराला हवी असणारी माहिती ही अर्जदार ज्या प्रमाणे म्हणतो की मुंबई महापालिकेकडून प्राधिकरणांनी घेऊन त्यांना ती द्यावी. ही माहिती अवाजवी आहे जर मुंबई महापालिकेने दिलेल्या माहितीने समाधान होत नसेलतर प्रथम अपिलीय अधिकारी व आयोग यांच्याकडे अर्जदारास येता येईल. मात्र अमुकच प्राधिकरणांनी दुसरीकडून माहिती मिळऊन द्यावी असा आग्रह अर्जदारास करता येणार नाही.

## आदेश

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १२.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७६२/अपील क्रमांक ५६६८/०२**

**श्री. अजितकुमार पंजाबी** ------- **अपीलकर्ता**
**व्दारा:- रमजाने भटारचाळ नं. २६३/५,**
**डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड, कुर्ला (प),**
**मुंबई- ४०० ०७०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (परक्षिण खाते), एफ/नॉर्थ विभाग,**
**मुंबई मनपा, माटुंगा, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा अभियंता परिक्षण खाते, एफ/नॉर्थ विभाग,**
**मुंबई मनपा, माटुंगा, मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १२.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" श्री.अजितकुमार पंजाबी यांना पहिल्या अपिलामध्ये सांगितल्याप्रमाणे आपणास प्रत्येक कंत्राटदाराची एक कार्यादेश याप्रमाणे सहा कंत्राटदाराचे सहा कार्यादेश यांच्या नक्कलप्रती तसेच जी.सी.सी. याबाबत टेंडरची नक्कम प्रत तसेच कंत्राटदाराने मुख्यालय टेंटर भरताना भरलेल्या अनामत रक्कमेच्या पावतीची नक्कल प्रती श्री. पंजाबी यांना अगोदरच विनाशुल्क देण्यात आल्या आहेत.

अर्जदारांनी या कार्यालयात मागितलेली काही माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून विस्तृत स्वरुपाची आहे. जेंव्हा ते/त्यांचे प्रतिनिधी उपरोक्त माहिती घेण्यासाठी या कार्यालयात आले असता वरील बाब त्यांच्या निदर्शनास आणुन दिली होती तेंव्हा त्यांनी दुसऱ्या कार्यालयाच्या अखत्यारीतील माहिती ही तुम्हींच आणून द्या असा आग्रह धरलेला आहे त्यामुळे माहिती देण्यास विलंब होत आहे. या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना संबंधित विभागाकडे माहिती गोळा करण्याकरीता पाठविण्यात आले

होते व त्यापैकी उपलब्ध माहिती याअगोदरच जमा करुन अर्जदारांना देण्यात आलेली आहे व उरलेली माहिती या कार्यालयास उपलब्ध झाल्यानंतर अर्जदारांना विनामुल्य देण्यात येईल."

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की उर्वरित माहिती ही १५ दिवसांच्या आत अर्जदारास विनामुल्य देण्यात येईल.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १२.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**क्रमांक :- मुमाआ २००९/तक्रार क्रमांक ३६०/०१**
**क्रमांक :- मुमाआ २००९/तक्रार क्रमांक ३७८/०१**

**श्री. एस.एस.प्रभू, ------ तक्रारकर्ता**
**बी-२३, उद्यान प्रभा, तेजपाल, स्कीम रोड नं.२,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई गृह निर्माण व**
**क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहाकारी अधिकारी, सहकारी संस्था, मुंबई गृह निर्माण व**
**क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१**

**- वि वे च न -**

आयोगाने अपील क्रमांक मुमाआ-२००८/२७९६९/अपील ३१०५/०२ प्रकरणी व्दितीय अपीलावर दिनांक १०.१२.२००८ रोजी पारित केलेल्या निर्णयात अपिलार्थीस (म्हणजेच तक्रारदारास) आदेश मिळाल्यापासून दहा दिवसांत माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले होते. मात्र त्याचे अनुपालन झाले नाही म्हणून तक्रारदार यांनी आयोगाकडे दिनांक ११.०२.२००९ व दिनांक ३०.०३.२००९ रोजी तक्रार अर्ज केले होते. दिनांक ३०.०३.२००९ च्या तक्रारीवर (प्राप्त दिनांक ३१.०३.२००९ आयोगाने दिनांक ७.०५.२००९ राजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशून आदेश निर्गमित करुन त्यांनी आयोगाच्या दिनांक १०.१२.२००८ च्या उपरोक्त आदेशाचे अनुपालन न केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा लेखी खुलासा दिनांक २०.०५.२००९ रोजी ५.०० वाजता आयोगासमोर सादर करावा असे निर्देश दिले होते.

श्री.बी.के.हांडे, जन माहिती अधिकारी, उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय यांनी त्यांच्या घरगुती कारणास्तव ते बाहेरगांवी जाणार असल्याने सुनावणीसाठी पुढील आठवडयातील तारीख व वेळ मिळण्याबाबत विनंती केली होती. त्यास अनुसरुन आयोगाने पुढील सुनावणी दिनांक २८.०५.२००९ रोजी दुपारी २.१५

वाजता ठेवली होती. सदर सुनावणीच्यावेळी तक्रारदार तसेच श्री.बी.के.हांडे, सह अधिकारी श्रेणी-१, हे उपस्थित होते. त्यांनी दिनांक २८.०५.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा पुढीलप्रमाणे.

" श्री. एस.एस.प्रभु यांचे माहिती मिळणेसाठीचे वेगवेगळे अर्ज विचारात घेता त्यांना कार्यालयात समक्ष बोलवून दिनांक २९.०८.२००८ रोजी त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सर्व मुद्यांचा विचार करुन कार्यालयात उपलब्ध असलेल्या धारीकेतील सर्व कागदपत्र त्यांना दिनांक १२.०१.२००९ रोजी देण्यात आले आहेत. त्याशिवाय इतर माहिती/माहितीची धारीका कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांना दि.१२.०१.२००९ च्या पत्राने कळविलेले आहे.त्याचप्रमाणे संस्था पातळीवर असणारी माहिती देणेसाठी कार्यालयाने दि.१२.०१.२००९ रोजी संस्थेचे प्रशासक यांना पत्र देऊन सूचित केले आहे.

वरीलप्रमाणे डॉ. एस.एस.प्रभू यांना सर्व उपलब्ध माहिती दिलेली आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई कार्यालयाच्या कार्यकक्षेत म्हाडाच्या जमिनीवरील ८००० चे वर सहाकारी संस्था असून उपनिबंधक (वर्ग-१) व्यतिरिक्त-सहकारी अधिकारी (श्रेणी -१) हे वर्ग-३ मधील सहकार खात्यातील-१ पद कार्यरत आहे. अलिकडील काळात संस्थांची वाढलेली संख्या, पुर्नविकास कामे इत्यादि मुळे कार्यालयाकडे प्रचंड मोठया प्रमाणात तक्रारी होतात. त्यामुळे तक्रारींवर कारवाई करण्यास अवधी लागतो. श्री.प्रभू यांचे तक्रारीबाबत सहकार खात्याकडून आवश्यक ती कारवाई करुन प्रशासक नेमलेला आहे व संस्थेची वैधानिक चौकशी सुरु आहे.

श्री.एस.एस.प्रभु यांना कार्यालयात उपलब्ध झालेली सर्व माहिती मी माहिती अधिकारी या नात्याने दिलेली आहे. तरी कृपया सदरचा खुलासा मान्य करावा ही विनंती "

तक्रारदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.०१.२००९ रोजी २४२ पृष्ठांची माहिती दिलेली आहे. जी माहिती संस्था पातळीवरील आहे, ती माहिती देण्यासाठी संस्थेचे प्रशासक यांना दि. १२.०१.२००९ रोजीच्या पत्राने कळविले असून त्याची प्रतही तक्रारदार यांना देण्यात आली आहे. कार्यालयीन प्रतीवर तक्रारदार यांची माहिती प्राप्त झाल्याची पोचही घेण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी कथन केले.

सुनावणीच्या वेळी तक्रारदारांनी शास्त्रीनगर व्दारका को-ऑप.हाऊसिंग सोसायटी या संस्थेचे तत्कालीन प्रशासक डॉ.सुरेंद्र मोरे यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. ८.१०.२००७ च्या आदेशानुसार संस्थेची जी माहिती देणे अपेक्षित होते ती सर्व माहिती अद्याप मिळाली नसल्याचे सांगितले. त्यावर अद्याप प्रलंबित असलेली उर्वरित माहिती कोणती हे विद्यमान प्रशासक श्री.इंदलकर यांना कळवून तक्रारदारास ती त्वरित उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याचे आश्वासन जन माहिती अधिकारी यांनी दिले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यानंतर दि. १६.०६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास असे कळविले आहे की, सद्यस्थितीत प्रशासक श्री.इंदलकर यांनी संस्थेत उपलब्ध असणाऱ्या व डॉ.प्रभू यांना आवश्यक असणाऱ्या सर्व

कागदपत्रांच्या प्रती दिलेल्या आहेत, असे प्रशासक श्री.इंदलकर यांनी सांगितले तत्कालीन प्रशासक डॉ.मोरे यांची वैयक्तिक माहिती मात्र कार्यालयात उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.०५.२००९ व दिनांक १६.०६.२००९ रोजी दिलेले खुलासे मान्य करण्यात येत आहेत. तक्रारदारास आवश्यक ती सर्व उपलब्ध माहिती देण्यात आल्याने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७६८/अपील क्रमांक ५६७२/०२**

**श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया** **-------- अपीलकर्ता**
**लक्ष्मी स्टोअर्स शॉप नं.३, रेढीपा हाऊस,**
**भाभी नाका, एल.टी.रोड,**
**बोरीवली (प), मुंबई-९१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**दुय्यम निबंधक, दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र.२,**
**जुने जकात घर, तळमजला, शाहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,**
**मुंबई - २३**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा दुय्यम निबंधक, मुंबई शहर क्र.२,**
**जुने जकात घर, तळमजला, शाहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,**
**मुंबई - २३**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०१.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १३.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास रजिस्ट्रेशन करीत असतांना जे कागदपत्र निबंधक कार्यालयात देण्यात येतात, ते परत मिळविण्यासाठी कोणती पध्दत अमलात आणावी लागेल यासंबंधीची माहिती पाहिजे होती. सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की इ.स.२००१-०२ सालापासून संगणकीकृत दस्तऐवज नोंदणी प्रक्रिया असल्यामुळे दस्त ऐवज हे त्याच दिवशी अर्जदारास परत मिळतात. मात्र जुन्या कागदपत्र्यांच्या बाबतीत हा प्रश्न उद्‌भवतो  व अशा प्रकारे मुळ दस्तऐवज निबंधक कार्यालयातच असण्याचे प्रमाण फार मोठया प्रमाणावर आहे.

अर्जदारास माहिती दिलेली आहे माहिती देण्याच्या विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी यांनी पुढील कारणे दिलेली आहेत.

" श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे परंतु सदर माहिती देण्यास विलंब झाला त्याबाबत पुढील प्रमाणे खुलासा सादर करीत आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-२ (अभिलेख) हे कार्यालय मा. दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई यांचे अधिनस्त असून सदर कार्यालयात सन २००२ पूर्वी नोंदणी झालेल्या म्हणजेच अंदाजे सन १८६४ पासूनचे अभिलेख जतन कले जातात. तसेच सन १९७२ पासून नोंदणीसाठी दाखल केलेले परंतु नोंदणी न झालेले दस्त नोंदणीसाठी प्रलंबित आहेत. उक्त अभिलेखामधून मिळकतीचा शोध घेण्यासाठी दररोज सुमारे १०० ते ११० अर्ज प्राप्त होतात. तसेच प्रलंबित दस्तांचे किंवा नोंदणी पूर्ण झालेले दस्तांतील पक्षकार अंदाजे १०० ते १२५ पक्षकार दररोज या कार्यालयास भेट देतात व पूर्ण झाले दस्त किंवा प्रलंबित दस्त नोंदणी पूर्ण करुन घेण्यासाठी किंवा दस्तातील कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी पक्षकारांची धावपळ असते. या सर्व दस्तांची काळजी पूर्वक पूर्तता करुन घेऊन नोंदणी करणे आवश्यक असते. तसेच प्रमाणित प्रती देण्यासाठी किंवा सुची क्र.२ च्या प्रमाणित प्रती व्यवस्थीत नक्कल केल्यानंतर त्यावर तपासून स्वाक्षरी करावी लागते तसेच वरील पक्षकारांपैकी ५० ते ६० टक्के पक्षकारांना त्यांचे दस्तांबाबत दस्त पाहून माहिती देणे, त्यांचे तक्रारींचे निवारण करणे, दस्तांमध्ये आवश्यक त्या कादगपत्रांची उदा.नागरी कमाल मर्यादा धारणा कायदा १९७६ चे अनुषंगाने शासनाने विहित केलेले नियमानुसार यादी तपासून त्यानुसार आवश्यक ती पूर्तता करुन घेणे, व इतर माहिती पुरविणे अशा प्रकारची तसेच प्रमाणित प्रतींचे, नोंदणी फी ची चलने स्वाक्षरी करुन देणे इत्यादि प्रकारची कामे दररोज पार पाडावी लागतात.

त्याचप्रमाणे अभय योजना २००८ मधील प्रलंबित दस्तांची नोंदणी करणे, सुची २ करणे, फोटो कॉपीसाठी दस्त पाठविणे, परत आलेले दस्त संबंधित पक्षकारास परत करणे इत्यादि बाबत नियंत्रण करावे लागते.

त्याचप्रमाणे पोलीस खाते मार्फत बऱ्याच वेळा जबाब घेण्यासाठी किंवा त्यांनी मागणी केले दस्त ऐवज आवश्यकतेनुसार तातडीने पुरविणे किंवा त्यांचेकडे प्राप्त झालेले दस्तऐवज खरे आहेत किंवा कसे? याबाबतचे अहवाल मागविले जातात. त्यामध्ये सर्व संबंधित अभिलेखांची पडताळणी करुनच अहवाल सादर करावे लागतात.

त्याचबरोबर कोर्ट केसेसमध्ये कोर्टास त्यांनी दिलेल्या पिटिशन प्रमाणे " Parawise Comments " तसेच " Afirmation सादर करावे लागते. तसेच सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर रहावे लागते.

तसेच या खात्याचे वरिष्ठ कार्यालयांकडून महत्वाचा किंवा तातडीचा पत्रव्यवहार स्वतःलाच करावा लागतो माहिती अधिकार पत्रांची उत्तरे स्वतःला माहिती घेऊन तयार करावी लागतात.

वरील नमूद सर्व कामकाज केवळ या कार्यालयात अपूरा व अत्यल्प कर्मचारी वर्ग असल्याने मला स्वतःलाच जबाबदारीने पार पडावे लागते.

तरी वरील सर्व बाबी सांभाळून माहिती अधिकारामधील श्री.दिपक फुरीया यांना माहिती देण्यात आली.

याच कालावधीमध्ये शासनाकडून चलनाने भरलेल्या रकमेचा जमा ताळमेळ आर्थिक वर्ष २००४-०५ ते २००८-०९ पर्यंतचा तातडीने पूर्ण करुन सादर करण्यासाठी मोहिम राबविणेस आदेशित केले होते. त्यानुसार शासनाने दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने सदरचे कामकाज तातडीने हाती घेणे भाग पडले होते. त्या दरम्यानचे वरील खुलाशात नमूद केलेल्या कामकाजास आयताच विराम देण्यात आल्याने अपिलार्थी यांना माहिती पुरविणेस विलंब झालेला आहे. तसेच यापुढे विलंब टाळण्याची दक्षता घेण्यात येईल."

तसेच अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

" उपरोक्त विषयोकित माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया यांचे माहिती अधिकारात मागविलेल्या माहितीबाबत मुद्दे निहाय खुलासा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१) श्री.दिपक लक्ष्मीचंद फुरीया यांनी माहिती अधिकारात मागविलेली माहिती या कार्यालयाचे अधिनस्त असलेले राज्य जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-२ (अभिलेख कक्ष) मुंबई शहर. यांनी योग्य व सुसंगत माहिती दिली आहे. त्याबाबत या कार्यालयाचे कोणतेही दुमत नाही

२) श्री.दिपक लक्ष्मीचंद फुरीया यांनी मागणी केलेल्या माहिती बाबत राज्य जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक ५.१०.२००९ रोजी दखल केले होते. त्यावर अपिलकर्ते यांना दिनांक २९.१०.२००९ रोजी सुनावणी दिली असून अपिलकर्ते हे सुनावणीस अनुपस्थित होते. अपिल कर्तेयांचे पत्र प्राप्त दिनांक ४.११.२००९ नुसार सदर प्रकरणात आदेश निर्गमीत करण्यास सुचीत केले आहे. त्याप्रमाणे दिनांक १२.११.२००९ रोजी अपिल निर्णय पारित करण्यात आला असून अपिलकर्ते यांना पोष्टाने यु.सि.पी. पाठविण्यात आले आहे. म्हणजेच सदरचे निर्णयास ३० दिवसापेक्षा जास्त कालावधी म्हणजे ३९ दिवस झालेले आहे.

माननीय महोदयास खुलासा अंती सादर करण्यात येते की, माहिती अधिकारातील प्रथम अपिलीय अधिकारी यांना अपील निर्णय देतांना कलम ४ मधील विवेचनात नमूद केले प्रमाणे सर्वकश निर्णय देतांना सर्व तरतूदी गृहीत धरुन ज्यास्तीत जास्त ४५ दिवसाची मुदत आहे. आपले अपिलातील मुद्याप्रमाणे ३० दिवसापेक्षा जास्तीचा कालावधी लागलेला आहे. कारण की प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कार्यालय प्रमुखचा अतिरीक्त कार्यभार आहे. त्याचे मुळ पदावर म्हणजेच नोंदणी उपमहानिरीक्षक, मुंबई, कार्यालयातील राज्य जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत आहे. ठाणे जिल्हयात झालेल्या चलन गैर प्रकारामुळे मुंबई विभागातील सह दुय्यम निबंधक यांचे कार्यालयातील सन २००४ पासून चलणाने शासन महसुल जमा रक्कमेचे ताळमेळ घेण्याबाबत शासनाने तात्काळ तपासणी आदेश दिले होते. सदर काम हे स्वत: तपासणी करणेस आदेशीत केले असल्याने त्या करीता मोहिम करुन त्याचे नियोजन तसेच संयोजन या कामकाजामध्ये व्यस्त असल्यामुळे तसेच हे कार्यालय लोकाभिमुख असल्याने या कार्यालयात रोज हजारो पक्षकार भेट देत असतात त्यांचे शंका समाधान/मार्गदर्शन करावे लागते त्यामुळे सदर अपील प्रकरणात ३० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागलेला आहे. या पुढील कालावधीत वेळेमध्ये अपील प्रकरणांत निपटारा करण्याची दक्षता घेण्यात येईल .

तरी वरील प्रमाणे प्रथम अपीलाबाबत या कार्यालयाची माहिती व खुलासा माननीयांना सविनय सादर करणेत येत आहे. "

हे दोन्ही खुलासे मान्य करण्यात येत आहेत. त्यामुळे शास्ती विषयीचे कुठचेही आदेश नाहीत.

मात्र अर्जदाराने उपस्थित केलेले मुद्दे हे महत्वाचे आहेत. त्याची अतिरिक्त मुख्य सचिव (महसुल व पुनर्वसन) विभाग मंत्रालय यांनी दखल घेणे आवश्यक आहे व मूळ कागदपत्रे परत करण्याची मोहिम इन्स्पेक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन, नवीन प्रशासकीय इमारत, कॉन्सील हॉल समोर, पुणे यांचे मार्फत हाती घेणे आवश्यक आहे. अशी मोहिम पुन्हा एकदा हाती घेण्यात यावी यासंबंधीची माहिती वेब साईट आणि सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालये यांच्याकडे जनतेसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदरील आदेशाची प्रत अतिरिक्त मुख्य सचिव (महसुल व पुनर्वसन) व इन्स्पॅक्टर जनरल ऑफ रजिस्ट्रेशन यांना

पाठविण्यात यावी व मोहिम वजा कार्यक्रम हाती घेऊन त्याची विस्तृत प्रसिध्दी वर्तमानपत्र, सर्व संबंधित कार्यालये व वेब साईट वर करुन कागदपत्रे परत करण्यासाठी व्यापक कार्यक्रम राबवावा. असा निर्देश आयोग देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७७१/अपील क्रमांक ५६७४/०२**

**श्री. सरोजकुमार एस.तिवारी,** **-------- अपीलकर्ता**
**रुम नं. १०६, इमारत क्र. बी-१, गावदेवी वसाहत,**
**लिंक रोड, गोरेगांव (प),**
**मुंबई ४०० १०४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पी/दक्षिण विभाग, मिठानगर महापालिका शाळेचे आवार,**
**मठानगर, गोरेगांव (प), मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पी/दक्षिण विभाग, मिठानगर महापालिका शाळेचे आवार,**
**मठानगर, गोरेगांव (प), मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.०२.२०१०

सुनावणीचा दिनांक : १३.०५.२०१०

अपीलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलार्थीच्या अपिलावर पुढीलप्रमाणे स्पष्टिकरण जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.

" श्री सरोजकुमार तिवारी यांच्या दिनांक ३०.०९.२००९ रोजी आलेल्या अर्जाला मी दि. २८.१०.२००९ रोजी उत्तर व माहिती दिलेली आहे की माझ्या रेकॉर्ड प्रमाणे दिनांक १६.०६.२००८ रोजी निष्कासन कारवाई झालेली नाही. ही माहिती त्यांना दिनांक १.०४.२००८ रोजी माझ्या आधिचे जे जन माहिती अधिकारी होते त्यांनी सुध्दा कळविली होती. प्रथम अपीलामध्ये चर्चा

सुनावणी झाल्यावर त्यांना हव्या असलेल्या उत्तराची प्रत दिनांक ६.०१.२०१० रोजी देण्यात आली. तसेच माझ्या कालावधीमध्ये झ ाालेल्या निष्कासनाची माहिती त्यांना दिनांक ३१.१२.२००९ रोजी उत्तर देऊन कळविली होती. "

या निवेदनानुसार रेकॉर्ड प्रमाणे असलेली सर्व माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४३९७७/अपील क्रमांक ४९३०/०२**

**श्री. डॉ.श्रीकांत एस.प्रभू,** **-------- अपीलकर्ता**
**बी-२३, उद्यान प्रभा, तेजपाल स्किम रोड नं. ०२,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा होऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय सह.निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा होऊस,**
**६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

## - वि वे च न -

अर्जदार डॉ.श्रीकांत एस.प्रभू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ७.०६.२००९ रोजी अर्ज करुन, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई कार्यालयात विविध तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. संबंधीत कागदपत्राची पहाणी करण्याकरीता कागदपत्र उपलब्ध करुन दिली नाहीत. यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १३.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांकी ६.०८.२००९,१७.०८.२००९ व २५.०८.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली अपीलकारास मागणीप्रमाणे १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय उत्तर द्यावे असे दिनांक २६.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक ३०.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, अपीलकाराने दाखल केलेल्या विविध तक्रार अर्जावरील कारवाईची माहिती मागितली होती सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल खाली नमूद केल्यानुसार सादर केला.

"अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने श्री.एस.एस.प्रभू यांना तपासणी देण्यापत आली. सदर तपासणी वेळी श्री.प्रभू, तसेच उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा कार्यालयातील सहकारी अधिकारी श्रेणी-१ यांच्या उपस्थितीत तपासणी घेण्यात आली. त्यावेळी श्री.प्रभू यांनी कार्यालयाकडील शास्त्रीनगर व्दारका को.ऑप.हौसिंग सोसायटीलि संस्थेच्या धारीकेमधील उपलब्ध रेकॉर्डमधील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांची मागणी केली होती त्या अनुषंगाने या कार्यालयाने दिनांक २८.०७.२००९ रोजीच्या पत्रान्वये अर्धशासकीय पत्रे वगळून श्री.प्रभू यांना दिनांक १२.११.२००८, ५.१२.२००८, ९.१२.२००८, ५.१.२००९,२१.०३.२००९, २३.०३.२००९, २८.०५.२००९, २९.०५.२००९ व ३.०६.२००९ रोजीची त्यांना हवी असलेल्या कागदपत्रे विनाशुल्क२८.०७.२००९ रोजी दिलेली आहेत. तसेच दि.१६.१०.२००९ रोजी दिनांक २३.०३.२००९,२८.०५.२००९,२.०६.२००९ व ९.०६.२००९ च्या अर्धशासकीय पत्राच्या प्रतीही विनाशुल्क देण्यात आलेल्या आहेत. सबब या कार्याल्याकडे असणाऱ्या त्यांना हव्या असलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती या कार्यालयाने पुरविलेल्या आहेत. "

जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४१८९१/अपील क्रमांक ४८३८/०२**

**श्री. डॉ.श्रीकांत एस.प्रभू,** **-------- अपीलकर्ता**
**बी-२३, उद्यान प्रभा, तेजपाल स्किम रोड नं. ०२,**
**विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग,**
**मल्होत्रा होऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी**
**विभागीय सह.निबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मल्होत्रा होऊस,**
**६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

**- वि वे च न -**

अर्जदार डॉ.श्रीकांत एस.प्रभू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, शास्त्रीनगर व्दारका सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.४.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास मुद्येनिहाय माहिती दिली. कागदपत्र निरीक्षणाकरीता दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दिनांक ९.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा यांचे कार्यालयाकडे पाठपुरावा करुन अपीलकाराच्या तक्रार अर्जावर तसेच कार्यालयाकडील दिनांक १४.०१.२००८ च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलकारास त्वरीत द्यावा असे दिनांक २३.०६.२००९ रोजी प्रथम अपिलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्याव्यात असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कागदपत्र अपीलकारास उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकारास हवी असलेली माहिती संबंधीत धारिकेवर उपलब्ध नव्हती यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दिनांक १५.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन, शास्त्रीनगर व्दारका सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबत एकूण ७ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागितली होती. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी प्रथम संबंधीत धारिका अपीलकारास निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन दिली. त्यानुसार अपीलकाराने दिनांक १०.०६.२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची तपासणी केली. त्यानंतर त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राची यादी कार्यालयाकडे सादर केली त्यापैकी अ.शा.पत्र दिनांक २३.१२.२००८,१७.०२.२००९,३.०३.२००९ व १६.०३.२००९ ही अर्धशासकीय पत्रे ही प्रशासकीय कामकाजाच्या भागाच्या अंतर्गत पत्रव्यवहारी असल्याने त्याची प्रत साधारणतः देखील देता येत नाही. त्यामुळे माहिती अधिकारांतर्गत अपीलकारास अर्धशासकीय पत्राच्या प्रती देण्याचे नाकारले अर्धशासकीय पत्र वगळता इतर सर्व कागदपत्राच्या प्रती घेऊन जाण्याबाबत अपीलकारास दिनांक २८.०७.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास कळविले होते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ अनुसार माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद करण्यात आला आहे. त्यामध्ये अर्धशासकीय पत्राचा समावेश नाही. त्यामुळे अर्धशासकीय पत्राच्या प्रती अपीलकारास दिल्या पाहिजेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती पुरवाव्यात. माहिती नाकारताना ती कोणत्या कलमानुसार नाकारली आहे ते सकारण अर्जदारास कळविण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांच्यावर असते याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी. अशी त्यांना समज देण्यात येते.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००८/३६२४१/अपील क्रमांक ३७८५/०२**

**श्री. गजानन रमाकांत देसाई** **------- अपीलकर्ता**
**दुलाबा-प्रसाद, एस.एम.जाधव मार्ग,**
**दादर, मुंबई ४०० ०१४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**रजिस्ट्रार जनलर, उच्च न्यायाल, मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मास्टर अंड सहाय्यक प्रोथेनोटरी (प्रशासन),**
**उच्च न्यायालय मुंबई ४०० ०३२.**

**- वि वे च न -**

श्री.गजानन रमाकांत देसाई, दादर, मुंबई यांनी दिनांक १४.०७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालयख मुंबई यांचेकडे माहिती अर्ज सादर करुन श्री. बी.बी.नांगरे, अतिरीक्त मुख्य न्यायाधिश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे विरुध्द दिनांक २३ मार्च, २००४ रोजी मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सर्वकष माहिती मागविली आहे.

जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १४ जुलै, २००८ रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीने दाखल केलेली दिनांक २३ मार्च,२००४ ची तक्रार मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई व शिस्तभंग विषयक समिती मधील न्यायमुर्तींनी दिलेल्या सुचनेवरुन तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाने व्यथीत होऊन अपीलार्थीने दिनांक २०.०८.२००८ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील दिनांक ८.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणेच आदेश पारित केलेले आहेत.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने व्यथीत होऊन अपीलार्थीने दिनांक १४.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दिनांक १३.०२.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती त्यास अपीलार्थींसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुनावणी वेळी दाखल केलेल्या कागदपत्रात असे नमूद केले आहे की, कोणत्याही न्यायिक अधिकारी यांचे विरुध्द तक्रार प्राप्त झाली तर ती गोपनीय प्रकारची आहे. न्याय व्यवस्थेतील प्रशासकीय कामाच्या दृष्टीने सदर माहिती गोपनीय रहाणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

अपीलार्थीने सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अर्जात असे नमूद केले आहे त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार त्यांना माहिती देण्यास वंचित ठेवूशकणार नाही तरी सदर माहिती त्यांना मिळावयास हवी.

अपीलार्थीचे अपील व सोबतची कागदपत्रे तसेच सुनावणी वेळी अपीलार्थीने व जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेले Submission पाहता नियंत्रणा खालील दुय्यम न्यायालयातील एका न्यायिक अधिकारी यांचे विरुध्द केलेल्या तक्रारी संदर्भात मुख्य न्यायमुर्ती व न्यायमुर्तीच्या चौकशी समितीने चौकशी अंती प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे व तसे अर्जदारास कळविले आहे. न्यायिक अधिकारी यांचे संदर्भातील चौकशीतील कागदपत्रे जनतेस उपलब्ध करुन देण्याचा निर्णय न्यायालयाची प्रतिष्ठा, इतरांकडून हस्तक्षेप याबाबी लक्षात घेता उच्च न्यायालयानेच घेणे योग्य राहील. तूर्त तरी निर्णयाची माहिती देण्याचा प्रथम अपिलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य वाटतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६७७३/अपील क्रमांक ५६८०/०२**

**श्री. अजितकुमार पंजाबी,** **-------- अपीलकर्ता**
**व्दारा :- रमझान भटार चाळ नं. २६३/५,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, तक्याबाई कुर्ला (प),**
**मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभागाग कार्यालय मालाड (प),**
**मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (परिक्षण), मुंबई महानगरपालिका,**
**पी/उत्तर विभागाग कार्यालय मालाड (प),**
**मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १३.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की अर्जदाराने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे त्यांना दिनांक ६.०९.२००९ रोजीच्या अर्जाने स्वत: येऊन कागदपत्र पाहून त्यांनी निवडलेली कागदपत्रे त्वरित देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे कळविण्यात आले. मात्र अजूनही त्यांनी कागदपत्रांचे अवलोकन केलेले नाही. सुनावणीच्या वेळी अर्जदाराने कागदपत्रांची पाहणी करुन योग्य त्या कागदपत्रांसाठी शुल्क भरुन ती प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १३.०५.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

**क्रमांक :-मुमाआ ४६७७२/अपील क्रमांक ५६८१/०२**

**श्री. अजितकुमार पंजाबी,** -------- **अपीलकर्ता**
**व्दारा :- रमझान भटार चाळ नं. २६३/५,**
**डॉ.आंबेडकर मार्ग, तक्याबाई कुर्ला (प),**
**मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका,**
**एच/वस्ट विभागा, बांद्रा, मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक अभियंता (परिक्षण खाते), मुंबई महानगरपालिका,**
**एच/वस्ट विभागा, बांद्रा, मुंबई**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.०२.२०१०
सुनावणीचा दिनांक : १३.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की अर्जदारास नगर उपअभियंता नियोजन व संकल्प चित्रे यांच्या (CE/PD/९५२८/III) कार्यालयातील माहिती शुल्क भरुन घेऊन जाण्यासंबंधी कळविलेले आहे.

मात्र अजून हे शुल्क भरलेले नाही. वास्तविक पाहता फक्त शुल्क भरावे एवढेच कळविणे योग्य नाही तर किती शुल्क भरायला पाहिजे हे सुध्दा अर्जदारास स्पष्ट करण्यात यावे व त्यानंतर शुल्क भरुन अर्जदाराने ही माहिती घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६२३२ ते ४६२३६/अपील क्रमांक ५५४५/०२**

**श्री. वसंत शामराव उटीकर,** **-------- अपीलकर्ता**
**तिरंगा को-ऑप,हौ.सो.लि., डी-२०/०:३,**
**तळमजला,सेक्टर २५,जुईनगर,**
**नवी मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**विक्रीकर सह आयुक्त, (मुख्यालय), विक्रीकर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, विक्रीकर भवन, माझगांव,**
**मुंबई ४०० ०१०**

**जन माहिती अधिकारी**
**विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०**

**- वि वे च न -**

श्री. वसंत शामराव उटीकर, यांनी दि. २६.०८.२००९ च्या अर्जान्वये विक्रीकर निरीक्षक या पदांचे बढती व बदली संदर्भातील दि.१.०१.२००८ ते ३१.०५.२००९ या कालावधीत माहिती मागविली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०९.२००९ च्या पत्रान्वये माहिती अर्जास उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती समाधानकार नसून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने दिलेली नाही. त्यांनी दिलेल्या उत्तरातून काहीही बोध होत नाही असे नमूद करुन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दि.१४.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे दाखल झालेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दि.२७.११.२००९ रोजी आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशात बऱ्याच मुद्यांबाबतची माहिती उपलब्ध असल्यास द्यावी असे नमूद केलेले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित वेळेत अपील निकाली काढले नाही म्हणून व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी आयोगाच्या कार्यालयात दि. १९.०३.२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलार्थीसह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे वतीने विक्रीकर निरीक्षक उपस्थित होते.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती बढती, बदली कार्यमुक्त करणे इत्यादिबाबत आहे व ती देण्याचे आदेश अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेत त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**अपिलार्थीने माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे सर्व माहिती अपीलार्थीस देण्यात आली आहे याची खात्री अपिलीय अधिकारी यांनी करुन घ्यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४६२३२ ते ४६२३६/अपील क्रमांक ५५४८/०२**

**श्री. वसंत शामराव उटीकर, -------- अपीलकर्ता**
**तिरंगा को-ऑप,हौ.सो.लि., डी-२०/०:३,**
**तळमजला,सेक्टर २५,जुईनगर,**
**नवी मुंबई ४०० ७०५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विक्रीकर सह आयुक्त, (मुख्यालय), विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य विक्रीकर भवन, माझगांव,**
**मुंबई ४०० ०१०**

**जन माहिती अधिकारी**
**विक्रीकर आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विक्रीकर भवन,**
**माझगांव, मुंबई ४०० ०१०**

**- वि वे च न -**

श्री. वसंत शामराव उटीकर, यांनी दि. ०१.०८.२००९ च्या अर्जान्वये श्री. अनिल बुद्रुककर आस्थापना अधिकारी, विक्रीकर सहा आयुक्त (प्रशा - व्हॅट) नांदेड विभाग यांचे विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागविली आहे. सदर माहिती अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०८.२००९ रोजी माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून दि. १८.०८.२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१९.०९.२००९ रोजी आदेश पारित केलेले आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दि. २४.१२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

त्या व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक १९.०३.२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपीलकर्त्यासह जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेवतीने विक्रीकर निरीक्षक उपस्थित होते.

अपिलकर्त्यांचे अपील व त्या सोबतची कागदपत्रे तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी वेळी सादर केलेली माहिती पाहता मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन झाले आहे याची खात्री करुन घ्यावी.**

**अर्जदाराची मागणी अपीलाचा निर्णय देण्यास अपिलीय अधिकाऱ्यांनी विलंब लावला म्हणून त्यांचेवर कारवाई व्हावी अशी आहे. अपिलीय अधिकारी यांनी विलंबास दिलेली कारणे सयुक्तिक वाटतात.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४७३४२/अपील क्रमांक ५६९४/०२**

**श्रीमती सुजाता गौरीशंकर हुलवान,** **-------- अपीलकर्ता**
**आदिराज गार्डन मॅपल,बी/१०२, सेक्टर-५,**
**प्लॉट नं. ३२, खारघर,**
**नवी मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहाय्यक आयुक्त्, बृहन्मुंबई महापालिका,**
**एम/पूर्व विभाग कार्यालय, चेंबूर, मुंबई ४०० ०७१**

**जन माहिती अधिकारी**
**प्रशासकीय अधिकारी (शाळा), बृहन्मुंबई महापालिका,**
**एम/पूर्व विभाग कार्यालय, चेंबूर, मुंबई ४०० ०७१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०३.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : १५.०५.२०१०
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांना महापालिकेने निलंबीत केल्याच्या संदर्भात काही माहिती पाहिजे होती व ही माहिती कार्यालयात बोलवूनही मिळाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदाराचा जो प्रमुख मुद्दा आहे तो निवार्हभत्ता देण्यात येत असतो असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले, तसेच निलंबनासंदर्भात महापालिकेची जी नियमावली असते त्या नियमावलीची प्रत, सानुग्रह अनुदान व निवार्ह भत्ता यांच्या प्रती हया अर्जदारास पुन्हा बोलवून त्यासंबंधी असलेली कागदपत्रे देण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४७४३७/अपील क्रमांक ५७१३/०२**

**श्री. हमिद मो. सिद्दीक खान,** **-------- अपीलकर्ता**
**१८/ए,अरब लेन, बोरी चाळ, १ ला मजला,**
**रु.न.२१-२३, नागपाडा, मुंबई**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर, बृहन्मुंबई महापालिका, ई विभाग इमारत,**
**३ रा मजला,शेख अफिझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र.) शहर - I, बृहन्मुंबई महापालिका, ई विभाग इमारत,**
**३ रा मजला,शेख अफिझुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई ४०० ००८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १५.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : १५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला हव्या असणाऱ्या माहितीची नस्ती पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आली होती. त्याच्या रिसीटची कॉपी अर्जदास देण्यात आली आहे. त्यामुळे अर्जदारास हवी असणारी माहिती देता येऊ शकली नव्हती. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की आता ही नस्ती पोलीस विभागाकडून परत आलेली आहे व अर्जदारास हवी असणारी माहिती ही दहा दिवसाच्या आत देतण्यात येईल त्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही करावी.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ ४७४३५/अपील क्रमांक ५७११/०२**

**श्री. संजय आर हरिटवाल,** **-------- अपीलकर्ता**
**६, हरिट निवास, कामगार केंद्राजवळ,**
**गुंदवली गाव, अंधेरी (पूर्व),**
**मुंबई ४०० ०६९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता (के/पूर्व विभाग), ३ रा मजला,**
**के/पूर्व विभाग इमारत, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९**

**जन माहिती अधिकारी**
**सहाय्यक अभियंता (इ.व का.), ३ रा मजला, के/पूर्व विभाग इमारत,**
**आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०९.०३.२०१०
सुनावणीचा दिनांक : १५.०५.२०१०
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षांशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की अर्जदार दिनांक २१.०५.२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता नस्तीचे अवलोकरन करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातील. त्यांनी तपासणी करुन निवडलेल्या कादगपत्रांच्या प्रती शुल्क भरुन त्यांना शक्य तो त्याच दिवशी देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००९/४६४०९/अपील क्रमांक ५५९३/०२**

**श्री. पांडूरंग बाबूराव बनके** **--------- अपीलकर्ता**
**८०४/ब, राजश्री रॉवर, प्रताप सिनेमा,**
**कोलबाड ठाणे (प), जि.ठाणे - ४०० ६०१.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, विकास विभाग इमारत जूने जकातघर,**
**मुंबई ४०० ०२३**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप अभियंता दक्षिण (सा.बा.), उपविभाग,**
**एम.टी.डी.सी.कार्यालयासमोर, मादाम कामा रोड,**
**मुंबई ४०० ०३२**

**- वि वे च न -**

श्री.पांडूरंग बाबुराव बेनके यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या दि. ४.१०.२०१० च्या अपीलाचे अनुषंगाने मी दि. २६.०२.२०१० रोजी आदेश पारीत करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासा मागविला होता. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २९.०३.२०१० पत्र लक्षात घेता त्यांचा खुलासा मान्य करण्यात आला आहे. जन माहिती अधिकाऱ्याने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. उर्वरीत मोजमाप पुस्तके उपलब्ध होताच देण्यात येतील असे कळविले आहे.

त्यामुळे मी खालील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २०.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००९/२७५८/अपील क्रमांक १५२/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/२१०६४/अपील क्रमांक १५३/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/८५२९/अपील क्रमांक ७६५/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/८५३३/अपील क्रमांक ७६८/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/८५३६/अपील क्रमांक ७७०/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/१२५६/अपील क्रमांक १२५६/०२**

**श्री. ज्ञानचंद्र पाटील,** **-------- अपीलकर्ता**
**शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,**
**सांगली, जि.सांगली ४१६ ४१६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय,**
**पुणे १,**

**जन माहिती अधिकारी**
**सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, संचालनालय,**
**पुणे १ यांचे कार्यालय**

**- वि वे च न -**

श्री.ज्ञानचंद्र पाटील, रा.सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम १९ (३) खाली दाखल केलेल्या अपीलांची सुनावणी सांगली येथे दि. ४.०५.२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी डॉ.पाटील तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी अंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अपील क्रमांक | आदेश |
|---|---|---|
| १ | १५२ | आयोगासमोर सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार त्यांच्या दिनांक १३.११.२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. त्या माहितीने अपीलार्थींचे समाधान झाले नसल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन कागदपत्रे बघावी व त्यातून हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. |
| २ | १५३ | उत्तरवादींनी आयोगास दिलेल्या लेखी निवेदनानुसार अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे प्राप्त माहिती व्यतिरिक्त त्यांना आणखी माहिती अपेक्षित असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पूर्वसूचना देऊन कार्यालयातील कागदपत्रे बघावी व आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| | | असलेल्या कादपदपत्रांच्या छायाप्रती घ्याव्यात. या प्रती जन माहिती अधिकारी यांनी विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्यात. |
| ३ | ७६५ | सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आले की अपीलार्थींच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन आदेश पारित केलेले नाही. तरी प्रथम अपीलावरील सुनावणी घेणे अधिनियमानुसार बंधनकारक असल्याने असा प्रकार पुन्हा घडणार नाही याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे दक्षता घ्यावी असे आयोगाचे निदेश आहेत. उत्तरवादींतर्फे दिलेल्या निवेदनानुसार अपीलार्थींना माहिती दिल्याचे दिसते. तथापि त्यांना आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा व हव्या असलेल्या माहितीचा तपशील जन माहिती अधिकारी यांना द्यावा. जन माहिती अधिकारी यांनी ती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. |
| ४ | ७६८ | अपीलार्थीनी दिनांक ४.०६.२००८ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती प्राप्त करण्यासाठी अपीलार्थींनी पूर्व नियोजित वेळ ठरवून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कागदपत्रांची पाहणी करावी व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांचा तपशील जन माहिती अधिकारी यांना द्यावा. जन माहिती अधिकारी यांनी तपशीलानुसार कादगपत्रांच्या छायाप्रती अपीलार्थींना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. |
| ५ | ७७० | अपीलार्थींना उत्तरवादींनी संपूर्ण माहिती दिलेली नसल्याचे उत्तरवादींनी आयोगाकडे सादर केलेल्या निवेदनावरुन दिसते याबाबत असे निदेश देण्यात येतात की अपीलार्थींना उर्वरित माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. |
| ६ | १२५६ | अपीलार्थीनी मागितलेली माहितीशी संबंधित कादपत्रे व नस्त्या अपीलार्थींना पूर्व नियोजित वेळ निश्चित करुन उपलब्ध करुन द्याव्या. अपीलार्थीनी सर्व कागदपत्रे बघावी व त्यांना ज्या कागदपत्रांच्या छायाप्रती हव्या आहेत त्याचा तपशील जन माहिती अधिकारी यांना पुरवावा. जन माहिती अधिकारी यांनी त्याच्या छायाप्रती अपीलार्थींना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. |

**उपरोक्त सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट निदेशानुसार कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २०.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक १८८६/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक १८८७/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ६९३/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ६३०/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ६७७/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ६७८/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ९४९/०२**

**श्री. ज्ञानचंद्र पाटील,** **-------- अपीलकर्ता**
**शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,**
**सांगली, जि.सांगली ४१६ ४१६**

**विरुध्द**

**१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मिरज, जि.सांगली**

**२) प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**ताराबाई पार्क, कोल्हापूर**

**१) जन माहिती अधिकारी तथा**
**उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मिरज, जि.सांगली**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**किल्ला भाग, मिरज, सांगली**

**- वि वे च न -**

श्री.ज्ञानचंद्र पाटील, रा.सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम १९ (३) खाली दाखल केलेल्या अपीलांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की त्यांनी सादर केलेली सर्व अपीले ही सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज,जि.सांगली यांचे कार्यालयाशी संबंधीत आहे. सर्व साधारणपणे अपीलार्थीने रस्तेबांधकाम नागरीकांची सनद व

फलक प्रदर्शन, शासकीय कर्मचाऱ्यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या, जा-ये-नोंदवही, दैनंदिनी, शासकीय निवासस्थान दुरुस्ती व स्वच्छता, महापूरानंतर प्राप्त निधी व खर्च व तसेच अतिक्रमण व निष्कासन इत्यादि बाबतची माहिती मागितली आहे. विशेषतः सर्व माहितीचे निरीक्षण करण्याबाबत माहिती अंतर्गत नमूद केलेले आहे. सर्व संबंधित जन माहिती अधिकारीयांनी काही प्रकरणी निरीक्षण करुन त्यांना हवी असलेली माहिती दिली आहे. तथापि अपीलार्थीचे समाधान झ ाले नाही. काही वेळा जन माहिती अधिकारी वेळेवर उपस्थित नव्हते म्हणून निरीक्षण करण्यात आलेले नाही. ती माहिती निरीक्षण करुन विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची मागणी अपीलार्थीने केलेली आहे.

वरील सर्व अपीलाची एकत्रित सुनावणी जिल्हा अधिकारी कार्यालय, सांगली येथे दिनांक ४.०५.२०१० रोजी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीस संबंधित जन माहिती व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी वेळी सर्व संमतीने जी माहिती अपीलार्थीस मिळालेली नाही व संबंधित कार्यालयास उपलब्ध आहे त्या सर्व माहितीबाबत अपीलार्थीने दिनांक १५.०५.२०१० रोजी ११.०० वाजता सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन निरीक्षण करावे व निरीक्षणाअंती त्यांना हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विनामुल्य द्यावी.

## आदेश

**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट निदेशानुसार कार्यवाही करावी.**

**वरील सर्व अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २१.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२४६/०२**

**श्री. अच्युत जनार्दन इनामदार,** **------ अपीलकर्ता**
**विरामेळा,कॉलेज रोड, दिव्य दर्शन सोसा.,**
**बी-९, विसे मळा,नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**पोलीस उपायुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक, परिक्षेत्र**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक, परिक्षेत्र**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अच्युत जनार्दन इनामदार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. २७.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) अप्पर पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नाशिक यांचेकडील दि.११.०८.२००८ च्या पत्राची प्रत. २) नाशिक शहर मोटार परिवहन विभाग सन २००३ मध्ये हलक्या व खोटया बनावटीचे स्पेअर पार्टस सील करण्यात आले त्याच्या चौकशी अहवालाची प्रत.३) सील करण्यात आलेले स्पेअर पार्टस कमी आढळून आले त्याच्या चौकशीची प्रमाणित प्रत इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ८.०७.२००९ च्या पत्राव्दारे अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा अर्ज मा.महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो महाराष्ट्र राज्या मुंबई यांच्याकडे मूळ कागदपत्रासह सादर करण्यात आल्याचे कळविले तसेच मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविले. माहिती न मिळाल्याने अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्याची सुनावणी दि. १९.०९.२००८ रोजी घेण्यात आली त्यावेळी अपीलार्थी व उत्तरवादी उपस्थित होत त्यावेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी असे सूचित केले की मागितलेली माहिती प्रकरण मा.महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना मूळ चौकशी कागदपत्रासह सादर करण्यांत

आला तो निर्णयास्तव प्रलंबित असल्याने या प्रकरणाच्या अहवालाची प्रत देता येणार नाही कारण महाराष्ट्र राज्य लाचलुचपत विरोधी केंद्र कार्यपध्दती सूचना व नियमावली मधील नियम १० अन्वये गुप्त चौकशी आणि उघड चौकशीची सर्व प्रकरणे ही गोपनीय समजण्यात येतील तसेच माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (१) अन्वये माहिती देता येत नाही. या विरोधात अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. महत्वाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांचे म्हणणे समजू शकले नाही परंतु प्रस्तुत प्रकरणांत असे दिसून येते की चौकशीच्या बाबतीत अजून निर्णय झालेला नसल्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कृती योग्य आहे. मात्र चौकशीवर ब्युरोचा निर्णय झाल्यानंतर ही कागदपत्रे देण्यात यावीत या कारणास्तव खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२२४/०२**

**श्री. सुधीर हरीभाऊ उमराळकर,** **------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं. ५, गार्डन व्हयू अपार्टमेंट,**
**क्षिरसागर कॉलनी, पंचवटी,**
**नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपायुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक रोड,**
**नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**विभागीय आयुक्त कार्यालय, महसूल शाखा, नाशिक,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. सुधीर हरीभाऊ उमराळकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ७.०५.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०२.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) श्री.रमेश कारभारी मिसाळ (तहसिलदार) इगतपुरी जि.नाशिक २) सौ.प्रज्ञा बढे (मिसाळ) उप जिल्हाधिकारी नाशिक, प्रशासन यांचे शासन सेवेत त्यांच्या वडिलोपार्जीत व बक्षिस मालमत्तेचा तपशील इत्यादि माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०.०२.२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती जनहित स्वरुपाची नसून वैयक्तिक स्वरुपाची आहे त्यामुळे अधिनियम २००५ चे नियम ८ (१) (छ) व (त्र) अन्वये अपिलार्थीस मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. असे लेखी कळविले. मागितलेली माहिती उपलब्ध करुन

न दिल्यामुळे अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले परंतु प्रथम अपिलावर अपिलार्थीने स्वाक्षरी न केल्यामुळे सदर अपील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दाखल करुन घेतले नाही त्यामुळे अपीलार्थीने व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी उत्तरवादी व अपीलार्थी हजर होते. त्यावेळी नजरेस आलेल्या बाबी:- १) अर्जदाराने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाबाबतची आहे. २) त्रयस्थ पक्षाने माहिती उघड करण्यास लेखी हरकत घेतली आहे. ३) मागितलेली माहिती व्यापक जनहित दिसून येत नाही.४) ही माहिती वेयक्तीक स्वरुपाची आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे नियम ८ (१) (छ) व (त्र) अन्वये पुरविण्यास लेखी नकार दिला हीत्यांची कृती योग्य आहे. अपिलार्थीस याप्रकरणी सविस्तर योग्यरित्या कळविण्यांत आलेले आहे त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश देत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२४०/०२**

**श्री. अब्दुल जब्बार मजीद,** **------ अपीलकर्ता**
**रसूलपूरा घ.न.२१,सर्वे नं. ७८९/९९,**
**माळेगांव,जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहाय्यक अयुक्त (कर) माळेगांव महानगरपालिका,माळेगांव,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.३, माळेगांव महानगरपालिका,**
**माळेगांव,जि.नाशिक**

**- विवेचन -**

अपीलकार श्री. अब्दुल जब्बार मजीद,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली सर्व्हे नं. ७८९/९०, प्लॉट नं. २१ या मिळकती सबंधी सन १९८९ ते २००६ पर्यंत घरपट्टी व इतर चार मुद्यांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०२.०६.२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीस मागितलेली माहिती ही लेखी स्वरुपात पुरविलेली आहे. परंतु अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी पुराव्यासाठी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२१.०७.२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अपिलार्थी व त्यांचे सहकारी उपस्थित होते त्यावेळी त्यांना सविस्तररित्या मागितलेल्या माहितीचे कागदपत्र व रिव्हीजनबुक यांचा उतारा इत्यादिची

पहाणी केली असता त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली असल्याचे त्यांनी सांगून त्यांना अपील पुढे चालववावयाचे नसल्याचे सांगितले त्यामुळे त्यांचे अपील प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी निकाली काढलेले आढळून आले. या परिस्थितीत मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/२१६/०२**

**श्री. वासुदेव सखाराम वायकोळे** **------ अपीलकर्ता**
**५२१/२२, रविवार पेठ, नाशिक,**
**ता.जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप विभागीय अधिकारी, उप अधिकारी कार्यालय,**
**नाशिक उपविभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**शिरस्तेदार, उप विभागीय अधिकारी कार्यालय,**
**उपविभाग नाशिक, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. वासुदेव सखाराम वायकोळे ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली १) मौजे नाशिक येथील सर्व्हे नं. ५०१/१ बाबत २/८१ दिनांक २०.०१.१९८२ अन्वये मंजूर केलेल्या बिनशेती आदेशाची नक्कलप्रत व इतर कागदपत्रे / दस्तऐवजांच्या नक्कलांची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९.०५.२००९ च्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जानुषंगाने मागितलेली माहिती कार्यालयीन अभिलेख कक्षात शोध घेतला असता सदर कागदपत्रे/आदेशाची प्रत अभिलेखांत आढळून आली नाही असे अर्जदारास लेखी कळविले. माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदर अपिलावर दिनांक १०.०७.२००९ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी वादी व प्रतिवादी उपस्थित होते. त्यावेळी वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेली कागदपत्रे अभ्यासली गेली तसेच अपील अर्जावर चर्चा करण्यात आली. त्यावेळी निदर्शनास आले की उपविभागीय अधिकारी नाशिक, उपविभाग नाशिक यांनी दिलेला आदेश रद्द होऊन चौकशी घेणेबाबत व त्यात फेरफार नोंद रद्द घेणेबाबत विनंती दिसली त्यामुळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिनांक १५.०७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात नोंद/आदेश रद्द करणे ही बाब माहिती अधिकार तरतुदीशी भिन्न असल्याने अपिलार्थीने त्याबाबत समक्ष न्यायालयात दाद मागून निर्णय घ्यावा. असे सूचित करण्यात आले आहे.

सदर बाब अपीलार्थीस मान्य नसल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले त्यावेळी अपीलार्थी अनुपस्थित होते तर उत्तरवादी उपस्थित होते. अपीलार्थी सुनावणीच्या वेळी अनुपस्थित राहिल्याने त्यांचे म्हणणे समजू शकले नाही तरीही प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी वेळीच अपीलार्थीस प्रत्यक्ष परिस्थिती समजून सांगितलेली आहे ही वस्तुस्थिती पहाता प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कृती योग्य आहे त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१६८/०२**

**श्री. दिलीप तुकाराम निकम,** **------ अपीलकर्ता**
**रा.नागचौक, जोशीवाडा, पंचवटी, नाशिक**
**जि.नाशिक.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**तहसिलदार, चाळीसगांव, जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**कामगार तलाठी मौजे कुसर,ता.चाळीसगांव,**
**जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. दिलीप तुकाराम निकम,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२५.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद केलेली मौजे कुंझर,ता.चाळीसगांव शेत जमिन गट नं. ९८/२ यात झालेली दिनांक १.०२.२००३ ची खरेदी खताची नोंद व सदर नोंदीसाठी दाखल केलेले कागदपत्रे व सुमनबाई तुकाराम मिस्त्री यांची ही झालेली नोंद व त्याची कागदपत्रे यांची नक्कलची मागणी केली होती.

नायब तहसिलदार चाळीसगांव यांनी अपीलार्थीचा अर्ज कामगार तलाठी कुंझर यांच्याकडे त्यांनी मागितलेली माहिती त्वरित पुरविण्यासाठी पाठविला होता परंतु त्यावर कामगार तलाठी/जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही या कारणास्तव अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले अर्जदाराने प्रथम अपील प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार चाळीसगांव यांच्याकडे दाखल करण्याऐवजी जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे पाठविले

त्यामुळे त्यांचे अपील परत तहसिलदार प्रथम अपिलीय प्राधिकारी चाळीसगांव यांच्याकडे वर्ग करण्यात आले परंतु त्यावर कोणतीही सुनावणी झाली नाही किंवा आदेश पारित झाले नाही म्हणून व्यथीत होऊन अपीलार्थीने व्दितीय अपील हे आयोगाकडे केले.

व्दितीय अपीलाच्या मुख्य सुनावणीच्या वेळी फक्त अपिलार्थी हजर होते प्रथम अपिलीय प्राधिकारी व जन माहिति अधिकारी दोघेही अनुपस्थित होते त्यावेळी अपीलार्थीने आयोगाकडे वस्तुस्थिती मांडली. दोघेही अधिकारी माहिति देण्यास तयार नाहीत माहितीसाठी शुल्कही भरले तरीही माहिती दिली नाही त्यामुळे मला मानसिक त्रास आर्थिक नुकसान झाले अशी त्यांनी तक्रार केली. प्रस्तुत प्रकरणी अवलोकन करता असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी जवळ-जवळ एकरा महिन्यात अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही त्यांचे हे वागणे बेजाबदार पणाचे व लोकहिताच्या विरुध्द आहे. त्यांनी माहिती जाणून-बुजून दिलेली नाही त्यामुळे त्यांच्या या बेजबाबदारपणास लगाम म्हणून त्यांच्यावर रुपये १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे सदर शास्ती त्यांच्या जुलै व ऑगस्ट, २०१० रोजी होणाऱ्या वेतनातून प्रत्येकी रु.५,०००/- याप्रमाणे वसुल करण्यांत यावी व ती रक्कम शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याची प्रत व अनुपालन अहवाल आयोगास दिनांक १५.०८.२०१० पर्यंत पाठवावा.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थींच्या अपीलावर कोणतीही कार्यवाही केलेली दिसत नाही. त्यांनीही त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली नाही तरी त्यांना वरिष्ठांनी त्यांच्या कामचुकारपणा बद्दल उपजिल्हाधिकारी यांनी समज द्यावी.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी शास्ती वसुलीची कार्यवाही योग्यरित्या पार पाडावी व हे आदेश मिळताच अपीलार्थीस १५ दिवसांच्या आत माहिती मिळेल याची काळजी त्यांनी घ्यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**या आदेशाची प्रत उपजिल्हाधिकारी, जळगांव यांना पाठविण्यात यावी.**
**संबंधीतांनी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ६९६/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ८७५/०२**
**क्रमांक :-मुमाआ २००९/अपील क्रमांक ८७६/०२**

**श्री. ज्ञानचंद्र पाटील,** **-------- अपीलकर्ता**
**शीतल, चांदणी चौक, दमाणी हायस्कूलजवळ,**
**सांगली, जि.सांगली ४१६ ४१६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कुलगुरु,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**१) जन माहिती अधिकारी तथा**
**कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**२) जन माहिती अधिकारी तथा**
**संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**३) जन माहिती अधिकारी तथा**
**परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**- विवेचन -**

श्री.ज्ञानचंद्र पाटील, रा.सांगली यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये उपरोल्लेखित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याविरुध्द कलम १९ (३) खाली दाखल केलेल्या अपीलांची सुनावणी सांगली येथे दि. ४.०५.२०१० रोजी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीसाठी अपिलार्थी डॉ.पाटील तसेच संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. सुनावणी अंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येऊन अपीले निकाली काढण्यात आली.

| **अ.क्र.** | **अपील क्रमांक** | **आदेश** |
|---|---|---|
| १ | ६९६ | अलालार्थींनी दिनांक १६.०२.२००८ च्या अर्जान्वये दिनांक १२.१०.२००५ ते दिनांक १६.०२.२००८ या कालावधीची क्रिडा विभागाशी संबंधित विविध मुद्यांवर माहिती मागितली होती. माहिती त्यांना मिळाली नसल्याचे त्यांच्या व्दितीय अपील अर्जात त्यांनी नमूद केले आहे. सुनावणीच्या वेळी उत्तरवादींतर्फे असे सांगण्यात आले की अपीलार्थींना कागदपत्रे पुरविण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आली आहे. परंतु अपीलार्थींच्या कथनानुसार दिलेली माहिती अपुरी आहे. याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत की अपीलार्थींना मागितलेल्या माहितीशी संबंधीत सर्व कागदपत्रे त्यांना पुन्हा दाखविण्यात यावी व त्यांच्या मागणीनुसार त्यातील कागदपत्रांच्या छायाप्रती त्यांना विनामुल्य पुरविण्यात याव्यात. |
| २ | ८७५ | अपीलार्थीनी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कामकाजाबाबत ची विविध मुद्यांवरील माहिती मागितल्याचे आढळून येते, याबाबत आयोगाचे असे निदेश आहेत या संबंधी आदेश, परिपत्रके इत्यादिच्या सर्व फायली अपीलार्थींना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या व यातील च्या आदेशाच्या/परिपत्रकाच्या छायाप्रती त्यांना हव्या असतील त्या जन माहिती अधिकारी यंनी विनाशुल्क उपलब्ध करुन द्याव्या. |
| ३ | ८७६ | सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसते की जन माहिती अधिकारी यांनी प्रति प्रत रु.२५/-शुल्क आकारले आहे. एका पानाच्या छायाप्रतीसाठी रु.२/- शुल्क आकारणी वाजवी ठरते. याचा विचार करता आयोगाचे असे निदेश आहेत की शुल्कापोटी आकारलेली जादाची रक्कम अपीलार्थींना तात्काळ परत करण्यात यावी. |

**उपरोक्त सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.**
**जन माहिती अधिकारी यांनी उपरिनिर्दिष्ट निदेशानुसार कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१७०/०२**

**श्री. निलेश पुसमल श्रीमाळ,** **------ अपीलकर्ता**
**बालाजी लेन,मु.पो.येवला,**
**जि.नाशिक ४२३ ४०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**तहसिलदार, तहसिल येवला,ता.येवला,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. निलेश पुसमल श्रीमाळ,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.११.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०३.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खालील नमूद अंगणगांव ता.येवला येथील सर्व्हे नं.६०/०१ ओपनस्पेस व रस्ते कर आकारणी सन १९९९ ते २००९ पर्यंत नियतकर, जिल्हापरिषद व ग्रामपंचायत कर आकारणी कशी केली व कोणकोणत्या जी.आर नुसार केली त्याच्या प्रतिसह माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलार्थीस कोणतीही माहिती पुरविलेली नाही. त्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले त्यावेळी झालेल्या चर्चेत असे दिसून आले की अपिलार्थीस अर्जाची पोच दिली गेली परंतु त्यांनी विचारलेल्या अकृषीत साऱ्याच्या आकारणीबाबत आवश्यक शासन निर्णय अपीलार्थीस दिलेल्या नाहित

त्यामळे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारीयांना दिनांक १५.०५.२००९ च्या आदेशानुसार परिपत्रक व अधिकाऱ्यांच्या नकला अपिलार्थीस १५ दिवसांत देण्याची सूचना केली.

परंतु विहित वेळेत माहिती न मिळाल्यामुळे अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले. व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांची बाजू समजू शकली नाही परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२२.०२.२०१० रोजी माहिती दिल्याचे आढळून आले मात्र जन माहिती अधिकारी यांनी यापुढे मुदतीत माहिती द्यावी अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २५.०५.२०१०**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/नाशिक/ २००९/सीआर/१७१/०२**

**श्री. अन्सारी इजाज मो.फारुकी,** **------ अपीलकर्ता**
**रु.न.७४/४, प्लॉट नं.६३, अन्सार कॉलनी,**
**महाराष्ट्र सिजींग, माळेगांव,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपसंचालक, शिक्षण विभाग (माध्यमिक), नाशिक विभाग,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उपसंचालक, शिक्षण विभाग (माध्यमिक), नाशिक विभाग,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी इजाज मो.फारुकी,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक,जि.नाशिक येथे दि. १८.०५.२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.११.२००८ रोजी अर्ज करुन, खालील नमूद मे.टी.टी.माळेगांव ट्रस्ट संचालित वददु प्रायमरी व प्रिप्रायमरी स्कूल मालेगांव इमारत किती निधी देणगी संदर्भातील निर्णय दिनांक ३१.१०.२००८ ची प्रत मागणी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी एकूण रु.२७/- चलनाने कोषागारात भरावेत असे कळविले होते परंतु जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७.०४.२००९ रोजी अपीलार्थीस हवी असलेली माहिती दिली.

अपीलार्थीचे म्हणने असे होते की त्यांनी नुसती निर्णयाची प्रत पाठविली परंतु त्यावर कार्यवाही काय केली हा प्रश्न अनुत्तीर्ण राहिल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले परंतु प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही बरोबर आहे असे सांगितले परंतु हवी असलेली योग्य माहितीव न मिळाल्याने अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी दि. २.०६.२००९ च्या पत्राव्दारे अपिलार्थीस मुद्दे निहाय माहिती दिल्याचे आढळून आले तसेच संस्थेने कार्यालयांच्या आदेशाविरुध्द उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका दाखल केलेली असल्याने सदर बाब न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे काही माहिती प्रगट करता येत नाही ही बाब ही त्यांच्या नजरेस आणून देण्यात आली. तरी याप्रकरणी अपीलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते या कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः २६.०५.२०१०**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम `१८ अन्वये दाखल झालेले तक्रार

क्र. मुमाआ-२००९/तक्रार क्र.३५६/०१

डॉ.श्रीकांत प्रभू - तक्रारकर्ता
बी-२३ उद्यानप्रभा,
तेजपान स्किम रोड नं.२
विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी
*-गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई ३२

विवेचन

डॉ.श्रीकांत प्रभू यांनी म्हाडाच्या दोन अधिका-यांविरुध्द फौजदारी प्रक्रिया सुरु करण्यासाठी परवानगी कोण देऊ शकतो, या व इतर काही अनुषंगिक माहितीच्या बाबतीत जन माहिती अधिकारी, मुख्य सचिवांचे कार्यालय यांच्याकडे दि.१७.९.२००८ रोजीचा अर्ज सादर केला होता. हा अर्ज त्या कार्यालयाने दि.२४.९.२००८ रोजी गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतर केला. या प्रकरणी डॉ.श्रीकांत प्रभू यांनी आयोगकडे प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्यसचिवांचे कार्यालय यांच्या आदेशाविरुध्द दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर आयोगाने आदेश क्रमांक-मुमाआ ३८७३९/अपील क्रमांक ४११४/०२ अन्वये दिनांक ३१ मार्च २००९ रोजी अपील अमान्य करत जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांना उद्देशून असे निर्देश देण्यांत आले की, त्यांनी डॉ.श्रीकांत प्रभू,अपिलार्थी यांना काय माहिती दिली याचा खुलासा त्यांच्या विभागाच्या सचिवांमार्फत १० दिवसांतच्या आत आयोगास पाठवावी.

सदर दिनांक ३१ मार्च २००९ च्या आदेशाची प्रत जोडून डॉ.श्रीकांत प्रभू यांनी त्यांच्या दि.२४.४.२००९ च्या अर्जान्वये अद्याप माहिती प्राप्त झाली नसल्याबाबत तक्रार केली होती. त्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करु नये याचा लेखी खुलासा दि.१८.५.२००९ रोजी ४.३० वाजता आयोगासमोर समक्ष उपस्थित राहून सादर करावा असे निर्देश जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांनी दिनांक २४.०.१००८ रोजीच्या पत्रान्वये

मूळ माहिती अर्ज पुढील कार्यवाहीसाठी सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृह निमार्ण भवन, बांद्रा पूर्व, मुंबई ४०००५१ येथे पाठविला व तसे तक्रारदारास लेखी कळविलेही आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारणाच्या कार्यालयाने देखील तक्रारदारास दि.१.११.२००९ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविले आहे :-

"याबाबत पुढील कळविण्यांत येते की, श्री. बाजीराव शिंदे व श्री.एउस.एस.मोहिते, रजिस्ट्रार हे प्रतिनियुक्तीवर प्राधिकरणांतर्गत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळात कार्यरत होते. आता त्यांची सेवा त्यांच्या मुळ सहकार विभाग कार्यालयात प्रत्यावर्तित करण्यांत आलेली आहे.

आपण आपल्या दिनांक १७.९.२००८ च्या अर्जान्वये माहितीच्या अधिकाराखाली ज्या ५ मुद्यांची माहिती मागविली आहे ती माहिती प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. आपण वरील कर्मचा-यांचे मुळ कार्यालय/शासनाच्या सहकार विभागाशी संपर्क साधून वरील माहिती प्राप्त करुन घ्यावी अशी विनंती आहे "

मा.आयुक्त यांनी आदेशित केल्याप्रमाणे तक्रारदारास गृहनिर्माण विभागाने व म्हाडाने पाठविलेल्या पत्रांच्या झेरॉक्स प्रती तसेच जावक रजिस्टरच्या संबंधित पूष्ठांच्या झेरॉक्स प्रती गृहनिर्माण विभागाने त्यांच्या दि.२६.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केलेल्या आहेत. या सर्वाचा साकल्याने विचार करता तक्रारदारांनी त्याच्या तक्रार अर्जात काहीच माहिती मिळाली नाही ही केलेली तक्रार जरी खरी असली तरी त्यांना गृहनिर्माण विभाग व म्हाडाच्या कार्यालयाकडून काहीच कळविले गेले नाही हे तक्रारदाराचे म्हणणे मान्य करता येऊ शकत नाही. मुख्य सचिवांच्या कार्यालयाने तक्रारदार यांचा दिनांक १७.९.२००८ चा माहिती अर्ज गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरण केल्याचे कळविले आहे व गृहनिर्माण विभागाने व म्हाडाने अर्जदारास पत्र लिहून माहितीचा अनु-उपलब्धतेबाबत कल्पना दिली आहे. ज्या अधिका-याविषयी अर्जदाराच्या तक्रारी आहेत व ज्यांच्या विरुध्द फौजदारासंहिते प्रमाणे कारवाई व्हावी असे अर्जदारास वाटते ते अधिकारी ज्या मुळ विभागाकडे प्रत्यावर्तित करण्यांत आले आहे. त्या विभागाकडे अर्जदाराने त्याची तक्रार व मागणी करणे योग्य राहील.

## आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांकः १२.५.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६६०/०२

श्री.आर.पी.यजुर्वेदी -अपिलार्थी
जे २२० अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी पूर्व मुंबई ५९

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव --उत्तरवादी
वैद्यकिय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी प कक्ष अधिकारी (औषधे-२)
वैद्यकिय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय,मुंबई ३२

विवेचन

अपिलाचा दिनांक २.२.२०१०
सुनावणी - दि.१२.५.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या दि.२१.११.२००१ रोजीच्या अर्जाबाबत अर्जदारास उत्तर देण्यांत आलेले आहे. मात्र अर्जदाराची मागणी ही मंत्रालय पातळीवरील कागदपत्राचीच तपासणी करण्या संबंधीची आहे. त्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, अर्जदार दि.२ जून २०१० रोजी दुपारी ३.००वाजता कागदपत्राची तपासणी करतील. त्यावेळी संबंधीत सर्व कागदपत्राच्या नस्ती त्यांना निरिक्षणासाठी सुपूर्द करावयांत असे निर्देश देण्यांत आले. तसेच अर्जदाराच्या मुळ अर्जातील काही भाग विभागातील दुस-या जन माहिती अधिका-याकडे पाठविण्यांत आला. मात्र त्याची माहिती अजुनही मिळालेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे, ही माहिती ५ दिवसाचे आत अर्जदारास पाठविण्यात यावी.

अर्जदाराच्या अर्जास प्रतिसाद देण्यास नागपूर अधिवेशनास अधिकारी गेल्यामुळे विलंब झाला, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निर्दशानास आणलेली ही बाब मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर दर्शविल्याप्रमणे कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांकः १२.५.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६६५/०२

श्री.अजितकुमार पंजाबी -अपिलार्थी
व्दारा रमझान भटार चाळ नं.२६३/५
डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड, कुर्ला पश्चिम
मुंबई ७०

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता --उत्तरवादी
परिक्षण खाते, मुंमनपा, आर वॉर्ड, बोरीवली पश्चिम
मुंबई ४०००७०

जन माहिती अधिकारी व सहा.अभियंता,
परिक्षण खाते, मुंमनपा, आर वॉर्ड, बोरीवली पश्चिम
मुंबई ४०००७०

विवेचन

अपिलाचा दिनांक ३.२.२०१०
सुनावणी - दि.१२.५.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्यावेळेला असे दिसून आले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.४.१.२०१० रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अर्जात दिलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे प्रत्येक प्रभागातील विविध कामाचे रस्ते, गटार दुरुस्ती इत्यादि प्रत्येकी एक कार्यादेश या प्रमाणे प्रतीची संख्या ४० इतकी असून त्याची प्रत्येकी ८० रुपये शुल्क भरण्याबाबत अर्जदारास दि.६.१.२०१० रोजी कळविले आहे. मात्र ते शुल्क न भरल्यामुळे अर्जदारास माहिती देता आली नाही.

सुनावणीच्या वेळी अर्जदाराने वरील शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे मान्य केले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १२.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६७१/०२

श्री.आर.पी.यजुर्वेदी -अपिलार्थी
जे २२० अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी पूर्व मुंबई ५९

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव --उत्तरवादी
वैद्यकिय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी व कक्ष अधिकारी (औषधे-२)
१.वैद्यकिय शिक्षण औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय,मुंबई ३२
२.संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय,
आरोग्य भवन, मुंबई.१

विवेचन

अपिलाचा दिनांक २.२.२०१०
सुनावणी - दि.१३.५.२०१०
अपिलार्थी अनपुस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या दि.२१.११.२००१ रोजीच्या अर्जाबाबत अर्जदारास उत्तर देण्यांत आलेले आहे. मात्र अर्जदाराची मागणी ही मंत्रालय पातळीवरील कागदपत्राचीच तपासणी करण्या संबंधीची आहे. त्यामुळे दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, अर्जदार दि.२ जून २०१० रोजी दुपारी ३.००वाजता कागदपत्राची तपासणी करतील. त्यावेळी संबंधीत सर्व कागदपत्राच्या नस्ती त्यांना निरिक्षणासाठी सुपूर्द कराव्यांत असे निर्देश देण्यांत आले.

अर्जदाराच्या अर्जास प्रतिसाद देण्यास नागपूर अधिवेशनास अधिकारी गेल्यामुळे विलंब झाला, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निर्दशानास आणलेली ही बाब मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आदेश

अपील मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी वर दर्शविल्याप्रमणे कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांकः १३.५.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६७३/०२

श्री.प्रकाश दत्ताराम भंडारी -अपिलार्थी
दत्ताराम हाऊस, चारकोप गांव
एम.जी.रोड, कांदिवली पश्चिम, मुंबई

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता --उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
आर/दक्षिण, महात्मा गांधी क्रॉस रोड.
रस्ता नं.२, कांदिवली पश्चिम मुंबई ६७

जन माहिती अधिकारी व सहायक अभियंता,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
आर/दक्षिण, महात्मा गांधी क्रॉस रोड.
रस्ता नं.२, कांदिवली पश्चिम मुंबई ६७

विवेचन

अपिलाचा दिनांक १.२.२०१०
सुनावणी - दि.१३.५.२०१०
अपिलार्थी अनपुस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.
जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर करीत आहे :-

श्री.प्रकाश भंडारी यांनी दि.५.११.२००९ रोजी माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार या कार्यालयाने त्यांना दि.२५.११.२००९ रोजी माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार या कार्यालयाने त्यांना दि.२५.११.२००९ रोजी माहितीबाबत कळविले होते. त्या पत्रामुळे श्री.भंडारी यांचे समाधान न झाल्याने ते प्रथम अपिल मध्ये गेले. अपिलीय अधिकारी व कार्यकारी अभियंता आर/दक्षिण यांच्या दि.२२.१२.२००९ रोजी च्या सुनावणीच्या आदेशानुसार या कार्यालयाने पुढील कार्यवाही चालू केलेली आहे. अनधिकृत बांधकामाबाबत शाळेधारकांना पुरावे सादर करण्यास सांगितले आहे. तसेच अनधिकृत बांधकामावर मुंबई महानगरपालिका कायदद्यानुसार

**कलम ३५१ अन्वये योग्यती कार्यवाही करण्यांत येत आहे. सदर बाबतची माहिती श्री. भंडारी यांना कळविण्यांत येईल.**

**अपिलाच्या संदर्भात अर्जदाराने मागितलेली माहिती एक महिन्याच्या आत देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १३.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५७१०/०२

श्री.प्रकाश गोविंद नवाथे -अपिलार्थी
जे २२० अन्सा, साकी विहार रोड,
साकीनाका,अंधेरी पूर्व मुंबई ५९

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता --उत्तरवादी
एफ/उत्तर, मुंबई महानगरपालिका ९६ भाऊदाजी मार्ग,
माटूंगा,मुंबई ४०००१९

जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता
एफ/उत्तर, मुंबई महानगरपालिका ९६ भाऊदाजी मार्ग,
माटूंगा,मुंबई ४०००१९

विवेचन

अपिलाचा दिनांक १०.३.२०१०
सुनावणी - दि.१५.५.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.
अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

वरील सक्युलर प्रमाणे दि.२९.४.२००२ च्या सॅक्शंड प्लॅनप्रमाणे बांधकाम नसलेल्या राजबाग इमारतीच्या २००१-२००३ या बांधकामाच्या काळात इमारतीच्या तपासणीचे काम एफ उत्तर विभागाचे होते. त्याबाबत वरील सर्क्युलरशी आपण सहमत आहात किंवा कसे याची माहिती देण्यांत यावी.

अर्जदाराने कार्यकारी अभियंता, एफ/उत्तर, यांचेकडे अर्ज केला होता हा अर्ज कार्यकारी अभियंता यांनी इमारत प्रस्ताव यांच्याकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यांत आला. यासाठी तपासणी अहवालाची प्रत ही अर्जदारास देण्यांत आलेली आहे. तसेच त्यांनी संपूर्ण नस्तीची पाहणी सुध्दा केलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १५.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५६९३/०२**

**श्री. दिपक लक्ष्मीचंद फुरीया -अपिलार्थी**
**लक्ष्मी स्टोअर्स शॉप नं.३ देढिया हाऊस, बभई नाका, एल.टी.रोड,**
**बोरीवली पश्चिम मुंबई ४०००९१**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता --उत्तरवादी**
**एफ/उत्तर, मुंबई महानगरपालिका ९६ भाऊदाजी मार्ग,**
**माटूंगा,मुंबई ४०००१९**

**जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता**
**एफ/उत्तर, मुंबई महानगरपालिका ९६ भाऊदाजी मार्ग,**
**माटूंगा,मुंबई ४०००१९**

**विवेचन**

**अपिलाचा दिनांक १०.३.२०१०**
**सुनावणी - दि.१५.५.२०१०**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**या अपिलाबाबत अपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय देता विहित कालावधी पेक्षा जास्त वेळ घेतलेला आहे. त्यांनी दिलेले विलंबाचे स्पष्टीकरण हे इतरत्र निरिक्षण व अतिरिक्त कार्यभार वगैरे स्वरुपाची कामे आहे. या गोष्टी प्रशासनात होतच असतात. तेव्हा माहिती अधिकाराच्या अपिल अर्जाच्या कामासाठी योग्य रितीने कार्यवाही करुन त्याची योग्य अधिका-याकडून त्याची अंमलबजावणी करुन घेणे आवश्यक आहे. तसेच नोंदणी उप महानिरिक्षकाने यापुढे त्यांच्याकडे वेळेत सुनावणी करुन त्याचे निर्णय वेळेत दिले जातील याची काळजी घ्यावी याची नोंद घ्यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.**

आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: १४.५.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५७१६/०२
क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५७१७/०२

श्री.संदीप काशिनाथ पाटील — अपिलार्थी
व्दारा- दुर्गेश एन्टरप्राईजेस,
३-अे, न्यू अशोकाविहार कॉम्पलेक्स,
हाडीस्पाईसर (एक्स्लो)कंपनी समोर,
लिंक रोड, एमआयडीसी अंबड
नाशिक ४२२०१० (महाराष्ट्र)

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कारागृह महानिरिक्षक --उत्तरवादी
कारागृह महानिरिक्षक यांचे कार्यालय,
सेंट्रल बिल्डिंग,पुणे

जन माहिती अधिकारी
कारागृह महानिरिक्षक यांचे कार्यालय,
सेंट्रल बिल्डिंग,पुणे

विवेचन

श्री. संदीप काशिनाथ पाटील, रा.अंबड (नाशिक) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत दिनांक १४.११.२००९ रोजी केलेला अर्ज दिनाक २३.११.२०१० रोजी आणि दिनांक ४.१.२०१० रोजी केलेला अपील अर्ज दिनांक २५.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाला. सदर अर्जान्वये श्री.पाटील यांनी श्री. दिलीपसिंग चंद्रसिंग गिरासे, तुरुंगअधिकारी श्रेणी-२ यांच्या रक्षक पदावरील नियुक्तीचे आदेश तसेच त्यांनी सादर केलेले जात प्रमाणपत्र, शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रतीची मागणी केली आहे.

श्री.पाटील यांनी मागणी केलेली कागदपत्रे या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने देता येत नसल्याने तसेच या संदर्भात काही म्हणणे असल्यास या कार्यालयाकडे सुनावणीसाठी हजर रहाणेबाबत या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक १२.३.२०१० अन्वये

श्री.पाटील यांना कळविण्यांत आले होते. तथापि श्री.पाटील सुनावणीसाठी कार्यालयाकडे हजर राहिले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी मागणी केलेली माहिती कागदपत्रासह अधिक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे-६ यांचेकडून मागविण्यांत आली आहे. त्यानुसार या कार्यालयाचे समक्रमांक पत्र दिनांक २६.५.२०१० अन्वये श्री.पाटील यांना मुद्देनिहाय माहिती पाठविण्यांत आली आहे.

तसेच श्री. संदीप काशिनाथ पाटील, रा.अंबड (नाशिक) यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत दि.१४.५.२००९रोजी केलेला अर्ज दिनांक २१.५.२००९ रोजी आणि दि.१६.२.२०१० रोजी केलेला अपील अर्ज दिनांक २०.०२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्रापत झाला. सदर अर्जान्वये श्री.पाटील यांनी श्री.जितेंद्रसिंग भगवानसिंग गिरासे, लिपीक यांच्या सेवाविषयक बाबीची आणि त्यांच्यावरील कोर्ट केस बाबतची माहिती/कागदपत्राच्या छायांकित प्रतीची मागणी केली आहे.

श्री.पाटील यांनी मागणी केलेली कागदपत्रे त्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने देता येत नसल्याने तसेच या संदर्भात काही म्हणणे असल्यास या कार्यालयाकडे सुनावणीसाठी हजर राहणेबाबत या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.१२.४.२०१०अन्वये श्री.पाटील यांना कळविण्यांत आले होते. तथापि श्री. पाटील सुनावणीसाठी या कार्यालयाकडे हजर राहिले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी मागणी केलेली माहिती कागदपत्रासह अधिक्षक, धुळे जिल्हा कारागृह आणि कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद यांचेकडून मागविण्यांत आली. त्यानुसार या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.२६.५.२०१० अन्वये श्री. पाटील यांना मुद्देनिहाय माहिती पाठविण्यांत आली आहे.

वरील विषयासंदर्भात श्री.संदिप पाटील यांनी आयोगाकडे दि.१६.२.२०१० रोजी व्दितीय अपील सादर केले होते

या दोन्ही अपिलाची सुनावणी दि.३०.५.२०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अर्जदारास हवी असणारी माहिती ही दि.२६.५.२०१० रोजी संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन देण्यांत आलेली आहे. सदर माहिती अद्याप अर्जदारास प्राप्त न झाल्यामुळे त्याची दुसरी प्रत आजच अर्जदारास देण्याबाबत निर्देश देण्यांत आलेले आहेत.

## आदेश

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः २९.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५७१८/०२

श्री.सत्यभान यशवंत साळगांवकर अपिलार्थी
जे-४२, वृषालीशिल्प. शिंपाली,चिकूवाडी,
बोरीवली पश्चिम मुंबई १२

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहकारी संस्था,आर विभाग उत्तरवादी
इ.क्र./अ खो.क्र.३१६ वडाळा ट्रक टर्मिनल आरटीओजवळ,
वडाळा पूर्व मुंबई ३७

जन माहिती अधिकारी सहकारी संस्था,आर विभाग
इ.क्र./अ खो.क्र.३१६ वडाळा ट्रक टर्मिनल आरटीओजवळ,
वडाळा पूर्व मुंबई ३७

विवेचन

अपिलाचा दिनांक ३० सप्टेंबर २००९
सुनावणीची तारीख दि.३०.४.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराच्या दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले आहे :-

श्री.सत्यभास यशवंत साळगांवकर यांनी माहिती अधिकारी अधिनियम २००५ नुसार या कार्यालयाकडे दि.१७.९.२००९ रोजी वृषाली शिल्प को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेच्या दि.०२.८.२००९ रोजीच्या वार्षिक सर्वसाधरण सभेसाठी संस्था पदाधिकारी त्यांना सभेस हजर राहून म्हणणे सादर करु देत नसल्याबाबत या कार्यालयाकडे तक्रार केल्याच्या अनुषंगाने या कार्यालयाने संस्थेस अर्जदार हे संस्थेचे सभासद असल्यास त्यांना नियानुसार सभेस बसु देण्यांत यावे असे पत्र दिले व त्याची प्रत अर्जदार यांचे घरी देण्यांत आलेली होती. यामुळे अर्जदार यांचे मागणीनुसार या कार्यालयाने वार्षिक सभेच्या अगोदरच कार्यवाही केलेली आहे. श्री.साळगांवकर यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत दि.१७.९.२००९ रोजी या कार्यालयाकडे दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली

याबाबत माहिती मिळण्याविषयी मागणी केली होती. सदर अर्जावर या कार्यालयाने दि.७.१०.२००९ रोजी पत्रान्वये अर्जदार यांना लेखी उत्तर दिलेले आहे. अर्जदार याचे अर्जावर या कार्यालयाने विहीत कालवधीमध्ये उत्तर दिलेले आहे.

वृषाली शिल्प को.ऑप.हौ.सौ.लि.ही संस्था समस्या प्रधान गृहनिर्माण संस्था असून संस्थेच्या माजी पदाधिका-यानी युएलसी अंतर्गत २२ सदनिका शासनास न देत त्या परस्पर विक्री केल्याने माजी व्यवस्थापक समिती विरुध्द मा.जिल्हा अधिकारी उ पनगर जिल्हा मुंबई यांनी संबंधिता विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेला असून सदरची बाब न्याय प्रविष्ठ आहे.

मा.अप्पर जिल्हा अधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरीक्षेत्र कमालधारण प्रशासकिय इमारत ५ मजला चेतना कॉलेज जवळ बांद्रा (पूर्व)मुंबइ्र-५१ यांनी या कार्यालयास दि.१३.२.२००९ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त २२ सदनिकेत राहत असलेले सभासद बेकायदेशीर असल्याबाबत कळविलेले आहे. त्यामुळे श्री. साळगांवकर यांचे सभासदरत्वाच्या हक्का केलेल्या मागणी संदर्भात या कार्यालयास हस्तक्षेप करता येत नाही ही बाब अर्जदार यांना यापूर्वीच कळविलेले आहे.

वरील विवेचन पाहता अर्जदारास सर्व माहिती देण्यांत आलेले आहे असे दिसून आले. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहे.

## आदेश

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

मुंबई
दिनांकः २९.५.२०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५७५२/०२

**श्री.संदिप पाटील** **अपिलार्थी**
**४/८ सहयाद्रीनगर, चारकोप,**
**कांदिवली पश्चिम, मुंबई ६७**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रंबधक** **उत्तरवादी**
**उच्च न्यायालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक**
**उच्च न्यायालय, मुंबई.**

## विवेचन

अपिलाचा दिनांक २०.१.२०१०
सुनावणीची तारीख दि.३१.५.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास मुंबई उच्च न्यायालयाने प्रकल्पग्रस्ताच्या नेमणूकीच्या संदर्भात दिलेल्या स्थगन आदेशाबाबतची माहिती पाहिजे होती. माहितीचा अधिकार अधिनियमानुसार मुंबई उच्च न्यायालयाला ते सक्षम प्राधि करण असल्यामुळे या कायद्यांतर्गत त्यांना स्वत:चे नियम बनविण्याचे अधिकार आहेत व त्याप्रमाणे मुंबई हायकोर्टाने Bombya High court Right to Information (Revised) Rules 2009 तयार केलेले आहेत. त्यानुसार ज्युडिशिअल प्रोसिडींगच्या बाबतीतील माहिती ही माहितीच्या अधिकार अधिनियमाखाली पुरविली जाणार नाही. मात्र अशी माहिती मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमानुसार पुरविली जाऊ शकेल. अर्जदारास तसे मुदतीत कळविण्यांत आलेले आहे अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांचा निर्णय माहितीच्या अधिकार अधिनियमाच्या तसेच मुंबई हायकोर्टाने तयार केलेल्या नियमानुसार सुसंगत असल्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.५.२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.८१९/०२
क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१२५७/०२

डॉ.ज्ञानचंद्र पाटील — अपिलार्थी
शितल चांदणी चौक,
दमानी हायस्कूलच्या जवळ,
सांगली ४१६ ४१६

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा नगर अधिक्षक — उत्तरवादी
भूमिलेख्र

१. जन माहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी
तहसिलदार कार्यालय, मिरज
२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,
अधिक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयए
मार्केट यार्ड, सांगली.

## विवेचन

सुनावणीची तारीख दि. ४.५.२०१०

अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीना उपरोक्त जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी केली होती. दोनही प्रकरणी त्यांना समाधानकारक माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-याकडे व तद्नंतर आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. दोनही प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी एकच असल्याने व्दितीय अपिलावर एकत्रित सुनावणी घेण्यांत आली.

सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करण्यांत आलेली कागदपत्रे, अपिलार्थी व उत्तरवादीची लेखी निवेदने यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, उत्तरवादीनी अपिलार्थीना माहिती पुरविली आहे. तथापि त्यांचे प्राप्त माहितीने समाधान झालेले नाही. अपिलार्थीच्या निवेदनावरुन असे दिसते की, ते कागदपत्रांची प्रत्यक्ष निरिक्षण करु इच्छितात. तेव्हा आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना त्यांच्या माहिती अर्जातील संबंधित बाबींची संपूर्ण कागदपत्रे निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. निश्चित वेळ व तारीख ठरवून त्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना कार्यालयात बोलवावे. त्यावेळी अपिलीार्थी कागदपत्राचे निरिक्षण

**करतील व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांची सूची जन माहिती अधिकारी यांना देतील. जन माहिती अधिकारी त्या सुचतील कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीना कोणतेही शुल्क न आकारता पुरवतील. ही कार्यवाही सदर आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत पूर्ण करण्यांत यावी.**

<u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यांत येते.
२. सदर आदेशाच्या प्रती दोनही जन माहिती अधिकारी यांना उपनिर्दिष्ट कार्यवाहीसाठी देण्यांत याव्यात.

**मुंबई**
**दिनांकः ३१.५.२०१०**

**(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.६०४/०२**

**डॉ.ज्ञानचंद्र पाटील** **अपिलार्थी**
**शितल चांदणी चौक,**
**दमानी हायस्कूलच्या जवळ,**
**सांगली ४१६ ४१६**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार** **उत्तरवादी**
मिरज
**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार**
**मिरज**

**विवेचन**

**अपिलाचा दिनांक ११.५.२००८**
**सुनावणीची तारीख दि. ४.५.२०१०**
**अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थीनी दि.३०.१.२००८ च्या अर्जान्वये कार्यालयाच्या स्थापनेपासून ते ३०.१.२००८ या कालावधीची एकूण ८ मुद्यांवरील माहिती मागितली. माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.३.३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी त्यांनी तसे कारण नमूद करुन आयोगाकडे व्दितीय अपील केले.**

**अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीना असे सादर केले की, त्यांना न मिळालेली माहिती पाहणी पश्चात मोफत देण्यांत यावी. तरी आयोगाचे असे निर्देश आहेत की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना माहितीशी संबंधित सर्व कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीनी त्यातील ज्या कागदपत्रांच्या त्यांना छायाप्रती त्यांना हव्या आहेत त्याची यादी जन माहिती अधिकारी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी यादीतील कागदपत्रांच्या छायाप्रती अपिलार्थीना विनाशुल्क पुरवाव्यात.**

आदेश

अपील निकाली काढण्यांत येते.

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ४.६..२०१०** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**